ISSN 2320 - 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३५
(जानेवारी-जून २०१४ / खंड ७, अंक १)


- विदर्भातील सहकार चळवळ
- भांडवलशाहीचा ऱ्हास
- कौटिल्याचे अर्थशास्त्र : एक ओळख
- त्रिकूट ठरले २०१३ च्या अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचे मानकरी : फामा, हॅनसन आणि शिलर
- कंत्राटी कामगार : वास्तव आणि उपाय
- महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेचा विकास
- पर्यावरण संवर्धन सद्य:स्थिती व आव्हाने
- विदर्भातील नागरी सहकारी बँकांची सद्य:स्थिती : एक टीप
- **Gandhi Today**
- जागतिक व्यापार संघटना आणि विकसनशील देशांच्या अन्नसुरक्षिततेचा वादप्रश्न
- ग्रंथ परिचय
- ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल

ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३५
(जानेवारी-जून २०१४/ खंड ७, अंक १)

□ प्रमुख संपादक □
दि.व्यं.जहागिरदार

□ सल्लागार मंडळ □
श्रीनिवास खांदेवाले
संजय धनवटे
आर.बी.भांडवलकर
एस.बी.कटमुसरे

□ संपादकीय पत्रव्यवहार □
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१
email:jahagirdardigambar@gmail.com

## अनुक्रमणिका

■ विदर्भातील सहकार चळवळ
- आर.आर. गव्हाळे ....................१
■ भांडवलशाहीचा ऱ्हास
- श्रीनिवास खांदेवाले.................. ७
■ कौटिल्याचे अर्थशास्त्र : एक ओळख
- दि.व्यं.जहागिरदार ....................१३
■ त्रिकूट ठरले २०१३ च्या अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचे मानकरी : फामा, हॅनसन आणि शिलर
- विनायक श्रीधर देशपांडे .............१८
■ कंत्राटी कामगार : वास्तव आणि उपाय
- माणिक खेर ........................२४
■ महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेचा विकास
- आर.बी.भांडवलकर ..................३०
■ पर्यावरण संवर्धन - सद्य:स्थिती व आव्हाने
- डि.के.राठोड .........................३६
■ विदर्भातील नागरी सहकारी बँकांची सद्य:स्थिती : एक टीप
- माधुरी प्रदीप लेले ...................४१
■ GANDHI TODAY
- H.A. Hudda ........................४८
■ जागतिक व्यापार संघटना आणि विकसनशील देशांच्या अन्नसुरक्षिततेचा वादप्रश्न
- प्रशांत हरमकर .......................५५

ग्रंथ परिचय

■ विदर्भातील कुष्ठरोगी सेवा संस्थांचे अध्ययन आधारवड कुष्ठरुग्णांचा
- वनिता चोरे .........................६३
■ विदर्भातील पर्यटन उद्योग
- पुष्पा इंदूरकर ........................६५
■ अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाचे स्वरूप व समस्यांचे विश्लेषण
- विनोद गावंडे ........................६८
■ ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल .........७१
■ विदर्भ अर्थशास्त्र परिषद - वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष................७५

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी (२०१३-१४)

- कार्याध्यक्ष

  डॉ.साज्मु ता जहागिरदार

- अध्यक्ष

  डॉ. सैंजय धनवटे

- उपाध्यक्ष

  डॉ. जे.ड्ढी.गायकवाड

- कोषाध्यक्ष

  डॉ. गावम कौंबळे

- सचिव

  डॉ.आर.बी.भौंडवलकर (अमरावती परिक्षेत्र)
  डॉ. एस.बी.कटमुसरे (नागपूर परिक्षेत्र)

- प्रमुख संपादक – 'अर्थमीमांसा'

  डॉ. दि.ड्ढयैं. जहागिरदार

- जिल्हानिहाय प्रतिनिधी :

  डॉ. ह्वाची देशपौंडे (नागपूर शहर)
  डॉ. सैंगीता टश्च ामोरे (नागपूर गह्मीण)
  डॉ. पी.बी.चिश्टे (चैं पूर)
  ह्वा. आर.बी.महेशकर (गडचिरोली )
  डॉ. वर्षा गणगणे (गोंदिया)
  ह्वा. एस.बी.भुरे (भैंडारा)
  पह्ल एस.बी.बोडे (वर्धा)
  ह्वा. राजश्री रायभोग (अमरावती )
  ह्वा. दिलीप महाजन (बुलढाणा)
  डॉ. उषा पाटील (यवतमाळ)

- अक्षर जुळवणी व मुद्रक :

  कॉम्प्युटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६
  email : narendrapandharikar@gmail.com

**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य – १०० रू.

२) शैक्षणिक संस्था – १५० रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' खंड ७, अंक १ आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे माजी कार्याध्यक्ष, अध्यक्ष तसेच वर्तमान कार्याध्यक्ष, अध्यक्ष, सचिव आणि कार्यकारिणीचे सदस्य आणि आपल्या परिषदेच्या सर्व आजीवन सदस्यांच्या पाठिंब्यामुळे व सद्‌भावनांमुळे प्रस्तूत अंक सिद्ध होऊ शकला याची मला पूर्णत: जाणीव आहे. हा अंक इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगाव (जि.यवतमाळ) येथे परिषदेच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनात (दि. १५ व १६ फेब्रुवारी २०१४) विमोचित होत आहे. ही बाब आपणा सर्वांना आनंददायी वाटणारी आहे. पूर्वीच्या अंकाप्रमाणे हा अंकही सर्वांना आवडेल असा विश्वास वाटतो.

या अंकात ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. आर. आर. गव्हाळे यांनी दिलेल्या भाषणाचा थोडक्यात गोषवारा दिला आहे. डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या २०१२ च्या वार्षिक अधिवेशनात प्रा.नी.वि.सोवनी स्मृती व्याख्यान दिले होते. ते व्याख्यान येथे 'भांडवलशाहीचा ऱ्हास' या शीर्षकाखाली प्रसिद्ध होत आहे. हे भाषण जरी मराठीतून दिले असले तरी ते डॉ. खांदेवाले यांनी इंग्रजीतून लिहले होते. त्या भाषणाचा अनुवाद अश्विनी कुळकर्णी यांनी केले आहे. भांडवलशाहीच्या ऱ्हासाबाबत केलेले हे विश्लेषण अभ्यासकांना नव्याने विचार करावयास लावेल एवढे महत्त्वाचे आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने ३७ व्या वार्षिक अधिवेशनापासून अर्थशास्त्रातील अभिजात ग्रंथाचा परिचय करून देणारे व्याख्यान आयोजित करण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांनी 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' या ग्रंथाची ओळख करून देणारे पहिले भाषण दिले. त्याही भाषणाचा गोषवारा येथे वाचकांच्या सोईसाठी प्रसिद्ध केला आहे. २३०० वर्षापूर्वी लिहलेल्या या ग्रंथाची ओळख सर्वांना आवडेल असे वाटते. इ.स. २०१३ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक फामा, हॅनसन आणि शिलर या त्रिकूटास संयुक्तपणे देण्यात आले. डॉ. व्हि.एस.देशपांडे यांनी लिहलेल्या लेखात या प्रत्येक अर्थशास्त्रज्ञाच्या योगदानाचा उत्कृष्टपणे परिचय करून दिला आहे. त्यामुळे साधारणत: आपल्या वाचनात न येणाऱ्या या अर्थशास्त्रांच्या कार्याचे महत्त्व आपणास लक्षात येईल.

'कंत्राटी कामगार : वास्तव व उपाय' या लेखात माणिक खेर यांनी कंत्राटी कामगारांची सद्य:स्थिती स्पष्ट करून त्यांच्या समस्यांवरील उपायांचीही चर्चा केली आहे. डॉ. भांडवलकरांनी 'महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेचा विकास' या लेखात आधारभूत संरचनेचे आर्थिक विकासातील महत्त्व विशद करून महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेची विपुल आकडेवारी सादर केली आहे. 'पर्यावरण संवर्धन - सद्य:स्थिती व आव्हाने' या लेखात प्रा.डी.के.राठोड यांनी पर्यावरणाचे स्वरूप

स्पष्ट करून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागतिक व राष्ट्रीय पातळीवर केलेल्या उपायांची चर्चा केली आहे. डॉ. माधुरी लेले यांनी 'विदर्भातील नागरी सहकारी बँकांची सद्य:स्थिती : एक टीप' या लेखात नागरी सहकारी बँकाच्या स्थितीचा आकडेवारी सादर करून थोडक्यात आढावा घेतला आहे. डॉ.एच्.ए.हुद्दा यांनी 'Gandhi Today' या लेखात आधुनिक दृष्टीकोनातून महात्मा गांधींच्या विचारांचे महत्त्व सांगून त्याचे वर्तमान संदर्भात महत्त्व सांगितले आहे. डॉ. प्रशांत हरमकर यांनी 'जागतिक व्यापार संघटना आणि विकसनशील देशांच्या अन्नसुरक्षिततेचा प्रश्न' ह्या लेखात विकसनशील देशांपुढे WTO च्या विविध करारांमुळे निर्माण झालेल्या वादप्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीने चिकित्सक अभ्यास केला आहे.

या अंकाचा विशेष असा की त्यात तीन पुस्तकांचा परिचय करून देण्यात आला आहे. डॉ. विभा सावरकरांनी लिहलेले 'विदर्भातील कुष्ठरोगी सेवा संस्थांचे अध्ययन आधारवड कुष्ठरूग्णांचा' या पुस्तकाचा परिचय डॉ. वनिता चोरे यांनी तर 'विदर्भातील पर्यटन उद्योग' या डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी लिहलेल्या पुस्तकाचा परिचय डॉ. पुष्पा इंदूरकरांनी करून दिला आहे. डॉ.जे.व्ही.गायकवाडांनी लिहलेल्या 'अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाचे स्वरूप व समस्यांचे विश्लेषण' या पुस्तकाचा परिचय डॉ. विनोद गावंडे यांनी करून दिला आहे. ही बाब नमूद करतांना आनंद वाटतो की डॉ. विभा सावरकर आणि डॉ. जे.व्ही.गायकवाड यांच्या पुस्तकांना मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार मिळाला आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना व सदस्यांना ही बाब भूषणास्पद वाटेल. गेल्या वर्षी नागपूर येथे झालेल्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत सचिव डॉ.आर.बी. भांडवलकर यांनी सादर केला आहे.

'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेचे वर्षातून दोन अंक निघावे ही अपेक्षा आहे. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. आपली संशोधन पत्रिका रेफर्ड जर्नल म्हणून मान्य झाली पाहिजे. हा अंक सिद्ध करताना डॉ. प्रशांत हरमकर यांचे योग्य सहकार्य मिळाले. अंकातील लेखकांनी आपले लेख वेळेत उपलब्ध करून दिलेत त्याबद्दल त्यांचे आभार. कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी अल्प वेळात हा अंक सुबकपणे तयार करून दिला त्याबद्दल त्यांचेही आभार.

नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा !

दिनांक : रथसप्तमी, दि. ६ फेब्रुवारी २०१४
स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**
प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

ISSN 2320-0197

# विदर्भातील सहकार चळवळ

## (विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणाचा गोषवारा)

**आर.आर. गव्हाळे**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख,
जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०१२ म्हणून पार पडले. त्यासोबतच महाराष्ट्राचे शिल्पकार आणि सहकार नेते यशवंतराव चव्हाण जन्मशताद्वी वर्षात आपल्या सहकार्याने अध्यक्षीय भाषणाचा योग आल्यामुळे सहकार विसरुन चालणार नाही. याची खूणगाठ मनाशी बाळगून विदर्भाच्या संदर्भात सहकार चळवळीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष संपूर्ण जगभर साजरे करण्यात आले. सर्व सामान्य माणूस, शेतकरी व ग्रामीण कारागीर यांच्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनासाठी सुरु झालेल्या सहकारी चळवळीने १११ वर्षे पूर्ण केली आहेत. या कालखंडाचा इतिहास पाहिला असता सहकारी चळवळीने अनेक क्षेत्रात यशस्वी पदार्पण केले असून देशाच्या अर्थव्यवस्थेत स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले आहे. सहकारी अर्थकारण आणि संघटन सामान्य माणसाच्या कल्याणाच्या निकषावर उत्पादन व वितरण व्यवस्था आयोजित करते त्यामुळे विकासाचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचतो. एकत्रीकरणाच्या या सामर्थ्याचा वापर अनेक छोटे, दुर्बल घटक, कामगार, गरीब, शेतमजूर, लहान व सीमांत शेतकरी यांना होतो. त्यासाठी त्यांना सर्वांच्या शक्तीचे एकत्रित संघटन करणे आवश्यक ठरते. जगात सुमारे ७५ पेक्षा जास्त देशात सहकारी संस्थांचे अस्तित्त्व आहे. जगात असा कोणताही एक देश नाही की, ज्या देशात सर्व प्रकारच्या संस्था सहकारी संस्था म्हणून अस्तित्त्वात आहेत. देशाची भौगोलिक परिस्थिती, राजकीय व्यवस्था, आर्थिक संस्थांची उपलब्धता, सरकारचे धोरण यावर सहकारी चळवळीचे अस्तित्त्व दिसून येते. नव्हेतर सहकाराची संकल्पना आणि तत्त्वे जर यशस्वीरितीने अंमलात आणली तर खरोखर क्रांती होवू शकते. 'विना सहकार नाही उद्धार' व 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' ही सहकाराची ब्रीद तत्वे आहेत.

**सहकार चळवळीचा इतिहास :**

सहकारी तत्त्वाज्ञानाला मानवी संस्कृती इतकाच पूर्वइतिहास आहे. भारतात सहकार चळवळीचा उगम विसाव्या शतकाच्या प्रारंभी झाला असला तरी जगाच्या सहकारी चळवळीला साडेतिनशे वर्षाचा इतिहास आहे. औद्योगिक उत्पादन नफ्याच्या किमंतीलाच विकण्याचे धोरण असल्यामुळे अन्न, वस्त्र व निवारा इतर पूरक वस्तूच्या किंमती कामगारांना त्यांच्या निर्वाह वेतनामुळे परवडणे शक्य नव्हते. यातूनच सहकारी अर्थकारणाच्या सहकारी संघटन पध्दतीचा जन्म झाला. रॉबर्ट ओवेन या उदारमतवादी कारखानदारास कामगारांची होणारी ही पिळवणूक

लक्षात आल्यानंतर त्यांनी कामगारांना वाजवी किंमतीस जीवनावश्यक वस्तू मिळाव्यात म्हणून श्रमिकांच्या सहकारातून ग्राहक भांडार चालविण्याचा प्रयत्न केला. सन १४९८ मध्ये ॲबरर्जन येथे पहिली सहकारी संस्था सुरु झाली होती. सन १७६९ मध्ये फन्विरु येथे ग्राहक सहकारी संस्था सुरु झाली. त्याचेच रुपांतर होवून हॉर्ट ऑफ इंग्लंड को-ऑपरेटिव्ह सोसायटी निर्माण झाली. १५ ऑगस्ट १८४४ ला इंग्लंडमध्ये रॉशडेल या खेड्यात रॉबर्ट ओवेन आणि चार्लस फॉरिये यांनी रॉशडेल पायोनिअर्त ही आधुनिक सहकारी संस्था काढून केली आहे. रॉबर्ट ओवेन यांच्या सहकारी संघटनाचे महत्त्व, गरज, तत्त्व, व्यवहार, आयोजन यांचे मार्गदर्शन करण्यासाठी १ मे १८२८ रोजी डॉ. विल्यम किंग यांनी The Co-operator हे मासिक सुरु केले. सर निकोलस यांच्या भगिरथ प्रयत्नामुळेच १९०२ साली सहकारास कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले.

भारतातील तत्कालीन ब्रिटीश राजवटीने जर्मनीतील 'रायफायसन' संस्थाच्या धर्तीवर २५ मार्च १९०४ रोजी पहिला सहकारी कायदा पारीत केला. भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेचा सुवर्णमध्य साधणारी ही चळवळ होती. सन १९१२ च्या दुसऱ्या सहकारी कायद्याने बिगर पत शेती सहकारी संस्था इतर संस्था स्थापन झाल्यात. सन १९०४ ते १९१२ ही भारतीय सहकारी चळवळीची प्रायोगिक अवस्था मानली जाते. रिझर्व बँक ऑफ इंडियाने श्री. ए. डी. गोरेवाला यांच्या अध्यक्षतेखाली सन १९५१ मध्ये अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती स्थापन केली. मुख्यत: सहकार हा मानवाच्या सहजीवनातून उदयास आला आहे. भारताच्या सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही महाराष्ट्राचे बलस्थान आहे. नव्हेतर महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनावर आज सहकारी चळवळीची दाट छाया पडलेली आहे. महात्मा फुले यांनी दख्खन बंडाळीच्या काळात आर्थिक विषमता दूर करण्यासाठी आणि दारिद्र्यावरील उपाय योजना म्हणून सहकाराचा पुरस्कार केला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रपिता महात्मा गांधीचे आशिर्वाद व गो. कृ. गोखले, सर जनार्दन मदन, ना.म.जोशी, विठ्ठलदास ठाकरसी, एस.एस.तालमाकी, भास्करराव जाधव, यासारख्या दूरदृष्टीच्या नेत्यांचे नेतृत्व व मार्गदर्शन सहकारी चळवळीस लाभले आहे. नव्हेतर स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यातूनच महात्मा गांधींनी सहकारी चळवळीचा पुरस्कार केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, मो. कुं. फिरोदिया, गुलाबराव पाटील, तात्यासाहेब कोरे, तात्यासाहेब मोरे, या नेत्यांनी महाराष्ट्रात सहकारी चळवळ रुजविली आणि वाढविली.

**महाराष्ट्रातील सहकारी संस्था :**

महाराष्ट्रातील सहकार चळवळ इतर राज्याच्या तुलनेत अधिक प्रगत असून तिचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्राथमिक शेती पत पुरवठा संस्था, सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, दुध उत्पादक व प्रक्रिया, शेतमाल प्रक्रिया संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण भागाला विकासाचे मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण महाराष्ट्र कृषी प्रधान आहे. परंतु ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा सहकार चळवळ हाच आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळ हा देशाच्या अभिमानाचा विषय आहे. राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या या सहकारी चळवळीशी निगडीत आहे. या संस्थाच्या माध्यमातून २० लाखाहून जास्त

लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली आहे.

सहकार चळवळीमध्ये कृषी पतपुरवठा, ग्रामीण व नागरी बिगरकृषी पतपुरवठा, साखर उद्योग, सूतगिरण्या, मत्स्य व्यवसाय, रेशीम उद्योग, चर्मोद्योग, पशूपालन, कुक्कूटपालन, शेतमाल प्रक्रिया, ग्राहक भांडार, हातमाग व्यवसाय, भातगिरण्या, तेलगिरण्या इत्यादींचा समावेश होता. ज्या संस्थांना चांगले नेत्वृत्व मिळाले, ज्या संस्थाचे व्यवस्थापन चांगले होते, त्या संस्था यशस्वी झाल्यात. दुर्दैवाने महाराष्ट्रात यशस्वी संस्थाच्या तुलनेत अयशस्वी संस्थाची संख्या जास्त आहे. महराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास हा प्रादेशिक दृष्ट्या असमतोल दिसून येतो.

सहकाराची संपन्नता आणि विकास यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिक विभाग अग्रेसर असल्याचे दिसून येते. विदर्भ प्रदेश हा सहकाराच्या वाढीमध्ये मागे असल्याचे आढळून येते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्थेचा विकास हा शेतमाल प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात झाला आहे. तर इतर प्रादेशिक विभागात दिसून येणाऱ्या सहकारी संस्थेमध्ये पतसंस्थांचा मोठ्या प्रमाणात समावेश दिसून येतो. महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक क्रांतीचा मुख्य आधारच सहकार आहे. महाराष्ट्रात सूक्ष्मवित्त क्षेत्रात स्वयंसहाय्यता बचत गट चळवळीने जी क्रांती घडवून आणली त्याचाही मुख्य आधार सहकार चळवळीतच दिसून येतो.

महाराष्ट्रातील सहकारी संस्थाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे लहान-लहान श्रमिक वर्गाच्या गटामध्ये त्याचे उभारणी झालेली आहे. उदा. बांबूतोड वर्ग, मत्स्य व्यवसाय संघ, तेंदूपत्ता संकलन, विटा उत्पादन, कौलारुची निर्मिती, वनउपज गोळा करणे इत्यादी. महाराष्ट्रात सन १९८० नंतर सहकार क्षेत्राला हादरे बसू लागलेत त्यामागील कारण राजकारण हे होते. तसेच केंद्र  व राज्य सरकारची बदललेली धोरणे ही त्याला जबाबदार होती.

**विदर्भातील सहकार चळवळीची स्थिती :**

विदर्भ काळ्या सोन्याची खाण, विदर्भ पांढऱ्या हिऱ्यांचा प्रदेश, विदर्भ नैसर्गिक साधन संपत्तीचा खजिना, विदर्भ म्हणजे महाराष्ट्राच्या नकाशावरील उगवता सूर्य आणि वैदर्भीय शेतकरी म्हणजे गृत्स्मद ऋषीचा वंशज, धरणीमातेच्या उदरातून मोती पिकविणारा, सोने निर्माण करणारा परंतु कफल्लक अठरा विश्वे दारिद्र्य पदरात पडलेला विदर्भ ! महाराष्ट्रातील ३/४ वनसंपत्तीसुद्धा विदर्भातच आहे. विदर्भातील एक-एक जिल्हा भौगोलिकदृष्ट्या आणि नैसर्गिकदृष्ट्या संपन्न असून सर्व पिकांचे उत्पादन करणारी सुपीक जमीन आणि ४३.८ टक्के सिंचनक्षमता असणाऱ्या नद्याही विदर्भातच आहेत.

कृषी हा विदर्भ विकासाचा गाभा आहे. कापूस आणि धान हे विदर्भातील शेतकऱ्यांचे जीवन-मरणांचे विषय होत. पूर्व विदर्भ हा धान उत्पादक पट्टा म्हणून ओळखला जातो तर पश्चिम विदर्भ हा कापूस उत्पादक पट्टा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे दोनही विभागातील शेतकऱ्यांच्या गरजा व समस्या वेगळ्या आहेत. तसेच त्यांची विकासाची बलस्थाने सुध्दा वेगळी आहे. विदर्भात दलित व आदिवासी समाजाची संख्या जास्त आहे. दारिद्र्यामुळे पिढ्यान्पिढ्या अस्तित्त्वात असलेल्या कर्जबाजारीपणामुळे मरण पत्करलेल्या शेतकऱ्यांची संख्या विदर्भातच मोठ्या प्रमाणात आढळून येते.  विदर्भात सद्यःस्थितीत दोन महसूल विभाग असून ११ जिल्हे आहेत. विदर्भाचे क्षेत्रफळ ९७८३० चौ.कि.मी. आहे. या प्रदेशाच्या उत्तरेस मध्यप्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, दक्षिणेस

आंध्रप्रदेश आणि पश्चिमेस महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा व खानदेश हा प्रदेश आहे. सन १९०९ नंतर विदर्भात तालुका व जिल्हा पातळीवर सहकारी मध्यवर्ती बँका अस्तित्वात आल्याचे दिसून येते. सहकारी चळवळ ही सरकारी व निमसरकारी चळवळ होती. शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याज दरावर कर्ज देणे, ठेवी स्वीकारणे आणि सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठीच को-ऑपरेटीव्ह बँकेचा जन्म झाला. बॅ. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख हे वऱ्हाडातील शेतकरी संघाचे अध्यक्ष होते. त्यांच्या विचारातूनच अमरावतीची वऱ्हाड को-ऑपरेटिव्ह बोर्ड (विदर्भ को-ऑपरेटीव्ह बोर्ड) अस्तित्वात आले. सहकारी कर्ज वसूलीत १९३३-३४ मध्ये विदर्भातील सहकारी बँकाच्या ताब्यात शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन आली. विदर्भ को-ऑपरेटीव्ह मार्केटींग सोसायटी ही व्यापारी संस्था १५ ऑगष्ट १९७८ ला नागपूर येथे स्थापन झाली. या संस्थेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या मालाची योग्य भावाने विक्री करुन देणे, त्यांच्या शेतीला लागणाऱ्या खते, बी-बियाणे, अवजारे इत्यादी वस्तू पुरविणे हा होता. अमरावती येथे सहकार भवन ही इमारत असून कृषिदेव मिश्रखते सहकारी कारखाना स्थापन केला आहे. तर अचलपूर येथे संस्थेचा स्वत:चा जिनप्रेस आहे. अशा प्रकारे विविध क्षेत्रात संस्था स्थापन होत गेल्या. अलिकडच्या काळात विदर्भात सहकार तत्त्वावर उभी असणारी स्वयंसहाय्यता बचत गट चळवळ ग्रामीण भागात विशेषत: महिलांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, राजकीय क्रांती घडवून आणित असल्याचे दिसून येत आहे. सन १९७१ मध्ये म्हणजेच महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर केवळ दहा वर्षात विदर्भात ९६४० विविध प्रकारच्या सहकारी संस्था होत्या. गेल्या ५० वर्षात जवळजवळ तीन पटीने वाढ होवून सन २०११ मध्ये ही संख्या २६,७०० पर्यंत पोहोचली. गेल्या दशकात विदर्भात झालेल्या ग्रामीण शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने दिलेले 'विदर्भ पॅकेज' आणि धोरण तसेच काही बँकाच्या रोखे व्यवहारातील घडलेले व्यवहार या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थाच्या सन २००१ मध्ये एकूण १९३२२ संस्था होत्या.

विदर्भातील शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या प्राथमिक शेती पतसंस्था ह्या सन २००१ च्या तुलनेत कमी झाल्या आहेत. तसेच साखर कारखाने, भात गिरण्या, सूत गिरण्या ह्या शेतीमाल उत्पादनावर आधारीत प्रक्रिया सहकारी उद्योग धंद्यांच्या संख्येतही घट झाली आहे. नव्हेतर ज्या संस्था आज कार्यरत दिसतात त्यापैकी बहुतांश संस्था ह्या आजारी आहेत. सहकारी संस्थाकडे नोंदणी करुन निर्माण अवस्थेत असलेल्या सदर संस्थांनी प्रत्यक्षात उत्पादनात योगदान दिलेले आढळत नाही. पगारदार नोकराच्या संख्येत सातत्याने वाढ झाली आहे. औद्योगिक संस्थांच्या बाबतीतही मोठ्या प्रमाणात उदासीनता विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात आढळून येते.

सध्या विदर्भातील बुलढाणा, नागपूर व वर्धा ह्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका डबघाईस आल्यामुळे त्यांना पतसंस्थाचा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच विदर्भातील सहकारी संस्थांच्या प्रकारावरुन प्रत्येक जिल्ह्यात इतर संस्थांच्या तुलनेत सामाजिक सहकारी संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते. परंतु आर्थिक विकासात ह्या सामाजिक संस्थांनी सामाजिक विकासाच्या माध्यमातून योगदान दिल्याचे दिसून येत नाही. कारण

सामाजिक विकासातून विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून येण्यास निश्चितच प्रतिबंध झाला असता असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली तसेच पश्चिम विदर्भातील अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा ह्या पाचही जिल्ह्यांनी सरासरीपेक्षा म्हणजेच लक्ष्यपूर्ती पेक्षा जास्त शेती पीक कर्जाचे वाटप केले आहे. खुले आर्थिक धोरण, जागतिकीकरण, खाजगीकरण, व्यवसायिककरण, उदारीकरण या गोंडस नावाखाली भांडवलशाही वृध्दींगत करण्याचे कुटील कारस्थाने सुरु असलेल्या या काळात विदर्भातील सहकारी संस्थांच्या डबघाईस येण्याचे प्रमाण इतर प्रदेशापेक्षा कमी ही समाधानाची बाब आहे. खऱ्या अर्थाने विदर्भातील सहकारी चळवळीने आज भांडवलशाही अर्थव्यवस्था व साम्यवादी अर्थव्यवस्था यामध्ये सुवर्णमध्य साधण्याची भूमिका बजावली आहे. 'विना सहकार नाही उध्दार' या विचाराची प्रेरणा घेऊन उगम पावलेला व आज वटवृक्षाप्रमाणे पसरलेला सहकार हा संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहे. भांडवलाची कमतरता, राजकारणाचा प्रभाव, अतिरिक्त नोकरभरती, बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा, देशी मोठ्या उद्योगाशी स्पर्धा, उच्च दर्जाच्या उत्पन्नाची स्पर्धा, किंमत घटीची स्पर्धा, तांत्रिक मागासलेपणा, प्रशिक्षित कर्मचारी वर्गाचा अभाव, सरकारी हस्तक्षेपावरील मर्यादा, सहकारी सहाय्यावरील मर्यादा, ९७ वी घटनादुरुस्ती या सारख्या प्रमुख आव्हानांचा विचार करता सहकार क्षेत्र खऱ्या अर्थाने स्पर्धेच्या संक्रमणात सापडले आहे. ज्यांनी सहकाराचा स्वाहाकार केला त्या संस्थेचे वाटोळे झाले. आज सहकार चळवळ ही स्वायत्तता नसलेली व शासन नियंत्रित चळवळ झाली आहे. सहकारी कार्यकर्त्यांमध्ये अप्रामाणिकपणा, अपहार आणि संस्थांचा आपल्याच स्वार्थासाठी वापर वाढीस लागला आहे. त्यामुळे अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार, वशिलेबाजी, भाई-भतिजावाद इत्यादी दुर्गुणांनी सहकारी संस्था ग्रासल्या आहेत. नैतिक अधिष्ठान आणि मूल्यांची जपवणूक करणाऱ्या विचारांचा वारसा मागे पडून सत्ता, स्पर्धा, व स्वार्थ यांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला आहे. तसेच सहकारी संस्थांनी मोठ्या प्रमाणात अनुत्पादक कार्यावर खर्च केलेला आढळतो. पर्यायाने शासनाच्या आर्थिक मदतीची त्यांची अपेक्षा वाढत जाते. सहकार चळवळीच्या विकासात जिल्ह्या-जिल्ह्यात असमतोल मोठ्या प्रमाणात दिसून येतो. विषय डावलून कर्ज वाटप केलेल्या सहकारी संस्थामध्ये थकबाकीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यातून बुडवेगिरीची प्रथा हळूहळू रुढ होत आहे. या सर्वांचा परिणाम सहकारी चळवळ दिशाहीन, आपली उदिष्ट्ये व लक्ष्ये हरवलेली चळवळ म्हणून समाजापुढे येवू लागली आहे. सहकार हे आर्थिक विकासाचे साधन जरी असले तरी संस्काराशिवाय सहकार शक्य नाही.

संपूर्ण देशात सहकार कायद्याबाबत एकवाक्यता येण्याच्या दृष्टीने भारतीय राज्यघटना (९७ वी दुरुस्ती) कायदा-२०११ संमत केला आहे. प्रथमच घटनेमध्ये सहकार विषयक तरतुदी करणारी घटनादुरुस्ती करुन देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्राला असलेले अनन्यसाधारण महत्व केंद्र शासनाने अधोरेखित केले आहे. पूर्वी सहकारात नफ्यापेक्षा सभासदांच्या गरजेला जास्त महत्व होते. नफा ही बाब दुय्यम होती. सध्याच्या वातावरणात मात्र नुसता नफा नव्हे तर जास्तीत जास्त नफा या संकल्पनेस महत्व आले आहे. अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था या दोन दृष्टीने

सहकाराचे महत्व लक्षात घेता सहकाराची आवश्यकता आपोआप स्पष्ट होते. विज्ञान व प्रगत तंत्रज्ञानामुळे अर्थव्यवस्थेला सुध्दा आपला विकास जलदगतीने करता येतो. त्यामुळे मानवाला, समाजाला, राष्ट्राला व जगालाही सहकाराची आवश्यकता वाटते.

**उपाय योजना :**

सहकारी संस्थांना स्वत:चे व्यवस्थापन हे कंपन्यांच्या व्यवस्थापनासारखे कार्यक्षम करावे लागेल. वास्तविकत: स्वातंत्र्योत्तर काळात सर्व वादळी आवर्तनात टिकून राहिलेली ही एकमेव चळवळ आहे. मुक्त अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळ नष्ट न होता गुणात्मकदृष्ट्या अधिक ताठ मानेने उभी राहील त्याकरीता सहकारी संस्थातील कर्जदार, ठेवीदार, सभासद इत्यादींना सर्व प्रकारची सेवा कार्यक्षम व वेळेत घ्यावी जेणेकरुन संस्थेचे वातावरण मैत्रीपूर्ण निर्माण होईल. जनतेमध्ये विश्वास निर्माण व्हावा याकरीता पारदर्शक व्यवस्थापन व व्यवहार असावेत. आर्थिक स्वायत्ततेकरीता सहकारी चळवळ राजकारण, अधिकारशाही आणि सरकारीकरण यापासून मुक्त असावी. आजारी व दुर्बल संस्थाचे सबळ संस्थेत विलीनीकरण करुन प्रादेशिक व जिल्हा असमतोल दूर करावा. वित्तीय पुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांनी कर्ज वसुलीबाबत जागरुक असावयास पाहिजे. त्याकरीता सहकारी संस्था स्पर्धाक्षम होणे आवश्यक आहे. तसेच माहिती व तंत्रज्ञानाचा वापर आणि तज्ज्ञाचे प्रशिक्षण या गोष्टीची सहकार क्षेत्राला आवश्यकता आहे. सहकारी क्षेत्रात परिस्थिती आणि व्यक्ती निर्मित अनेक व्यथा आढळतात. ही व्यथांची मालिका दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. ही दुर्दैवाची बाब आहे.

**धन्यवाद ! जय विदर्भ !!**

# भांडवलशाहीचा ऱ्हास

श्रीनिवास खांदेवाले, नागपूर.
(अनुवाद –आश्लेषा कुलकर्णी, नाशिक)

**प्रस्तावना :**

प्रस्तुत निबंध हा तीन भागात विभागला आहे. पहिल्या भागात भांडवलशाहीची एक सामाजिक व्यवस्था म्हणून ओळख करून दिली आहे. सद्य: परिस्थितीत भांडवलवादी अर्थशास्त्राची सैद्धांतिक मांडणी केली आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामांबद्दल चर्चा केली आहे. दुसरा भाग हा अर्थतज्ज्ञांच्या मनात असणारी भांडवलशाही व्यवस्थेच्या कारण आणि परिणाम यातील संभ्रमाची स्थिती अधोरेखित करतो. तिसऱ्या भागात भांडवलशाहीची चौकट बदलण्याची आवश्यकता आणि त्यावरील बौद्धिक चर्चा तसेच प्रचलित व्यवस्था बदलण्यासाठीची प्रत्यक्ष कृती यांचेही महत्त्व स्पष्ट केले आहे.

**विभाग १ :**

**सद्य:परिस्थिती / वर्तमान स्थिती :**

खरे तर या निबंधाचे पर्यायी शीर्षक – 'भांडवलशाही व्यवस्थेचे वास्तवधारित सैद्धांतिक विश्लेषण' असे लेखकाला अभिप्रेत आहे. कारण भांडवलशाही व्यवस्थेची अवास्तव गृहीतके, पद्धती आणि अव्यवहार्य तर्काच्या आधारे सतत विश्लेषण करत राहिल्याने तिचा ऱ्हास होण्याच्या मार्गावर आहे. अर्थातच अनेक विचारवंत आणि लेखक हे या व्यवस्थेबद्दल मूलभूत प्रश्न विचारतांनाच उपाययोजनाही सुचवतात. मात्र सद्य:परिस्थितीच अशी आहे की भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कोणतेही बदल होण्यापेक्षा आहे ती परिस्थिती 'जैसे थे' म्हणून स्वीकारण्यापलीकडे उपाय नाही. आजच्या भांडवलशाही व्यवस्थेने स्वत:च्या राजकीय, सामाजिक, तांत्रिक, सांस्कृतिक, कलात्मक आणि शैक्षणिक न्याय, अशा असंख्य उपशाखा निर्माण केल्या आहेत. ग्रहमालेत ज्याप्रमाणे ग्रह एकमेकांकडे आकर्षिले जातात आणि परस्पर बलांमुळे संतुलित अवस्थेत तरंगत राहतात त्याप्रमाणे या उपशाखा सहअस्तित्व टिकवून धरतात. वैयक्तिक पातळीवर प्रत्येक घटकाला नाशाची भीती असल्यामुळे जितक्या जास्त समस्या येत जातात तितक्या जास्त प्रकर्षाने प्रत्येक घटक प्रतिक्रिया देतो आणि जणू काही कमी प्रभाव दाखविणाऱ्या दुसऱ्या घटकाची भरपाई करतो. आपण सध्या अशाच व्यवस्थेत राहत आहोत.

**उदाहरणार्थ–**

१. टी.व्ही.वर वारंवार दाखविल्या जाणाऱ्या जाहिरातींचा मारा प्रेक्षकांवर केला जातो.
२. उत्पादक एकाचवेळी सर्व दूरचित्रवाणी वाहिन्या, वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतून सतत विशिष्ट वस्तूंच्या जाहिराती दाखवत असतात.
३. जाहिरातींवर होणारा खर्च हा उत्पादनमूल्य आणि

विक्रीमूल्य यांच्या किती टक्के असतो ?

४. जाहिरातीवर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात मागणी वाढते का ?

५. वाचक आणि प्रेक्षकांच्या मानसिकतेवर या जाहिरातींच्या माऱ्याचा काय परिणाम होतो ?

६. जाहिरातीवरील खर्च कमी केला तर एकूण उत्पादनखर्च आणि विक्रीखर्च तर कमी होणार नाहीच परंतु ग्राहकांचे वास्तव उत्पन्न आणि समाधानाची पातळी वाढेल का?

७. हे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार काय फक्त उत्पादकांनाच असतात ? समाजाला या निर्णयप्रक्रियेत काहीच स्थान नाही ?

८. सामाजिक, संसाधनांचा हा अतिरिक्त वापर नाही का ?

९. जाहिरातीवरील खर्च कमी करून प्रचलित व्यवस्था तग धरू शकेल काय ?

अशा प्रश्नांची एक मालिकाच निर्माण होते. गेल्या दोन दशकात एकूणच गुन्हेगारीत वाढ झाली. विशेषत: स्त्रियांची असुरक्षितता प्रचंड वाढली.

१. आर्थिक विकासाच्या दरात वाढ होत असताना गुन्हेगारीत वाढ का झाली ? आपण फक्त आर्थिक क्षेत्रापुरता गुन्हेगारीचा विचार केला तरी जगभरात करचुकवेगिरी विलक्षण मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसते.

२. अनियंत्रित वित्तीय बाजाराचा झालेला विकास, बँकांची परतफेड न झालेली कर्जे आणि निर्धास्त असणारे ऋणको अशा परिस्थितीत भांडवलशाहीला धक्का बसतो. वरवर सारे काही आलबेल आहे असा आभास निर्माण करण्यासाठी अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा वाढवावा लागतो. युरोप, अमेरिका आणि जपानमध्ये हाच प्रयोग करण्यात आला. या अर्थव्यवस्थांमध्ये श्रीमंतांना करसवलती देण्यात आल्या. या सवलती दिल्या नाहीत तर श्रीमंताना उत्पादन करणेच अशक्य होईल असा युक्तिवाद करण्यात आला. म्हणून तर २००८-०९ च्या मंदीच्या काळात श्रीमंतांना अधिक श्रीमंत करण्याच्या हेतूने सुरू करण्यात आलेले भरघोस अर्थसहाय्य त्यानंतरही बराच काळ सुरू ठेवण्यात आले.

जगातील अब्जाधीशांची वाढती संख्या पाहून Financial Times मध्ये जॉन गॅपरने लिहिले, ''एक गोष्ट तर नक्की आहे की अब्जाधीश होणे ही अतिशय सोपी गोष्ट आहे. वेतनातील वाढ अवास्तव असताना तर त्यात काहीच विशेष नाही. गेल्या दशकात फोर्बने केलेली अब्जाधीशांची यादी ४७६ ने वाढली, आणि एकूण संपत्ती १.४ अब्ज कोटीने वाढली. आजच्या घडीला ५.४ अब्ज कोटी रूपये नावावर असणारी १४२६ नावे आहेत. क्रिस्तिया फ्रीलँड यांनी आपल्या 'प्लुटोक्रॅट' या पुस्तकात श्रीमंतांची श्रीमंती अधिक वाढण्याची दोन मुख्य कारणे सांगितली. पाश्चात्त्य राष्ट्रे जागतिक ग्राहकपेठेत स्वस्त श्रमिकांना आकृष्ट करतात आणि उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये सरकारी मालमत्तांचे हस्तांतरण तसेच वस्तूच्या किमतीची पातळी उंचावत ठेवून ही राष्ट्रे आपला कार्यभाग साधतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गेल्या दशकात मंदी असूनही श्रीमंत वर्गाची श्रीमंती वाढतच गेली.

सरंजामशाहीचा अंत होत असताना ग्रामीण गुलामगिरी, औद्योगिकीकरणाचा उदय आणि नागरी स्वातंत्र्य इत्यादींपासून भांडवलशाहीने मुक्ती दिली. त्याचबरोबर एक नवी राज्यव्यवस्था किंबहुना राजकीय अर्थव्यवस्था, सामाजिक संबंधाच्या नव्या रचना, नवी संस्कृती, तंत्रज्ञानाचे सातत्याने आधुनिकीकरण

करण्याची तीव्र इच्छा आणि बाजारपेठेच्या मानसिकतेची सार्वत्रिक स्वीकार्यता या भांडवलशाहीने निर्माण केली आहे.

चार शतकाच्या साम्राज्यशाही सत्तांतरानंतर, दोन जागतिक महायुद्धांनंतर, दोन तंत्रज्ञानाच्या क्रांतीनंतर आणि दोन मुक्त व्यापार करारानंतर आज जागतिक भांडवलवादी अर्थव्यवस्था बौद्धिक संभ्रम, वाढत जाणारे श्रमिकांचे शोषण, अकार्यक्षम राज्यव्यवस्था, वेगाने वाढत जाणारी वैयक्तिक व क्षेत्रीय विषमता आणि आर्थिक अस्थैर्य यांचा अनुभव घेताना दिसते. म्हणूनच या परिस्थितीचे सखोल निरीक्षण तसेच विश्लेषण आवश्यक आहे.

**विभाग – २ :**

**सैद्धांतिक पाया :**

१९ व्या शतकातील सर्वसमावेशक राजकीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलताना, २० व्या शतकातील अर्थशास्त्राचे बाजाराकर्षी सैद्धांतिकीकरण त्याचप्रमाणे अर्थशास्त्राचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पैलू गळून जातानाच गणिती समीकरणांवर आधारित शुद्ध अर्थशास्त्र समोर आले. समीर अमिन याला चेटकीकला म्हणतात.

अर्थशास्त्र हे वस्तुनिष्ठ विज्ञान (Positive Science) रहावे आणि केवळ सामाजिक विकासाचे आदर्शनिष्ठ (Normative) पैलू टाळता यावेत अशा प्रकारे अर्थतज्ज्ञांच्या जनकांना पाश्चात्त्य विद्यापीठांमध्ये प्रशिक्षित करण्यात आले आहे.

व्यक्तिहिताची सामाजिक हिताशी जुळणी होतेच असे गृहीत धरता धरता मग मनुष्य हा विवेकी असल्याने आधिक्याची निर्मिती होता होता स्वहित, हाव, शोषण, भ्रष्टाचार, अपव्यय, नाश इ. सर्वांनाच अशा एका सामान्य व्यवस्थेचे घटक समजले जाऊ लागले की जे ती व्यवस्था कधीच नष्ट करणार नाहीत. त्यातूनच पुढे जागतिक युद्धे, मंदी, महागाई, बेरोजगारी, दारिद्र्य, पर्यावरणाचा ऱ्हास, हवामानातील बदल यांना फक्त अशा घटनांचा दर्जा देण्यात आला की ज्यांचा भांडवलशाही व्यवस्थेशी अर्थाअर्थी काही संबंध नाही.

'भांडवलशाही विवेक' स्पष्ट करताना हे गृहीतच धरले गेले की वस्तूमध्ये असलेल्या उपयोगितेचे महत्तमीकरण हे ग्राहकाचे उद्दिष्ट तर नफ्याचे महत्तमीकरण हे उद्योजकाचे उद्दिष्ट असेल. रोजगार निर्मिती, संसाधनाचे संवर्धन, पर्यावरणाचे जतन, वैश्विक मानवी कल्याण या उदात्त सामाजिक उद्दिष्टांकडे सरळ सरळ दुर्लक्ष केले गेले. त्यामुळेच वाढत्या जागतिकीकरणाबरोबर विषमताही वाढत गेली. बाजार यंत्रणांवरची नियंत्रणे शिथिल केल्याने परिस्थिती बिकट होत गेली.

मागणी आणि पुरवठा तसेच खर्च आणि किंमती या आर्थिक घटकांच्या परस्पर विरोधातून समतोल साधता येईल असा नवा युक्तिवाद मांडला गेला. अगदी सूक्ष्म स्तरावरील समतोलाची एकत्रित मांडणी (बाजार) समतोल म्हणून करताना त्यालाच कल्याण समतोल समजले गेले. मात्र असमतोलावस्थेत महत्तम विक्री न झालेल्या नाशवंत वस्तूंचा पुरवठा, तंत्रज्ञानातील बदलांमुळे निर्माण होणाऱ्या श्रमिकांच्या बेरोजगारीच्या समस्यांची चर्चा झाली नाही. जागतिकीकरणामुळे देशा-देशातील दळणवळण वाढले, जागतिक बाजारपेठेत स्पर्धकांची संख्या वाढली त्यामुळे समतोलाचे स्थैर्य, पर्यायाने कल्याण अशक्य झाले. अगदी अशाही अस्थैर्याच्या परिस्थितीत १९३० मध्ये लिओनिल रॉबिन्सने समतोलाच्या संकल्पनेचा फोलपणा ओळखला आणि आपले मत मांडताना त्याने स्पष्टपणे सांगितले, ''समतोल म्हणजे फक्त समतोल. त्याला सर्वमान्य

स्पष्टीकरण नाही. म्हणूनच समतोलाच्या सिद्धांतात सामाजिक सकारात्मकता अजिबात नव्हती. अशाच प्रकारची अनिश्चितता आणि अस्थैर्याने अमेरिकेच्या फेडरल रिझर्वचे अध्यक्ष बस्नान्के यांना असे कबूल करणे भाग पाडले की २००८ मध्ये परिस्थिती इतकी बिकट होती की अवघ्या एक महिन्यांनंतर काय घडेल याचा अंदाज करणेही कठीण होते.

सातत्याने वाढत जाणारे वास्तव अर्थव्यवस्थेचे वित्तीयीकरण फक्त व्यापारीकरणाकडचे नेत नाही तर नफ्याची हाव आणि तोट्याची भीतीही निर्माण करत आहे. नफ्याच्या हेतूने संसाधनांचा वाढता ऱ्हास होतो. उदा. मोफत जलसंसाधने खनिज तेल,जमिनीची घटत जाणारी सुपिकता, जस्त, तांबे, फॉस्फरस यासारख्या महत्त्वाच्या खनिजांची टंचाई इ. गंभीर समस्या आहेत. वित्तीयीकरणाचा परिणाम म्हणजे अनियंत्रित वित्तबाजार आणि LIBOR सारख्या जागतिक वित्तीय संस्था होत.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे सैद्धांतिक प्रतिमान असणारा बाजार हा पूर्णस्पर्धा, शुद्ध स्पर्धा, वाढता अल्पाधिकार आणि मक्तेदारी या स्वरूपात असला तरी त्याने भांडवलशाही अर्थव्यवस्था, राजकारण, संस्कृती आणि इतर सर्व संबंधित पैलूंना आमूलाग्र बदलून टाकले आहे.

उद्योगांचा कल आणि आर्थिक केंद्रीकरण आता अपरिवर्तनीय होत चालले आहे. मक्तेदारी भांडवलाचा सिद्धांत विकसित करण्यात पॉल बॅरनने योगदान दिले. मक्तेदारी भांडवलाच्या घटकांबद्दल बॅरनने असे लिहिले की,''मक्तेदारी भांडवलशाहीचा कॅन्सरसारखा प्रसार होत आहे. उत्पादनाची अधिकतम साधनसामग्री अधिकाधिक उत्पादन घेण्याकडे वळवली जातानाच वितरणाकडे दुर्लक्ष होते आणि बरीचशी साधनसामग्री जाहिरातबाजी आणि भेसळयुक्त उत्पादनांकडे वळवली जाते हे करत असताना त्याचे मानवी जीवनावर काय परिणाम होतील ? याकडे दुर्लक्ष केले जाते.'' अशा काळात फक्त मनोरंजनावर भर दिला जातो. धर्माचे व्यापारीकरण केले जाते आणि संस्कृतीचा पायाच उखडला जातो. भांडवलशाहीचे हे अनुकूल परिणाम नव्हेत उलट अस्तित्व आणि व्यवहार्यतेचे प्रश्न या सर्व परिणामांतून उपस्थित होतात.

रॉबर्ट मॅक्सेनेने मक्तेदारी भांडवलशाहीच्या राजकीय लोकशाहीविषयक दृष्टीने असे निरीक्षण केले की २५०० वर्षापूर्वीच ॲरिस्टॉटलने मूळ प्रश्नाचे विश्लेषण केले होते.ॲरिस्टॉटल म्हणाला होता,''खरी लोकशाही म्हणजे जेव्हा श्रीमंत संपत्तीचे मालक नव्हे तर गरजू आणि दारिद्री सत्ताधीश होतात.'' मॅक्सेने भांडवल आणि लोकशाही यांना 'पैसाशाही' (Dollarocracy)म्हणतो.तो आर्थिक बदल आणि त्यांचे राजकीय परिणाम यांतील आंतरसंबंधाचा संदर्भ देतो.

१९९५ मध्ये जगातील सर्वांत मोठ्या ६ बँकांचे होल्डिंग कंपन्यांमध्ये रूपांतर करण्यात आले. ( J.P. Morgan Chase, Bank of America, Citi Group, Weus Fargo, Goldman, Sachs, Morgan Stanley) त्याचे एकत्रित ऐवज अमेरिकन स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या १७ % होते. २००६ च्या अखेर हे मूल्य ५५ % पर्यंत आणि २०१० पर्यत आणखी ६४% पर्यत वाढले. १९७० मध्ये वित्तीय क्षेत्राचा नफा एकूण कंपनी क्षेत्राच्या १६% होता. नव्या शतकाच्या उदयसमयी तो ४०% पेक्षा अधिक झाला.

हे बदल खाजगी कंपन्यांच्या महाशक्तीच्या हिडीस क्रौर्याचे पारदर्शी दर्शन घडविणारे आहेत. अमेरिकेत अशाच धोरणांचा सर्वकाळ सातत्याने

पाठपुरावा करण्यात आला आहे. डेमॉक्रॅट पक्षाला हेच लक्ष्य साधावयाचे होते. १९७२ मध्ये डेमॉक्रॅटिक पक्षाचे अध्यक्षीय उमेदवार जॉर्ज मॅकगोव्हर्स यांनी असे प्रतिपादन केले की सध्या वॉशिंग्टनमध्ये जी स्थिती अनुभवाला येते त्यानुसार 'न भूतो न भविष्यति' असा सरकारी भ्रष्टाचार सुरू आहे.

राजकीय पक्षांची ही धरसोडीची आर्थिक धोरणे म्हणजे सामान्य माणसाचे विराजकीयकरण करण्याचे मूळ कारण आहे. ''अशा समाजाचे चित्र आगळेवेगळे उदाहरण म्हणून अमेरिकी राष्ट्रसंघात दिसू लागले आहे. बहुतेक लोकांना राजकारण किंचित अथवा मुळीच कळाले नाही. बहुतेक लोक विशेषत: कर्त्यालोकांच्या आणि गरीब लोकांच्या वर्गावर राजकारण्यांचा आणि धोरणांचा शून्य प्रभाव दिसून येतो. कोणताही पक्ष विजयी झाला तरी त्यांच्यामध्ये क्वचितच बदल घडतात किंवा मुळीच बदल घडत नाहीत.

भांडवलशाही समाजाच्या विशिष्ट दृष्टिकोनातून केलेला हा प्रवास; या वातावरणात निर्णय घेणाऱ्या विविध संस्थांची नियमने आणि करारांचा होत चाललेला ऱ्हास त्यामुळे उद्भवणारी प्रमुख समस्या म्हणजे शासनाकडून आवाक्याबाहेरच्या अपेक्षा केल्या जातात. सामाजिकशास्त्रे आणि भांडवलशाहीच्या रुळलेल्या सैद्धांतिक मार्गाने जाणाऱ्या सामाजिक शास्त्रज्ञांनी या गुंतागुंतीच्या प्रश्नांची उकल करण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

विज्ञान, तत्त्वज्ञान, भाषा, संप्रेषण, कला, संगीत, साहित्य इ. ज्ञानशाखांच्या माध्यमातून ज्या ज्या समस्या अर्थशास्त्र आणि राजकारणाच्या संदर्भात मांडल्या जातात त्यांच्याबद्दल फक्त चर्चा होतात, त्यावरील उपाययोजना वा जटिल प्रश्नांची उत्तरे मात्र सापडत नाहीत.

**विभाग –३ :**

**व्यवस्थेच्या पुनर्संघटनाची गरज :**

सध्याच्या भांडवलशाही व्यवस्थेचा उगम हा औद्योगिक भांडवलशाहीतून झाला आणि नंतर तिचे रूपांतर वित्तीय भांडवलशाहीत झाले. मात्र या व्यवस्थेतील विसंगती अगदी रिकार्डोच्या (१८२०) काळापासूनच शोधल्या गेल्यात. श्रम आणि भांडवल यांच्यातील परस्परविरोधी संबंध असणारी राजकीय अर्थव्यवस्था मांडली गेली. ही परंपरा कार्ल मार्क्स, एंगल्स, रोझा लक्झेम्बर्ग आणि इतरांच्या लेखनाने, विचारांनी कायम राखली. लक्झेम्बर्गने तर स्पष्टपणे आपले निरिक्षण नोंदविले ''एकतर समाजवाद असेल किंवा रानटी अनागोंदी राजवट !''

२० व्या शतकाची शेवटची २ दशके आणि २१ व्या शतकाचे पहिले दशक या काळात सातत्याने बौद्धीक युद्ध सुरू होते. भांडवलशाहीचे टीकात्मक परीक्षण आणि भांडवलशाहीला पाठिंबा देणारे वाङ्मय असे या संघर्षाचे स्वरूप होते. अगदी सुरूवातीच्या काळात पूर्वीच्या सरंजामशाहीपेक्षा चांगली व्यवस्था असा भांडवलशाहीविषयक दृष्टीकोन होता. मात्र नंतरच्या काळात अतिरिक्त पुरवठ्याचे प्रश्न, त्यातून दुर्मिळ संसाधनांचा अतिरिक्त वापर, पर्यावरणाचा ऱ्हास, जागतिक मुक्त व्यापाराच्या नावाखाली, नवसाम्राज्यवाद, वेगाने वाढणारी विषमता, पुनर्निर्मितीक्षम नसणाऱ्या नैसर्गिक संसाधनांची वाढती टंचाई, मंदी, स्थितीशीलता, बेरोजगारी, दारिद्र्य या सर्वांमुळे या भांडवलशाही व्यवस्थेचा तात्विक, सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळीवर ऱ्हास होत आहे हे निदर्शनास आले. याचा अर्थ ही भांडवलशाही व्यवस्था ताबडतोब कोसळेल असे मात्र नाही.

**निरीक्षणे :**

१. १८६० मध्ये कार्ल मार्क्सने आपले निरिक्षण असे नोंदविले की भांडवलशाहीला वारंवार

उद्‌भवणारी आणि दूरगामी परिणाम करणारी मंदी या आपत्तीला सातत्याने तोंड द्यावे लागेल. १९७० आणि १९९० ची मंदी त्याचेच द्योतक आहे. २००८ चा विनाश आणि मंदीचे सातत्य तर गूढ म्हणावे इतके अनाकलनीय आहे.

२. म्हणूनच विवेकी अर्थतज्ञ, सामाजिक संशोधक, सामाजिक विचारवंत या निष्कर्षाप्रत आले आहेत की ही भांडवलशाही व्यवस्था बदलण्याची गरज आहे.

**पर्याय :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेने निर्माण केलेली संरचना जर तिच्यापुढील समस्या सोडविण्यासाठी कुचकामी ठरत असेल तर याचा अर्थ असा की लवकरच तिचा ऱ्हास होणार आहे. म्हणूनच आपण संपूर्णपणे नव्याने पर्यायी सामाजिक व्यवस्थेचा विचार केला पाहिजे. त्यासाठी आवश्यक निकष पुढील प्रमाणे आहे.

१. नव्या व्यवस्थेत भांडवलशाहीचे दोष घालविण्याची क्षमता असावी.
२. जागतिक पातळीवर लोकांच्या व्यवहार्य अपेक्षा पूर्ण होण्यासाठी तांत्रिक-वैज्ञानिक संघटनात्मक ज्ञान आणि कौशल्याबरोबरच तत्त्वज्ञानातील विचारांचाही समावेश असावा.

अर्थातच व्यवस्थेतील बदल ही एका झटक्यात होणारी किंवा एखादा कायदा करून मिळवता येणारी गोष्ट नाही. ती विविध स्तरांवर अंमलात आणली गेली पाहिजे.

१. सध्याच्या व्यवस्थेसंबंधी तात्त्विक प्रश्न विचारावे.
२. सामाजिक आणि नैतिक जनप्रबोधन करावे.
३. पर्यायी राजकीय संरचनांची व्यवहार्य पुनर्निर्मिती आणि उपयुक्त प्रयोग करून पहावे.
४. हावरट, अतिश्रीमंत ग्राहकांच्या उन्मादी वर्तनाचे सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेत परिवर्तन
५. विज्ञान-अभियांत्रिकी-तंत्रज्ञान यांच्या सुयोग्य मिलाफातून समाजाच्या गरजांची पूर्तता करावी
६. निरक्षर, दारिद्र्यी वंचितांच्या प्रचंड जनसमूहाचे आशावादी, नवीन बदलांसाठी उत्सुक अशा सक्रिय सामाजिक घटकांत रूपांतर करावे.

या नव्या समाजाला घाईघाईने एखाद्या शैलीचे किंवा वादाचे (ism) नाव देणे योग्य नाही परंतु प्रत्येक क्षेत्रात, भौगोलिक, सामाजिक, राजकीय संचातील प्राधान्यक्रम, शक्यता आणि कृतीचा कार्यक्रम असाच असला पाहिजे. भविष्यातील या नव्या समाजाला उत्तर औद्योगिक, उत्तर आधुनिक, पर्यावरणाधारित, भौतिक सुखाला फारसे, महत्त्व न देणारा, सर्वत्र संयम राखणारा, लोकाभिमुख, विकेंद्रित, समाजवादी समाज म्हणून ओळखले गेले पाहिजे. त्यादिशेने प्रयत्न सुरू झाले आहेत.

**समारोप :**

एकीकडे नामवंत अमेरिकन अर्थतज्ज्ञाने अमेरिकन समाजाच्या पुनर्निर्मितीसाठी लिहिलेल्या पुस्तकात शासकीय धोरणात बुद्धाने मांडलेली तत्त्वे समाविष्ट केली जावीत अशी भूमिका घेतली तर दुसरीकडे काही लोकांनी वर्तमान तंत्रज्ञानाचे प्रतीक असणाऱ्या वेगाला विरोध करत रोमजवळ Citta slow (संथ शहर/ निवांत शहर) या वसाहतीची स्थापना केली. या वसाहतीचे वैशिष्ट्य असे की इथे जागतिक व्यापार टाळला जाईल आणि स्थानिक पातळीवर उत्पादन होणाऱ्या वस्तूंचाच वापर केला जाईल.थोडक्यात सांगायचे झाले तर कार्ल मार्क्स आणि महात्मा गांधी या दोघांनाही एकत्रितपणे लोकाश्रय मिळाल्याचेच हे द्योतक मानावे लागेल.

◆◆◆

# कौटिल्याचे अर्थशास्त्र : एक ओळख

**दि.व्यं.जहागिरदार**
अमरावती.

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने २०१२-१३ या वर्षापासून वार्षिक अधिवेशनात अर्थशास्त्र अधिवेशनात अर्थशास्त्राच्या अभिजात ग्रंथाची ओळख करून देणारे भाषण आयोजित करण्याचा उपक्रम सुरू केला. त्या अनुषंगाने परिषदेच्या ३७ व्या अधिवेशनात दि.१० फेब्रु. २०१३ रोजी दि. व्यं.जहागिरदारांनी प्रथम भाषण दिले. त्या भाषणावर आधारित लेख)

इ.स.१९०४ च्या सुमारास एका पंडिताने कौटिल्य अर्थशास्त्राची एक हस्तलिखित प्रत म्हैसूर येथील ग्रंथसंग्रहास भेट दिली. त्या ग्रंथसंग्रहाचे व्यवस्थापक श्री. श्यामशास्त्री होते. त्यांनी हे हस्तलिखित इ.स. १९०९ मध्ये प्रसिद्ध केले. पुढे १९१४ मध्ये इंग्रजी भाषेतही ते प्रसिद्ध झाले. अशा प्रकारे २३०० वर्षापूर्वी लिहिलेला ग्रंथ जगापुढे आला. राजनीतिशास्त्रावरील हा सर्वात जुना ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचा समावेश जागतिक वाङ्मयात केला जातो.

मुंबईच्या एल्फिस्टन महाविद्यालयातील संस्कृतचे प्राध्यापक गोविंद गोपाळ टिपणीस यांनी इ.स. १९२३ मध्ये 'कौटिल्य अर्थशास्त्र प्रदीप' हे कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरील पुस्तक प्रसिद्ध केले. ते पुस्तक संक्षेपाचे रूपाने प्रसिद्ध झाले असले तरी प्रथमतः मराठी पुस्तकातून कौटिल्य अर्थशास्त्राची माहिती मराठी वाचकांसमोर आली. इ.स. १९२० मध्ये प्रबोधनकार ठाकरे यांनी प्रा. टिपणीसांना शामशास्त्री यांनी प्रसिद्ध केलेले पुस्तक दाखविले आणि त्यावर काही तरी लिखाण करा असे सुचविले होते.इ.स. १९२७ मध्ये कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे संपूर्ण मराठीत भाषांतर करून ब.रा. हिवरकरांनी सविस्तर प्रस्तावना लिहून'कौटिलीय अर्थशास्त्र' ह्या शीर्षकाखाली प्रसिद्ध केले. इ.स. १९८८ मध्ये त्याची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्यास दुर्गा भागवत यांची प्रस्तावना लाभली. मुंबई विद्यापीठातर्फे आर.पी.कंगले यांचा The Kautilya Arthashastra हा ग्रंथ (तीन खंड) प्रसिद्ध झाला. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने इ.स. १९८२ मध्ये कंगल्यांच्या ग्रंथाचे मराठीतून भाषांतर प्रसिद्ध केले. गेल्या १०-१५ वर्षात कौटिल्याच्या अर्थशास्त्रावर हिंदी, इंग्रजी व मराठीतूनही लेख तसेच माहितीपर पुस्तके प्रसिद्ध होत आहेत.

अर्थशास्त्राच्या विचारांचा इतिहास अनेक ग्रंथकारांनी लिहिला आहे. आधुनिक अर्थशास्त्र उदयास येण्यापूर्वीचे आर्थिक विचार त्रोटकपणे हे ग्रंथकार विशद करतात. हॅने यांचा History of Economic Thought हा अर्थशास्त्राच्या विचारांचा इतिहास सांगणारे एक हजार पानांचे जाडजूड पुस्तक होय. या पुस्तकात ४०-५० पानांमध्ये हेब्रू आणि हिंदूच्या काही महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. एरिक रोल यांच्या ग्रंथात प्राचीन आर्थिक विचार मांडतांना भारतीय प्राचीन आर्थिक विचारांचा कुठेही उल्लेख सुद्धा केला नाही. ज्या भारतीय लेखकांनी हा इतिहास लिहिला त्यांनीही आपले पुस्तक पाश्चिमात्य लेखकांच्या पुस्तकावर बेतल्याने त्यांच्या

पुस्तकातून भारतीय प्राचीन आर्थिक विचारांचा मामुली किंवा नगण्य उल्लेख आढळून येतो. मात्र हे खरे की इ.स. १९ व्या शतकापासून Ancient Indian Polity वर लिखाण करणाऱ्या अय्यंगार, रामकृष्ण भांडारकर, जयस्वाल यांच्या लिखाणातून भारतातील जुने आर्थिक विचार प्रगट झाले आहेत. पण त्यामध्ये कौटिल्याचे आर्थिक विचारांचा उल्लेख नव्हता.

अर्थशास्त्राचा लेखक कौटिल्य हा विष्णूगुप्त आणि चाणक्य या नावांनीही ओळखला जातो. अर्थशास्त्राच्या निर्मितीच्या कालखंडाबाबत काही मतमतांतरे असली तरी हे आता मान्य झाले आहे की, कौटिल्य वा चाणक्य हा चंद्रगुप्ताचा गुरू असून त्याच्याच प्रेरणेमुळे चंद्रगुप्ताला आपले साम्राज्य विस्तारता आले. चंद्रगुप्त मौर्याचा कालखंड इ.स.पूर्व ३२२ ते २९८ असा आहे. म्हणजे कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ २३०० वर्षांपूर्वी लिहिल्या गेला होता. चंद्रगुप्त मौर्याचे साम्राज्य केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न व सामर्थ्यवानच नव्हते, तर त्याचा कारभार अत्यंत व्यवस्थित व नियमानुसार चालणारा होता. व्हिंसेट स्मिथ हा प्रसिद्ध इतिहासकार (Oxford History of India) म्हणतो की,'' पाटलीपुत्राची रूपरेखा व व्यवस्था पाहिली तर मन आश्चर्याने थक्क होते.'' चंद्रगुप्तच्या कारभाराची भारतीय व पाश्चिमात्य इतिहासकारांनी स्तुती केली आहे. याबाबत अधिकृत माहिती हवी असणाऱ्यांनी विल डुरांट यांच्या ''अवर ओरियंटल हेरिटेज'' या प्रथम खंडातील इंडिया ॲन्ड हर नेबर्स हा विभाग पहावा. प्राचीन काळी विविध विचारांचे वर्गीकरण आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा प्रकारे केले जात नव्हते. हे सर्व व्यवहार परस्परांशी निगडीत मानले जात व त्यांच्याकडे समग्र दृष्टीने पाहण्याची परंपरा होती. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर असे दिसते की कौटिल्याच्या आधी गौतम, नारद, वसिष्ट स्मृती व आश्वालयनासारखी बोधसूत्रे प्रचलित होती तर कौटिल्यानंतर याज्ञवस्क्य, विष्णू, हरित स्मृती निर्माण झाल्यात.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात एकूण १५ अधिकरणे असून प्रत्येक अधिकरणात विशिष्ट संख्येचे अध्याय (सध्याच्या भाषेत -प्रकरण) आहेत. एकूण अध्याय १५० आहेत. त्यापैकी पहिले व दुसरे अधिकरण आकाराने मोठे आहे. पहिल्या अधिकरणात २१ अध्याय तर दुसऱ्या अधिकरणात ३६ अध्याय म्हणजे या दोन अधिकरणात ५७ अध्याय आहेत. १४ वे आणि १५ वे अधिकरण लहान असून त्यात अनुक्रमे ४ आणि केवळ १ अध्याय आहे.

कौटिल्याने जे अर्थशास्त्र सांगितले ते आजच्या अर्थशास्त्रापेक्षा भिन्न आहे. त्याने पंधराव्या अधिकरणात (अध्याय १५०) अर्थशास्त्रांची पुढीलप्रमाणे परिभाषा केली आहे. ''मनुष्यांच्या चरितार्थाचे जे साधन तो अर्थ. ज्या भूमीवर मनुष्याची वस्ती आहे ती भूमी म्हणजे अर्थ. अशा भूमीचा लाभ व तिचे पालन या संबंधी उपाय सांगणारे जे शास्त्र ते अर्थशास्त्र'' कौटिल्याचे अर्थशास्त्र हे राज्यकारभाराचे शास्त्र आहे. त्याचा मूळ गाभा प्रसाशन आहे. अर्थात हा विषय राज्यशास्त्रात अन्तर्भूत होतो. धर्म, अर्थ, काम या त्रिवर्गातील ''अर्थ'' सर्वपरिचित व सुप्रसिद्ध आहे. अर्थ म्हणजे इहलोकीच्या जीवनातील समृध्दता असा अर्थाचा खरा अर्थ मानला जातो. ही समृद्धता भूमी व मानवाच्या श्रमातून निर्माण होते. समृद्धता निर्माण करणाऱ्या सर्व बाबी राज्य व्यवहारांशी संबंधित आहे. अशा या अर्थशास्त्रास दंडनीतीशास्त्र वा राज्यशास्त्रही म्हणता येऊ शकेल. प्राचीन दंडनीतीत ज्या विषयांची यादी दिली आहे ते

बहुतेक सर्व विषय कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील विषयांशी जुळणारे आहेत. त्यामुळे दंडनीती व अर्थशास्त्र एकच आहे असे मानता येते. अर्थशास्त्र हे नाव महाभारत काळातही परिचित असावे असे दिसते. कारण त्यात एके ठिकाणी पार्थ किंवा अर्जुनाला 'अर्थशास्त्र विशारद' म्हटले आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात जी १५ अधिकरणे आहेत त्याचे प्रमुख २ भाग आहेत, असे म्हणता येईल. पहिल्या भागात जी पाच अधिकरणे आहेत त्यात राज्यकारभार विषयक विवेचन आहे, म्हणजे त्यात राज्यकारभाराचे तंत्र विशद केले आहे. तर दुसऱ्या भागात आपण आठ अधिकरणे समाविष्ट करू शकतो की ज्यात या तंत्राचा वापर कसा करावा या संबंधात सविस्तर विवेचन केले आहे. उर्वरित १४ व्या आणि १५ व्या अधिकरणात अनुक्रमे जारणमारण, मंत्रसिद्धी व जादूटोणा आणि लेखन पद्धती स्पष्ट केली आहे.

पहिल्या अधिकरणात (२१ अध्याय) राज्यकारभाराची मध्यवर्ती यंत्रणा, राजा व त्याचे शिक्षण, राजवाडा आणि त्याची सुरक्षितता, राज्याचे सरदार, मंत्री, पुरोहित इ. च्या नेमणुका, हेरांचे महत्त्व व त्यांचे जाळे, परराष्ट्रात पाठवावयाचे राजदूत व त्यांचे कार्य इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींची चर्चा केली आहे. दुसऱ्या अधिकरणात (३६ अध्याय) प्रथमत: नवीन गावे बसविणे व त्यास उत्तेजन देणे याची चर्चा आहे. शेतसारा, तगाई, सूट केव्हा द्यावी, जंगलांचे रक्षण कसे करावे अशा बाबी स्पष्ट करताना अतिशय काळजीपूर्वक बारीक-सारीक बाबी तपशीलवार सांगितल्या आहेत. विशेषत: गावातील लोकांचे सहकार्य मिळवण्यावर भर दिला आहे. या अधिकरणातील २७ व्या अध्यायात कर व त्यांच्या वसुलीची चर्चा आहे. सरकारी उत्पन्नाचे ३१ स्रोत असून जकात, दंड, वजन व मापे वापरण्याचा कर, अबकारी वस्तूंवरील कर, पशूविक्री, शेतसारा, करमणुकांवरील कर इत्यादींची सविस्तर चर्चा आहे. कर आकारणीबाबत असे दिसते की, उपभोग्य वस्तूंवर ४ ते ५ प्रतिशत (किंमत आधारावर) कर आहे तर रेशीम, लोकर, चंदन, चामडे, मद्य अशा वस्तूंवर त्यांच्या किंमतीच्या ६.५ ते १० प्रतिशत कर आहे. विशेष म्हणजे देशातून बाहेर जाणाऱ्या वस्तूंवर (निर्यात) आणि देशात बाहेरून येणाऱ्या वस्तूंवर (आयात) सारख्या दराने कर लावला जाई. कौटिल्याने खर्चाची १२ खाती वा पदे सांगितलीत. राजावर शासनाला करावा लागणारा खर्च, मंत्री, अमान्य इ. ना द्यावा लागणारा पगार, चतुरंग लष्कर, परराज्यात ठेवलेले वकील, पशुपक्षी संग्रहालय, सरकारी खिल्लारे इ. शासनाचे/राज्याचे उत्पन्न व खर्च पाहता तत्कालीन समाजाचा दर्जा उच्च असल्याचे दिसते. तसेच समाजात एकूण आर्थिक संपन्नता जाणवते. चंद्रगुप्त मौर्याचे काळात ज्या परदेशी प्रवाशांनी आपापले वृत्तांत लिहिलेत त्यात तत्कालीन सुबत्तेची वर्णने आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. या अधिकरणातील उर्वरित प्रकरणांमध्ये रत्नांची पारख, अधिकाऱ्यांच्या परीक्षा, खाणींचा वापर, वजने व मापे यांची कोष्टके, सूत काढणे व कापड तयार करणे, कसाईखाने इ. बाबत अत्यंत रोचक माहिती दिली आहे. अधिकरण तीनमध्ये भाऊबंदांच्या वाटणीची पद्धत, घर कसे बांधावे,गायराने, रस्ते, शेते यांच्या नुकसानाबद्दल शिक्षा, मजूर व मालक यांच्यातील संबंध अशा बाबींचे विवेचन आहे. अध्याय ६४ मध्ये घरासंबंधी इतके बारकाईने विवेचन केले आहे की आपल्यास नवल वाटावे. घरात मोरी, पायखाना (संडास) व

विहीर असली पाहिजे. दोन घरांमध्ये किती अंतर असावे याचीही सूचना केली आहे. मोरीतून पाणी वाहून जाण्यासाठी योग्य ढाळ असावा. अशा बाबी पूर्ण न झाल्यास त्यावर दंड केला जाईल. सध्या नगर रचना करणाऱ्या नागरी संस्थांनी घर बांधण्याची परवानगी देताना या सूचना वाचाव्यात इतक्या त्या महत्त्वाच्या ठरतात. समाजकंटकांचा बंदोबस्त; आकस्मिक व आपत्ती निवारण्याचे उपाय, कारकून, सरकारी अधिकारी तसेच न्यायाधीश यांच्या चुकांना द्यावयाची शिक्षा, बलात्कार करणाऱ्यावर ठोठावायचा दंड, शासन वा राज्याविरुद्ध केलेल्या गुन्ह्याचा विचार, नोकरशाहीतील कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी (ही वेतनश्रेणी वेगवेगळ्या पातळ्यांवरील कर्मचाऱ्यांसाठी भिन्न भिन्न आहे); देशाने कोणाशी मैत्री ठेवावी, ती कोणत्या अटींवर करावी; शत्रूवर स्वारी कशी व केव्हा करावी, इ. विविध बाबींचा काटेकोरपणे विचार केला आहे. सैन्याचे ३ प्रकार सांगितले आहेत.१) पिढीजात सैन्य २) पगारी सैन्य आणि ३) सरंजामी सैन्य. युद्धकाळात छावणी कोठे करावी हे सांगून कौटिल्याने युद्धात व्यूहरचनेचे जवळ-जवळ ३५ प्रकार सांगितले आहे. सैनिकशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांनी या व्यूहरचनेचा अभ्यास केला पाहिजे. शत्रूचा प्रदेश कसा ताब्यात घ्यावा, गुप्तवधाचे मार्ग, विविध संघांमध्ये फूट कशी पाडावी याचाही विधिनिषेध न पाळता कोणती कृती करावी याचीही चर्चा केली आहे. चौदाव्या प्रकरणात जादूटोणा, जारणमारण व मंत्रसिद्धी विषद केली आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील १५० व्या अध्यायाचे शीर्षक आहे. 'तंत्रयुक्तय:', या प्रकरणात कौटिल्याला अभिप्रेत असलेल्या अर्थशास्त्राची परिभाषा असल्याचा उल्लेख यापूर्वीच केला आहे. या प्रकरणात अर्थशास्त्राचे जे सविस्तर विवेचन कौटिल्याने केले आहे ते करताना त्याने ३२ प्रकार उपयोगात आणले असून प्रत्येकाचा उल्लेख व अर्थ सांगून त्याचा वापर कुठे-कोणत्या अधिकरणात व अध्यायात झाला हे ही दर्शविले आहे. हे प्रकार मुळातूनच वाचले पाहिजे. हे प्रकार वाचल्यावर हे लक्षात येते की त्याने लेखन पद्धती कशी असावी याचा एक उत्कृष्ट नमुना सादर केला आहे.

अनेक वेळा कौटिल्यीय अर्थशास्त्राची तुलना मेकिअॅवेलीच्या तत्त्वज्ञानाशी केली जाते. इ.स. १४६७ ते १५२७ हा त्याचा काळ होय. त्याने लिहिलेल्या The Prince या पुस्तकावरून ही तुलना केली जाते. साहित्य अकादमी, दिल्ली यांनी या पुस्तकाचे मराठी भाषांतर ५० वर्षापूर्वी (१९६३) प्रसिद्ध केले होते. त्याने राजाला हे पुस्तक समर्पित केले आहे. या पुस्तकात जवळपास २६ प्रकरणे आहेत. त्याची शीर्षके वाचलीत तर राजाने कसे व्यवहार करावेत याबाबत विवेचन आहे. अर्थात हे विषय कौटिल्यानेही हाताळले आहेत. उदा. 'कपटीपणाने राज्यपद मिळविण्याविषयी' हे प्रकरण वाचताना आपणास कौटिल्याची विचारसरणी आठवते. त्याने कुटीलतेचा पुरस्कर केला होता. पण हे लक्षात घेतले पाहिजे की, कौटिल्याचे अर्थशास्त्र अत्यंत व्यापक आहे. त्यात विविध बाबींची सविस्तर चर्चा आहे तर मॅकिअॅवेलीचे पुस्तकातील विवेचन सीमित विषयाला धरून आहे. त्यामुळे कौटिल्य व मेकिअॅवेलीच्या पुस्तकांची जी तुलना केली जाते ती फार मर्यादित विषयांवर आणि मुद्यांवर केली जाते हे लक्षात ठेवावे.

कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहतांना वैभव संपन्न व सामर्थ्यशाली राज्य निर्माण करणे हा

उद्देश होता. त्यादृष्टीने त्याने अर्थकारण, प्रशासन, परराष्ट्रीय धोरण, व्यापारविषयक बाबी, सैनिकी महत्त्व, नगर रचना, शेती विकास अशा विविध प्रश्नांचा सविस्तर व तार्कीकतेने विचार केला. त्याने सांगितलेली कर व्यवस्था आजही यथार्थ वाटते. परराष्ट्रीय धोरणातील त्याचे विचार त्याच्या चाणाक्ष वृत्तीचे द्योतक असून प्रशासनातील त्याची दृष्टी अत्यंत व्यापक आहे. चांगल्या प्रशासनासाठी त्याने केलेले विवेचन तत्कालीन स्थितीला धरून असले तरी त्यातील अनेक बाबी आजही व्यवहार्य मानाव्या लागतात. भाषेच्या दृष्टीने हा ग्रंथ अलौकिकच मानावा लागतो. सूत्रमय पद्धतीने त्याने विविध विषयांचे परखड विवेचन केले आहे. एवढा गुणसंपन्न असा हा ग्रंथ असूनही त्याकडे फारसे लक्ष अनेकांनी दिले नाहीत हे ही नमूद करावे लागेल.

◆◆◆

# त्रिकूट ठरले २०१३ च्या अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचे मानकरी : फामा, हॅनसन आणि शिलर

**विनायक श्रीधर देशपांडे**
प्राध्यापक व विभागप्रमुख,
व्यवसाय व्यवस्थापन विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,

**प्रस्तावना :**

शिकागो विद्यापीठाच्या युगेन फामा यांनी अल्पकाळात नव्याने प्राप्त होणाऱ्या माहितीचा अंतर्भाव केल्यास शेअरच्या; किंमती बाबतचे भाकीत करणे अतिशय अवघड असल्याचे सिद्ध करुन दाखविले. याच विद्यापीठातील लार्स पिटर हॅन्सन यांनी मालमत्ता किंमतीच्या सिध्दांताची चांचणी करणे शक्य व्हावे म्हणून सांख्यिकिय पध्दत विकसित केली. तर येल विद्यापीठाच्या रॉबर्ट शिलर यांनी निगम लाभांशा (Dividend) पेक्षा रोख्यांच्या किंमतीमधील बदल अधिक जोमाने कसे होतात याचा शोध लावला.

युगेन एफ.फामा अमेरिकेचे नागरीक असून यांचा जन्म १९३९ साली बोस्टन येथे झाला. शिकागो विद्यापीठातुन १९६४ साली आचार्य पदवी प्राप्त करुन याच विद्यापीठात ते वित्त या विषयाच्या प्राध्यापक पदी रुजू झाले.

लार्स पिटर हॅन्सन हे सुध्दा अमेरिकेचे नागरिक असून १९५२ साली त्यांचा जन्म झाला आणि १९७८ साली मिनेसोटा विद्यापीठाची आचार्य पदवी संपादन करुन शिकागो विद्यापीठाच्या अर्थशास्त्र आणि सांख्यिकी या विषयाच्या प्राध्यापक पदी विराजमान झाले.

रॉबर्ट जे. शिलर हे देखील अमेरिकेचे नागरिक असून डेट्रॉईट येथे १९४६ साली त्यांचा जन्म झाला. मॅसाश्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (एम. आय.टी.) येथुन त्यांनी आचार्य पदवी संपादीत केली आणि येल विद्यापीठाच्या अर्थशास्त्र या विषयाच्या प्राध्यापक पदी ते नियुक्त झाले. मालमत्तेच्या किंमतींचे अनुभवाधिष्ठित विश्लेषण केल्या बध्दल या तिघांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा.शिलर हे त्यांच्या अविवेकाची विपुलता (Irrational Exuberance) या ग्रंथात वित्तीय बुडबुडा या संदर्भात केलेल्या कार्यामुळे प्रसिद्धीच्या झोतात आले. समाजात एक प्रकारची लागण असल्याने आणि साथीच्या रोगासारखी लोकांची वर्तणूक असल्याने वित्तीय बुडबुडे पुन्हा-पुन्हा निर्माण होणार. सद्या संपूर्ण जगतामध्ये रोखे, मालमत्ता बाजार फसफसलेला/बुडबुडयांनी भरलेला अशा स्वरुपाचा झाला आहे. गेल्या वर्षापासून बरेच देश मालमत्ता बुडबुड्याचा सामना करीत आहेत. वरवर बाजार वधारीत असल्याचे दिसते, प्रत्यक्षात मात्र तसे नसते आणि संपत्तीच्या किंमती वाढत असतात. या वाढणाऱ्या किंमती बाजाराच्या मूलभूत तत्वानुसार वाढतीलच असे नाही, केवळ अनुमानामुळे देखील मालमत्ता बाजाराच्या किंमतीवर परिणाम होऊ

शकतो. मालमत्तेच्या किंमतीत तीव्रपणे वाढ होणे या वाढीमुळे लोकांच्या अपेक्षा वाढीस लागणे आणि नवे क्रेते आकृष्ट होणे या प्रक्रियेला बुडबुडा निर्माण होणे म्हणतात. अटकळ बांधणी करणाऱ्यांना संपत्तीच्या वापरातुन उत्पन्न किंवा प्राप्ती क्षमता वाढविण्यात सारस्व नसते तर या संपत्तीच्या व्यापारातुनच नफा प्राप्त करण्यास ते अधिक उत्सुक असतात.अशा प्रकारच्या वाढणाऱ्या किंमती असमर्थनीय असून अधिकच्या किंमतीला मालमत्तेची लगेच विक्री करायची या एकमेव उद्देशाने गुंतवणुकदाराने संपत्तीची खरेदी केल्यास संपत्तीच्या वाढणाऱ्या किंमती अधिक जोमाने वाढतात. मालमत्तेचे किंमत निर्धारण रोख प्रवाह आणि कसर दर या आर्थिक मूलभूत घटकांच्या आधारे व्हावयास हवे अशी अपेक्षा असते. बुडबुडा निर्माण झाल्यास मालमत्तेच्या वाढणाऱ्या किंमतीच्या काही भागाचे आर्थिक घटकांच्या आधारे स्पष्टीकरण देता येत नाही. खरे तर मालमत्तेच्या किमतींवर परिणाम करणारे आर्थिक मूलभूत घटक पडताळुन पाहणे देखील तितकेसे सोपे नाही.

**संपत्ती बाजारातील प्रवाह हुडकून काढणे :**

पुढील काही दिवसांसाठी किंवा आठवडयासाठी रोखे आणि बंधपत्राच्या किंमती बाबतचे भाकीत वर्तविणे कदापी शक्य नाही, परंतु दीर्घ कालावधीसाठी जसे तीन ते पाच वर्षासाठी या किंमतींचा साधारण कल कसा राहू शकेल या बाबत आगाऊ चिन्हे प्राप्त होणे शक्य आहे. हा शोध कदाचीत आश्चर्यकारक आणि विसंगत वाटेल, परंतु २०१३ च्या नोबेल पारितोषिक विजेत्यांनी हेच नेमके विश्लेषण केल्याचे आढळते. १९६० च्या सुरुवातीस युगेन फामा आणि विविध सहकार्यांनी नव्या माहितीचा अंतर्भाव किंमतींमध्ये जलदगतीने होत असल्याने अल्प कालावधीत स्कंधाच्या किंमती बाबत भाकीत वर्तविणे कसे अवघड आहे हे दर्शविले. याचा परिणाम भावी संशोधनावर तर झालाच शिवाय बाजार व्यवहारावर देखील बदल घडावयास लागले. जगभरातील रोखे बाजारात निर्देशांक निधीचा उदय हे त्याचेच द्योतक आहे. १९८० च्या सुरुवातीला रॉबर्ट शिलर यांनी असा शोध लावला की निगम लाभांशाच्या तुलनेत रोखे बाजारातील बदल जास्त झपाटयाने होतात. किंमती आणि लाभांश यातील प्रमाणाचे मूल्य लाभांश वाढल्यास घसरते आणि लाभांशा मध्ये घट झाल्यास या प्रमाणात वाढ होते. ही रचना फक्त रोख्यांनाच लागू होते असे नव्हे तर बंधपत्रे (Bonds) आणि इतर संपत्तीच्या बाबत देखील अशीच रचना आढळते. अपूर्व जोखिमीच्या काळात भविष्यातील उच्च परताव्याकडे जोखिम असलेली संपत्ती बाळगणे म्हणजे भरपाईच्या दृष्टिकोनातून बघण्यात येते. संपत्ती किंमत निर्धारणाच्या तर्कसंगत सिध्दांताची सुयोग्य चाचणी पद्धत विकसित करण्याचे दृष्टिने सांख्यिकीय पद्धत लार्स पिटर हॅन्सन यांनी शोधुन काढली. संपत्ती किंमतीचे स्पष्टीकरण देण्यास हे सुधार हॅन्सन आणि इतर संशोधकांनी केल्याने दीर्घ काळासाठी उपयुक्त ठरु शकेल असे मानण्यात येते.

**वर्तणूकीचे वित्त : (Behavioural Finance)**

तर्कसंगत गुंतवणुकदारांच्या वर्तणूकीत होणारी फारकत यावर या दृष्टिकोनाचा भर असल्याने वर्तणूकीचे वित्त यात असलेल्या संस्थात्मक बंधनामुळे जसे कर्ज काढण्यावर मर्यादा यामुळे छोटया गुंतवणुकदारांवर बाजारातील चुकीच्या किंमतीच्या आघारे व्यवहार करण्यास बंधने येऊ शकतात.

प्रचलीत संपत्ती किंमत निर्धारणाची पद्धत समजुन घेण्याच्या दृष्टिने या नोबेल पुरस्काराच्या मानकऱ्यांनी मूलभूत पाया रोवला असे मानण्यात येते. काही अंशी जोखिमेत होणारे बदल आणि जोखिमीची प्रवृत्ती आणि काही प्रमाणात वर्तणूक पक्षपात तसेच बाजारातील घर्षण यावर संपत्तीच्या किंमती अवलंबून असतात हे दर्शविण्याचा प्रयत्न या त्रयींनी केल्याचे आढळते.

बँकींग क्षेत्रातील अध:पतनाचे भविष्य वर्तविण्यास अर्थशास्त्रज्ञ अपयशी ठरले अशी टीका सर्वत्र होत असतांना नोबेल समितीने वित्तीय बाजार कसा कार्यरत असतो हे दर्शविणाऱ्या तीन विदयानिष्ठ व्यक्तींची नोबेल पारितोषिकासाठी घोषणा केली. वित्तीय बुडबुडा अस्तित्वात असतो हे ७४ वर्षीय फामा यांना मान्य नव्हते. सौम्य मंदी, भांडवल प्रधान अर्थव्यवस्थेचे स्पष्टीकरण न देऊ शकणारी कायमची स्थिती असते आणि काही कालावधीनंतर यावर आपोआप तोडगा निघु शकतो हे मानणाऱ्यांपैकी फामा आहेत. बाहय घटक जसे अंतर्गत व्यवहार आणि शासकीय विनियमन वित्तीय कार्यपध्दतीत विरुपन कसे निर्माण करतात याचे परीक्षण त्यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमाने केले. बँकींग अध:पतनानंतर फामा यांनी अमेरिकेच्या शासनकर्त्यांनी कर्ज प्राप्त करण्यावर बंधने घातल्याने आरिष्टाचा प्रश्न अधिकाधिक गुंतागुंतीचा झाला असा युक्तीवाद केला. मंदीमुळे वित्तीय बाजार दुर्घटनाग्रस्त झाला. वित्तीय बाजार मंदीचे कारण नाही. रोखे बाजार आणि इतर संपत्ती बाजार कसे कार्यरत असतात या बाबतचे प्रतिमान तयार करण्यात फामा यांनी विशेष नैपुण्य प्राप्त केले. आर्थिक भूमिका वठविणारे बदलत्या वातावरणाशी आणि जोखिमीशी कशा प्रकारे झुंज देतात या बाबतचे प्रतिमान विकसित करण्याचे कार्य हॅन्सन यांनी केले. संपत्तीचे अति मूल्यांकन झाल्यास त्याचे मापन शक्य होत नाही असे फामा मानतात. बाजार अशाश्वत बुडबुडयाला कसा बळी पडतो हे शिलर यांनी पुराव्यानिशी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

**कार्यक्षम किंमती आणि फसवा बाजार :**

पैसा बनविण्यासाठी वित्त रचनेची निर्मिती झाली नसून समाजाच्या कल्याणासाठी पैसा निर्माण करण्यात येतो असे शिलर मानतात. अविवेकाची विपुलता (Irrational Exuberance) हा त्यांचा ग्रंथ २००० साली प्रकाशित झाला. बाजाराच्या माध्यमाने संपत्तीच्या किंमती नेहमीच बुडबुडे निर्माण न होता कार्यक्षमतेने निर्धारित होतात ही कल्पनाच दांभिक स्वरुपाची आहे असे शिलर यांनी या ग्रंथात दर्शविले. मुक्त बाजाराला पाठींबा देणाऱ्या शिकागो विद्यापीठातील इतर बऱ्याच विद्यानिष्ठ व्यक्तींच्या तुलनेत फामा कमी दुराग्रही वाटतात.

१९८२ साली हॅन्सन यांनी तात्कालिक क्षणांची सामान्यीकरण पद्धती (Generalized Method of Moments) या सांख्यिकीय सिध्दांताची मांडणी केली. एका विशिष्ट काळात संपत्तीच्या किंमतीचे प्रतिमान ऐतिहासिक शेअर किंमतीशी सुसंगत असते अथवा नाही याची चाचणी उपरोक्त सांख्यिकीय सिध्दांताच्या माध्यमाने हॅन्सन यांनी केली. शेअरच्या किंमतींमध्ये होणाऱ्या बदलांचे स्पष्टिकरण वापरण्यात येणाऱ्या पध्दतींच्या सहायाने प्राप्त होत नसल्याने या पद्धती नाकारण्यात याव्या असे हॅन्सन यांचे मत होते. शिलर यांच्या बुडबुडयाच्या संबंधिच्या प्राथमिक शोधाला हॅन्सन यांच्या कार्यामुळे बळकटी प्राप्त झाली. शिलर यांचा अकार्यक्षम बाजार सिध्दांत

आणि फामा यांची दुसऱ्या बाजुला स्वीकारण्यात आलेली कार्यक्षम बाजाराची कल्पना या दाहोंमध्ये परिपूर्ण समतोल प्रस्थापित झाला असे मानण्यात येते.

युगेन फामा यांना आधुनिक वित्ताचे जनक म्हणून ओळखण्यात येते. शिलर यांच्या अगदी विरोधी मते फामा यांची आहेत. 'कार्यक्षम बाजार परिकल्पना' हा फामा यांच्या मांडणीचा आधार आहे. संपत्तीच्या मुल्यासंबंधी सर्व ज्ञात असलेल्या माहितीचा अंतर्भाव बाजारात होतो, त्यामुळे कुठल्या बाजुला बाजाराचा झुकाव राहील हे बघण्याचा प्रयत्न करणे समर्पक होणार नाही ही कल्पना फामा यांनी सुचविली.

डॉटकॉम बुडबुडा आणि अमेरिकेतील गडगडणाऱ्या घरांच्या किंमती या बाबत चे भाकीत वर्तवू शकणाऱ्या काही निवडक अर्थशास्त्रज्ञांपैकी रॉबर्ट शिलर हे एक आहेत असे समजण्यात येते.त्यांचे नुकतेच प्रकाशित झालेले पुस्तक वित्त आणि चांगला समाज (Finance and the Good Society) वित्तीय सुधारांच्या लाभाबाबतचे आहे.

**संपत्ती किंमत विश्लेषण :**

व्यक्ती आपल्या बचतीची निवड कसे करतात आणि सरकारे अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा कोणता मार्ग अवलंबितात यावर संपत्ती किंमत विश्लेषणाचा प्रभाव पडतो. किंमत निर्धारण योग्यरित्या न झाल्यास आर्थिक बुडबुडे आणि आरिष्टाशी अर्थव्यवस्थेला सामना करावा लागतो. वित्तीय गंडांतराच्या वेळी धोका कसा निर्माण होतो याचा अनुभव वित्तीय अरिष्टाच्या वेळी आला. विद्यानिष्ठ संशोधन, सिध्दांत विकसित करण्यासाठी मार्गदर्शक यथार्थ ज्ञान आणि व्यावसायिक गुंतवणूक व्यवहारांसाठी या पारितोषिक विजेत्यांनी विकसित केलेल्या पद्धती म्हणजे प्रमाणित साधने झालीत.

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे स्कंधाच्या किंमतीमधील अल्पकालीन बदलाबाबतचे भाकीत वर्तविणे जवळपास अशक्य आहे असे शिकागो विद्यापीठाचे प्राध्यापक फामा यांनी शोधुन काढले.या आठवडयातील स्कंधाच्या किंमतीचे निर्धारण करण्यासाठी गत आठवडयात स्कंधांची कामगिरी कशी होती या बाबतच्या माहितीचा फारसा उपयोग होत नाही हे १९६० साली त्यांनी दर्शविले. नवी माहिती जसे, लाभांशाची घोषणा आणि अधिकार भाग प्रचालन याचा अंतर्भाव लगेच भागांच्या मूल्यात होतो. अशा मोठया बातम्यांमुळे रोख्यांच्या किंमतींचा कल स्वैरतेकडे आगेकुच करण्याकडे असतो. नव्या माहितीच्या संदर्भातील प्रतिसाद मंदगतीने असल्यास किंमती बाबतचे भाकीत अधिक स्थिर स्वरुपाचे होते. मोठया बाजारांशी रोख्यांचा संबंध असल्यास भाकीत करण्याचे सामर्थ्य कमी होते, परंतु पुस्तकी मूल्य आणि बाजार मूल्य याची तुलना बाजाराचे भांडवलीकरण आणि प्रमाण या दोहोंशी केल्यास भाकीत वर्तविणे अधिक सोयीचे होते. १९६० सालच्या फामा यांनी केलेल्या कार्यात १९८० साली शिलर यांनी अधिक क्लिष्टता वाढविली. रोख्यांच्या किंमतीतील बदल मुलगामी मूलभूत लाभांश प्राप्ति पेक्षा अधिक असतात हे त्यांनी दर्शवून फामा यांच्या निष्कर्षाला दुजोरा दिला. रोख्यांचे मूल्यांकन अपेक्षित भावी लाभांशाशी मिळते जुळते असते या पारंपरिक शोधाला आव्हान दिले.परंतु किंमतीचे लाभांशाशी असलेले प्रमाण जास्त असल्यास दीर्घ कालावधीत किंमतीचा कल घसरण्याकडे असतो. हे प्रमाण कमी असल्यास दीर्घ कालावधीत रोख्यांच्या किंमती वाढीस लागतात. ही रचना बंधपत्रे आणि इतर संपत्तीला

लागू होऊ शकते हे शिलर यांनी दाखविले. शिलर यांच्या कार्यामुळे गुंतवणुकदारांची तर्कसंगती, किंमती मधील बदल आणि वटवणी या संदर्भात नवे प्रश्न निर्माण झाले. शिकागो विद्यापीठाच्या लार्स पिटर हॅन्सन यांनी तात्कालिक क्षणांची सामान्यीकरण पद्धती (Generalized Method of Moments) या सांख्यिकीय प्रतिमानाच्या आधारे संपत्तीच्या किंमती, बचती आणि जोखिम यांचा अंतर्भाव करुन उपरोक्त प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला. संपत्तीच्या किंमत निर्धारणाच्या लोकप्रिय कल्पनांचे खंडण या प्रतिमानाच्या आधारे हॅन्सन यांनी केले आणि शिलर यांच्या निष्कर्षाला बळकटी प्राप्त करुन दिली. फामा, हॅन्सन आणि शिलर यांच्या कार्यामुळे निर्देशांक निधी,जोखिमेचे अध्ययन, आणि वित्त वर्तणूक या क्षेत्रांना लोकप्रियता प्राप्त झाली.

**कार्यक्षमतेचे प्रकार** :

फामा यांनी तीन प्रकारच्या कार्यक्षमता विचारार्थ मांडल्या १) अभेद्य रचना (Strong-form) २) अर्ध अभेद्य रचना (Semi-strong form) आणि ३)कमकुवत कार्यक्षमता (Weak efficiency) कार्यक्षमतेचे वर्गीकरण कुठल्या प्रकारची माहिती किंमतीमध्ये अंतर्भूत करण्यात आली या संदर्भात करण्यात येते. कमकुवत कार्यक्षमतेत किंमतीचे भाकीत निव्वळ ऐतिहासिक किंमती बाबतच्या माहितीवर आधारित असते या आधारे नफा किती प्राप्त होणार हे शोधणे अशक्य होते. अर्ध अभेदय रचनेत सार्वजनिक माहिती अगोदरच किंमती मध्ये परावर्तीत होते, यात कंपन्यांनी केलेल्या घोषणा किंवा वार्षिक प्राप्ती बाबतची आकडेवारी याचा समावेश असतो. अभेदय रचना सर्वच प्रकारच्या माहितीशी संबंधित असते. यात खाजगी माहितीचा देखील अंतर्भाव करण्यात येतो. अंतर्गत व्यापारामार्फत नफा प्राप्ती यात शक्य नसते. एकाधिकार माहितीच्या अनुषंगाने नफा प्राप्ती होत नाही तसेच बाजार संतुलन प्रतिमानाला नाकारल्या खेरीज, बाजार कार्यक्षमतेला नाकारता येत नाही; किंमत निर्धारण यंत्रणाद्वारे हे फामा यांनी सिद्ध करुन दाखविले. याच संकल्पनेला संयुक्त गृहितकृत्य समस्या (Joint Hypothesis Problem) म्हणतात, संशोधकांसाठी तेव्हापासूनच हा प्रश्न अडचणीचा झाला आहे. बाजार कार्यक्षमता गृहितकृत्य अपेक्षित परताव्याच्या संदर्भातच तपासून बघावे यावर फामा यांनी भर दिला. जेव्हा प्रतिमान, परताव्याची प्राप्ती प्रत्यक्ष प्राप्तीच्या तुलनेत लक्षणीयरित्या वेगळे दर्शविते तेंव्हा प्रतिमान अपूर्ण आहे की बाजार अकार्यक्षम आहे या बाबत शंका निर्माण होते. अनियमता काढुन टाकण्याच्या दृष्टिने आणि प्रतिमानातील परताव्याचे स्पष्टीकरण पुर्णत: देता येऊ शकेल या आशेने संशोधक नव्या घटकांचा अंतर्भाव करुन प्रतिमानात बदल करु शकतात. प्रतिमान चाचणीत या अनियमिततेला अल्फा असे संबोधण्यात येते. संयुक्त गृहितकृत्य समस्येनुसार अल्फा जो पर्यत अस्तिवात असतो तो पर्यत प्रतिमान निर्दोष आहे की बाजार अकार्यक्षम आहे या बाबत निष्कर्ष प्राप्त करता येत नाही. बाजाराची कार्यक्षमता स्वतंत्ररित्या तपासता येत नाही त्याची तपासणी संयुक्तपणे कुठल्यातरी संतुलनाच्या प्रतिमाना सोबत तपासता येऊ शकेल आणि ते प्रतिमान म्हणजे संपत्ती/मत्ता-किंमत निर्धारण प्रतिमान होय!

**बजारावरील विश्वास आणि संशय :**

सुरुवातीला नमुद केल्याप्रमाणे अविवेकाची विपुलता (Irrational Exuberance) हे शिलर यांचे पहिले अत्यंत लोकप्रिय पुस्तक होते. २००० साली

डॉट कॉम बुडबुडा सर्वोच्च बिंदुवर असतांना हे पुस्तक प्रकाशित झाले.पशुतुल्य मानसिकता: अर्थव्यवस्थेला मानवी मानसशास्त्रामुळे कशी चालना मिळते आणि वैश्विक भांडवलशाही साठी याचे महत्त्व कां असते (Animal Spirits:How Human Pschology Drives the Economy, and Why it Matters for Global Capitalism) हे दुसरे लोकप्रिय पुस्तक जॉर्ज ॲकरलॉफ यांच्या समवेत २००७ साली जागतिक वित्तीय अरिष्टाचे सावट असतांना प्रकाशित झाले. आर्थिक कृत्य करण्यासाठी मार्गदर्शक अंतर्ज्ञान मानवी प्रवृत्ती आणि युक्तीच्या माध्यमाने प्राप्त होणे यालाच पशुतुल्य मानसिकता म्हणता येईल.अमेरिकेतील घरांच्या किंमतीच्या मागावर (Track) असण्यासाठी त्यांचा शिलर निर्देशांक उपयुक्त ठरला. वर्तणूक वित्तचा अर्थ स्पष्ट करण्याचे दृष्टिने त्यांचा १९८१ साली प्रकाशित झालेला शोध निबंध 'लाभांशामध्ये सातत्याने होणाऱ्या बदलामुळे रोख्यांच्या किंमतीतील हालचाली अती जास्त प्रमाणात समर्थनार्थ उपयोगात आणण्यात येतात का?';(Do Stock Prices Move Too Much To Be Justified by Subsequent Changes in Dividends?) अत्यंत परिणामकारक ठरला. स्टँडर्ड अँड पुअर रोखे किंमत निर्देशांकासाठी १८७१ ते १९७९ या कालावधीतील वार्षिक संमकाचा उपयोग करुन शिलर यांनी असा युक्तीवाद केला की गुंतवणूकदार पूर्णपणे विवेकशील राहीले असते तर या काळात रोख्यांच्या किंमती अपेक्षेपेक्षा अधिक चंचल झाल्या असत्या. किंमत निर्देशांकाची जेरबंदी (Martingale) या कालावधीत न होऊ शकल्याने त्यांना प्राप्त झालेले निष्कर्ष तशा स्वरुपाचे राहीले नसते. २०१३ च्या अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार विजेत्यांनी 'बाजारावरील विश्वास घालवु नका परंतु त्या बाबत संशयवादी राहा' अशा प्रकारचा संदेश तर दिला नाही ना अशी शंका उत्पन्न होते.

**संदर्भ सूची :**


1) Excerpt from Wikipedia.
2) Giugliana, F and J. Aglionby (2013) 'Fama, Hansen and Shiller Win Nobel Prize for Economics', Financial Times, 14 October.
3) Jeremy J. Siegel (2003) : 'What is an Asset Price Bubble? An Operational Definition. European Financial Management, vol.9, No.1.
4) New York Times (2013) : 'Robert Shiller: A Sceptic and a Nobel Prize Winner' Interview, 20 October.
5) T Sabri Oncu (2013) : 'Faith and Scepticisms in Markets' Economic and Political Weekly Vol XLVIII, Nos. 45 & 46.


◆◆◆

ISSN 2320-0197

# कंत्राटी कामगार : वास्तव आणि उपाय

**माणिक खेर**
युजीसी रिसर्च सायंटिस्ट,
आंतर विद्याशाखीय प्रणाली (मानव्य विद्या व सामाजिक शास्त्रे),
पुणे विद्यापीठ.

**प्रस्तावना :**

''जगातील कामगारांनो एकजुटीने एकत्र या'' कार्ल मार्क्सने ही घोषणा देऊन आता एकशे पासष्ट वर्षे झाली. त्यानंतर जगभरातील कामगार संघटना आणि त्यांच्या चळवळी यात बरीच स्थित्यंतरे झाली. आजच्या कंत्राटी कामगारांचे व विशेष आर्थिक क्षेत्रातील कारखान्यात रीतसर नेमलेल्या (कंत्राटी नव्हे) कामगारांचे अनेक हक्क कागदोपत्रीही हिरावून घेतलेले असल्यामुळे व इतिहासाची पुनरावृत्ती झाल्याने पुन्हा एकदा त्या कामगारांना एकजुटीची हाक देण्याची वेळ आलेली आहे.

कंत्राटी कामगार म्हणजे कंत्राटदाराने नेमलेले संघटित क्षेत्रातील कारखान्यात काम करणारे कामगार. कॉन्ट्रॅक्ट लेबर(रेग्युलेशन अँड अ‍ॅबॉलिशन) अ‍ॅक्ट १९७० या कायद्याच्या व्याप्तीत बसणारे. शेतमजूर, माथाडी कामगार, घरेलू कामगार यांचा समावेश यात होऊ शकत नाही. केवळ संघटित औद्योगिक क्षेत्रापुरताच हा लेख मर्यादित आहे.

**कंत्राटी पद्धतीची पूर्वपीठिका :**

कार्ल मार्क्सने जेव्हा कामगारांना एकत्र येण्याचे आवाहन केले, तेव्हा कामगारांच्या पिळवणुकीला सीमा नव्हती. अमर्याद शारीरिक कष्ट, अपुरे वेतन, उपासमार, अस्वच्छता, रोगराई, अपघात या सर्वांशी मुकाबला करताना कामगार गांजून गेले होते. त्यांना या शोषणातून वर काढायला व माणूस म्हणून ताठ मानेने जगायला कामगार संघटनांनी मोठाच हातभार लावला. किंबहुना कामगार संघटना होत्या म्हणूनच कामगारांना आपल्या हक्कांची जाणीव झाली व संघर्षातून हक्क प्राप्ती झाली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

हळूहळू हे चित्र पालटू लागले. 'श्रमशक्ती'चा वापर राजकारणात करण्यासाठी राजकीय पक्षांनी कामगार संघटनांना हाताशी धरले. पक्षाचे संख्याबल वाढविण्यासाठी तसेच शक्ती प्रदर्शन करण्यासाठी संघटनांचा वापर होऊ लागला. तशातच कामगार संघटना कायद्याच्या (१९२६) १६ व्या कलमानुसार कामगार संघटनांना राजकीय निधी गोळा करण्याचे सोय असल्याने संघटनांचा दुहेरी वापर होऊ लागला. प्रत्येक राजकीय पक्षाने एकेक कामगार संघटना निर्माण केली. कामगार संघटनांचा पाठिंबा मिळवून राजकारणात नुसताच प्रवेश नव्हे तर सत्तेची शिडी चढणे ही सोपे झाले. सत्ताधारीही एका पुढाऱ्याचे प्राबल्य कमी करण्यासाठी दुसऱ्या संघटनेतर्फे शह देऊ लागले. या शह काटशह यांच्या खेळात कामगार संघटना शिरजोर झाल्या.

या सर्व राजकारणात पाय रुतल्यावर कारखाना चालला, पूर्व रोजगारी राहिली तरच संघटनांचे अस्तित्व टिकून राहील हीच मूलभूत जाणीव

लोप पावली. ही जाणीव असती तर संघटनांनी कामगारांना हक्काबरोबर कर्तृत्वाचीही समज दिली असती. कामगारांचे वेतन व बोनस वाढवून घेणे या दोनच बाबींवर लक्ष केंद्रित करताना संघटनांनी हास्यास्पद न अशक्य कोटीतील मागण्या केल्या. वेतनवाढ मागताना कोणत्याही तर्काची कास न धरता ते वाढीचा एक आकडा टाकायचा व त्यावर हटून बसून हिंसाचाराचा मार्ग अवलंबायचा असे करू लागले. सुरुवातीला शांतता विकत घेण्यासाठी मालकांनी या मागण्या कबूल केल्या. पण त्यातून संघटनांचा भस्मासुर होण्यापलीकडे व सर्वसामान्य नागरिक तसेच कामगारही भरडला जाण्याखेरीज दुसरे काही साध्य झाले नाही.

कामगार संघटनांनी लढाऊपणा व हिंसाचार यांच्यात गल्लत केली. संपाचे अस्त्र उगारले तरी ते योग्य वेळी म्यानही करावे लागते हे त्यांना जमले नाही. लढाऊ वृत्ती असल्याशिवाय लढा देता येत नाही. परंतु लढाऊ बाण्यावर हिंसाचाराने कुरघोडी केली की कशाचेच तारतम्य राहत नाही. सत्तर व ऐंशीच्या दशकात घेराव, मारहाण, प्रसंगी खून यांचे सत्र सुरू होते. त्या काळातील औद्योगिक कलहांचे निर्णय वाचले तरी अंगावर शहारे येतात.

पश्चिम बंगालमध्ये हिंसाचाराने कारखाने बंद पडू लागले व राज्याबाहेर स्थलांतरित होऊ लागले. मुंबईतील गिरणी कामगारांच्या दीर्घकाळ चाललेल्या संप व टाळेबंदीमुळे गिरण्या आजारी झाल्या व गिरणी कामगारांचे अतोनात हाल झाले. यातून अभियांत्रिकी उद्योगातील कामगार व व्यवस्थापनांनी धडा घेतला.

अभियांत्रिकी उद्योगानेही हिंसाचाराची किंमत मोजल्यावर व्यवस्थापनांच्या लक्षात आले, की आपण कामगारांशी थेट संपर्क व संवाद साधला पाहिजे.या साक्षात्कारातून कामगार व व्यवस्थापन यांच्या संबंधांना एक सकारात्मक वळण मिळाले व संघटनाचे प्राबल्य कमी झाले.

एव्हाना संघटित कामगारांचीही आर्थिक परिस्थिती व राहणीमान उंचावले. मध्यमवर्गीय राहणी बरोबर त्यांची मानसिकताही बदलली. घरे व अत्याधुनिक यंत्रसामग्री हप्त्यावर खरेदी केल्यामुळे त्याचे हप्ते फेडण्यासाठी त्यांना एका दिवसाच्या वेतनावरही पाणी सोडणे अवघड झाले. म्हणजे ऊठसूठ संप करण्याचे व त्यासाठी संघटित होण्याची मनोवृत्ती बदलत जाऊन आपण बरे की आपले काम बरे असे त्यांच्या मनाने घेतले. आपल्या मुलांनी आपल्यासारखे कामगार न राहता चांगले शिक्षण घेऊन थेट व्यवस्थापकीय श्रेणीत प्रवेश घ्यावा अशा विचारातून त्यांचा कामगार संघटनातील रस कमी झाला.

कामगारांच्या हिंसाचारी मार्गांचा नि:पात करून औद्योगिक संबंधाची घडी बसवताना कामगिरीचे ‘कायमत्व’ व त्यांची संघटना हाच एक मोठा अडसर आहे. अशी व्यवस्थापनांची समजूत झाली. आज फोफावलेल्या कंत्राटी कामगार पद्धतीचे मूळ हे या सर्व इतिहासात आहे. कालपरत्वे एकीकडे कामगार संघटना दुर्बल झाल्या व दुसरीकडे कामगार पुढाऱ्यांचाही कामगारांवरील वचक नाहीसा झाला. कामचुकार व बेशिस्तपणे वागणाऱ्या कामगारांना ते पाठीशी घालू लागले. उपद्रवी कायम कामगाराला काढून टाकता न येता सहन करीत ठेवावे लागते या सर्वांचा परिपाक म्हणून कायम कामगारांची संख्या कमीत कमी ठेवून कंत्राटी कामगारांकडून काम करून घेण्याकडे मालकांचा कल वाढू लागला. शक्य असेल तेथे बाहेरून काम करून घेणे किंवा आपल्याच कारखान्यात कंत्राटी पद्धतीने कामगारांना कामावर ठेवणे ही पद्धत आज सर्रास बोकाळली आहे.

कंत्राटी कामगार पद्धत व त्यांचे शोषण पूर्वापार चालत आहे हे शोषण थांबविण्यासाठी राष्ट्रीय कामगार आयोगाने (१९६९) केलेल्या शिफारशीनुसार कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲंड ॲबोलिशन) ॲक्ट (१९७०) १० फेब्रुवारी १९७१ रोजी अंमलात आला या कायद्याच्या प्रयोजनाची दोन अंगे आहेत.

**कंत्राटी कामगार कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी:**

कंत्राटी कामगार कायद्याच्या पहिल्या भागाचा मुख्य हेतू कंत्राटी कामगारांच्या कामाच्या स्थितीचे नियमन करून त्यांचे शोषण कमी करणे हा आहे. त्यानुसार त्यांचे ठरलेले वेतन ठरावीक दिवशी देणे, वेतन देतांना कारखान्याच्या मुख्य मालकाच्या प्रतिनिधीने हजर असणे, कंत्राटदाराने वेतनाची ठरलेली रक्कम न दिल्यास मालकाने ती द्यावी व कंत्राटदाराकडून ती नंतर वसूल करावी अशी तरतूद आहे. पण ती क्वचितच पाळली जाते. ''कंत्राटदाराने आपापले बघून घ्यावे आम्ही त्यात पडत नाही'' ही सरसहा सर्व मालकांची वृत्ती आहे.

कंत्राटी कामगारांना उपहार गृह, पिण्याचे पाणी, शौचालये, प्रथमोपचार या सुविधा पुरवाव्यात अशी कायद्यात तरतूद आहे. यापैकी सर्व सुविधा सर्व कारखान्यांमध्ये क्वचितच उपलब्ध असतात. तशात कंत्राटदाराकडे १०० किंवा जास्त कामगार असल्यास त्याने उपाहारगृहाची सोय करावी असे कलम असल्याने जबाबदारी टाळणे सोपे !

कंत्राटी कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही दुर्लक्षिला गेलेला आहे. त्यांना कामाच्या ठिकाणी हेल्मेट, सेफ्टी शूज, गॉगल्स पुरविणे ही कंत्राटदाराची जबाबदारी सोईस्करपणे डावलली जाते. जेव्हा सर्व काही आलबेल असते तेव्हा हे सहज खपून जाते. परंतु कामगारास इजा, अपघात झाल्यास त्याला वैद्यकीय मदत व पूर्ण बरे होईपर्यंतच्या उपचारांचा खर्च मिळत नाही. बहुतेक वेळा त्याला नोकरी गमावण्याची पाळी येते.

कंत्राटी कामगारांना सुरक्षिततेविषयी प्रशिक्षण, माहिती दिलेली असत नाही. ओझे उचलताना घ्यावयाची खबरदारी, उन्हात काम करताना उष्माघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी, यंत्रावर काम करताना इजा होऊ नये म्हणून सांभाळून काम करण्याच्या पद्धती या सर्वांविषयी ते अनभिज्ञ असतात.

कंत्राटदार आपली नैतिक व कायदेशीर जबाबदारी नीट पाळतो आहे की नाही हे पाहण्याचे काम कामगार आयुक्तालयाचे आहे. कायद्याप्रमाणे २० किंवा अधिक कामगार असतील तर कंत्राटाची नोंदणी करावी लागते. पण यातही प्रत्येक कंत्राटात विसाहून कमी कामगार दाखवून एकत्र कंत्राटदार एकाच वेळी अनेक कंत्राटे घेऊन कायद्याच्या बंधनातून मोकळा होतो. अशा पळवाटा शोधून कंत्राटे देणारे आणि घेणारे दोघांचेही उखळ पांढरे झाले आहे.

कंत्राटी कामगार कायद्याच्या दुसऱ्या भागाचा हेतू बेकायदेशीर कंत्राट असलेल्या ठिकाणी जेथे काम कायम स्वरूपी किंवा सातत्याने उद्भवणारे आहे तेथे कंत्राटी कामगार पद्धतीचा बीमोड करणे हा आहे. कायद्याचा हा भाग अंमलात आणण्यास खुद्द राज्य व केंद्र सरकारे अपयशी ठरलेली आहेत. रेल्वेमध्ये सर्वात जास्त कंत्राटी कामगारांचा भरणा आहे. अन्य प्रकारच्या अनेक सार्वजनिक उद्योगात तसेच सरकारी निम-सरकारी सेवा क्षेत्रातील संस्था, शिक्षणसंस्था, इस्पितळे यामध्ये मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगारांकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जातात. त्यांचे काम व कायम कामगारांचे काम यात कित्येकदा तसूभरही फरक असत नाही. शिवाय कायम कामगार आपले काम कंत्राटी कामगारावर ढकलून आराम करीत बसतात ते वेगळेच ! या कामगारांच्या

व कंत्राटी कामगारांच्या वेतनात कित्येक ठिकाणी पन्नास टक्क्यांहून अधिक तफावत आहे. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या अभ्यासतही (२०१२) समान काम समान वेतन हे तत्त्व कोठेही पाळले जात नाही असे म्हटले आहे. कंत्राटी कामगारांच्या कामाचे तास, सुट्ट्या, पगारी रजा व अन्य सुविधांमध्येही जमीन अस्मानाचे अंतर आहे. यामुळे साहजिकच कंत्राटी कामगार कायम मनात धुमसत असतो. थोडीशीही चिथावणी मिळताच उद्रेक व्हायला वेळ लागत नाही. तसा तो अनेक ठिकाणी झालेला आहे.

**विशेष आर्थिक क्षेत्रातील स्थिती :**

विशेष आर्थिक क्षेत्रात तर मालकांना इतरत्र लागू असणाऱ्या कायदेशीर जबाबदाऱ्यांमधून वगळले आहे. किंबहुना कामगार कायद्यांतून सुटका हे मोठेच गाजर कारखान्यांना दाखवले जात आहे. तेथील कारखान्यांना औद्योगिक तंटा कायदा, प्रॉव्हिडंट फंड, कामगार कल्याण, कामाची स्थिती, कामगाराची नुकसान भरपाई, अपंगत्व, सेवानिवृत्ती नंतरचे लाभ यासंबंधी केलेले कायदे लागू नाहीत. कामगारांची संघटना होऊ दिली जात नाही. इतकेच काय, तेथील स्त्री कामगारांना गरोदरपणी मिळणारे लाभ, बाळंतपणांची रजा यासंबंधीचे नियम व कायदा लागू नाही. म्हणजे आपल्या राज्यघटनेप्रमाणे मालकावर टाकण्यात आलेल्या मूलभूत जबाबदारीचे उल्लंघन करण्यास विशेष आर्थिक क्षेत्रात मोकळे रान उघडून दिलेले आहे !

विशेष आर्थिक क्षेत्रातले हे फायदे घेण्यास अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या पुढे सरसावल्या आहेत. श्रीपेरम्बुदुर येथील नोकिया या कंपनीत स्वयंचलित यंत्र बंद पडल्यास कामगारांनीच झटापट करून ते सुरू करायचे अशी प्रथा आहे. कारण तंत्रज्ञ येईपर्यंतचा वेळ वाया गेल्यास उत्पादनाचे ठरलेले उद्दिष्ट पूर्ण होत नाही. २५ पैकी ८ यंत्रे कायम अधूनमधून बंद पडत होता. अशा यंत्रात अंबिका नावाच्या कामगार स्त्रीचे डोके अडकताच तिला वाचवण्यात हयगय झाली. नोकियाच्या कारखान्यात दिवसाला ४०,००० मोबाईल हॅंडसेटस्‌ची जुळणी करावी लागते. कामगारांनी यंत्रवत काम करताना त्यांचे बोटे भाजणे, चिरडणे अशा 'किरकोळ' अपघातांकडे चक्क दुर्लक्ष केले जाते.

नोकियाला सुटे भाग पुरविणाऱ्या जवळच्याच चिनी व तैवानी मालकीच्या कंपन्यातही कामगार हा माणूस आहे. त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे याचे भान नाही. काम करताना विषारी वायू नाकातोंडात गेल्यामुळे कामगारांना रक्ताच्या उलट्या, गरगरणे, छातीत दुखणे असे त्रास झाले तरी फॅक्टरी इन्स्पेक्टरने 'कीटकनाशकांची फवारणी करताना वायू गळती झाली असण्याची शक्यता' नोंदवून कंपनीला माफ केले. याच विशेष आर्थिक क्षेत्रातील कापारो या ब्रिटिश मालकीच्या कंपनीत कामगारांना दुखापत झाल्यास त्यांना कामाकडे दुर्लक्ष केल्याची नोटीस बजावण्यात येते. म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्याही सर्रास येथील भ्रष्टाचार व ढिसाळ कारभार यांचा फायदा उठवतात.

संघटनेच्या पाठबळाशिवाय एकटा दुकटा कामगार अशा अन्यायाविरुद्ध लढूच शकत नाही. म्हणून संघटनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

वर उल्लेखलेले कंत्राटी कामगारांचे प्रश्न हे असंघटित क्षेत्रातील कोणत्याही कामगाराला लागू पडतात. असंघटित क्षेत्र व असंघटित कामगार या संज्ञा वापरताना पुष्कळदा गल्लत होते. असंघटित क्षेत्रातही कामगार संघटना कार्यरत आहेत. नॅशनल कमिशन फॉर एंटरप्राईजेस इन द अनऑर्गनाईज्ड सेक्टर (२००७) यानी आपल्या अहवालात असंघटित

क्षेत्राची व्यापक व्याख्या दिली आहे. विधी संस्थापित नसलेल्या, खाजगी मालकीच्या माल व सेवा यांचे उत्पादन व पुरवठा करणाऱ्या मालकी व भागीदारीत चालवल्या जाणाऱ्या व दहाहून कमी कामगार असलेल्या सर्व उद्योगांचा असंघटित क्षेत्रात समावेश होतो. अनियमित कामाचे तास, पगारी सुट्टी व रजा यांचा अभाव व मालकाच्या बेकायदेशीर प्रथांविरुद्ध काहीच संरक्षण नाही हे या क्षेत्राच्या मुख्य अडचणी आहेत. अहवालाप्रमाणे २००५ साली रोजगार मिळविणाऱ्या ४८.५ लाख कामगारांपैकी ८६ टक्के कामगार असंघटित क्षेत्रात आहेत व ते देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादाच्या (जीडीपी) पन्नास टक्के हातभार लावतात.

या कामगारांना संघटित करणे व त्यांना कायदेशीर न्याय मिळवून देणे हे कामगारांना व संघटनांनाही अतिशय कठीण जाते. न्यायालयात दाद मागायला जावे तर आर्थिक पाठिंबा तर राहोच, पोटावरच पाय येतो अशी स्थिती असलेले कायदे, विशेषत: असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता कायदा, २००८ यांची कडक अंमलबजावणी झाली तरच हे चित्र सुधारू शकेल. दुदैवाने भ्रष्टाचारी मार्गाने सर्वच नियम धाब्यावर बसवले जात असल्यामुळे अंदाधुंदी निर्माण झाली आहे.

कंत्राटी कामगारांना कारखान्यात सामावून घेण्यासाठी अनेक तंटे सर्वोच्च न्यायालयात लढवले गेले आहेत. परंतु कामाचे स्वरूप, नोकर मालक नाते या कायद्याची अंमलबजावणी करणारे समुचित सरकार (Appropriate Government) कोण याचाच ऊहापोह जास्त झालेला आहे. स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया विरूद्ध नॅशनल, युनियन वॉटर फ्रंट वर्कर्स ॲड अदर्स (२००१) या तंट्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने कंत्राट रद्दबातल ठरले तरी कंत्राटी कामगारांना मूळ कारखान्यात कायम करता येणार नाही असा निकाल दिला आहे.

**कायम कामगार ही संकल्पना बदलणे आवश्यक:**

काम असो वा नसो, पटावर कामगार संख्या कायम ही स्थिती आता कालबाह्य झाली. आपल्याकडे जेव्हा 'परवाना राज्य' होते तेव्हा उत्पादन करण्यासाठी, उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी परवाना घ्यावा लागत असे. एकच उत्पादन करणारे कारखाने तेव्हा कमी होते व उत्पादन संख्येवरही सरकारी नियंत्रण ठेवले जाई. यात मागणीपेक्षा पुरवठा कमी राहील याची खबरदारी घेतली जाई. उत्पादनाच्या तुटवड्यामुळे आपल्याला हवी ती वस्तू मिळण्यासाठी ताटकळावे लागे. त्यात भ्रष्टाचारालाही वाव असे तसेच पुरवठ्यापेक्षा मागणी कमी होणार नाही हेही पाहिले जाई. आता आर्थिक उदारीकरणानंतर तशी स्थिती राहिली नाही. मुक्त व्यवस्थेत अनेक कंपन्या एकच उत्पादन करू शकतात. त्यांना उत्पादन करण्यासाठी सरकारी परवानगीची जरुरी नाही. अशा परिस्थितीत टिकाव लागायचा असेल तर गुणवत्तेबरोबरच खर्चावरही अंकुश हवा. त्याशिवाय धंदा किफायतशीर होणार नाही. त्यामुळे कंत्राटी कामगारांना कायम करण्याची शक्यता कमी आहे.

वेतन हा उत्पादन खर्चाचा एक भाग आहे. वेतन म्हणजे केवळ कामगारांचेच नाही, तर व्यवस्थापकांचे पगार व त्यांच्या सुविधा यांचाही त्यात समावेश होतो. तेव्हा त्यांच्याही पगाराला कात्री लावणे आवश्यक आहे. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांशी तसेच माहिती तंत्रज्ञानक्षेत्रातील कंपन्यांशी वेतनश्रेणीतही स्पर्धा सुरू झाल्यामुळे जास्तीत जास्त वेतन किती द्यावे, कमीत कमी व जास्तीत जास्त वेतनात किती अंतर असावे, कारखान्याची तेवढी ऐपत आहे की नाही या मूलभूत प्रश्नाकडे काना

डोळा केला जातो. बहुराष्ट्रीय कंपन्या डॉलरच्या हिशोबाने येथे वेतन देत असल्यामुळे त्यांचे वेतन केव्हांही वरचढच ठरणार.

पाश्चात्त्य देशात आपल्यासारखी उघडपणे एकाच कामासाठी एकाच ठिकाणी कमी जास्त वेतन अशी स्थिती नाही( तेथील कायदे कडक असल्यामुळे तर त्या कंपन्या बाहेरच्या देशातून उत्पादन करून घेतात) तेथे काम नसेल तेव्हा कामगारांना घरी बसवले जाते व त्या काळात त्यांना बेरोजगार विम्याचे संरक्षण मिळते. प्रत्येक व्यवस्थापनाला प्रत्येक कामगाराच्या विम्याचा हप्ता भरावा लागतो. थोडक्यात पुन्हा कामावर घेईपर्यंत कामगाराला वाऱ्यावर सोडले जात नाही. आज लहानमोठ्या सर्व प्रकारची उत्पादने करणाऱ्या कारखान्यात सर्रासपणे कंत्राटदाराकडून काम करून घेतले जाते. मोठ्या कारखान्यांमध्ये ६० टक्के कामगार कंत्राटदाराने आणलेले असतात मध्यम आकाराच्या कारखान्यात हे प्रमाण ६० टक्क्यांहून जास्त आहे.

ही परिस्थिती एकदम बदलणे कठीण. कारखान्यांनी कंत्राटदार नेमताना कंत्राटदाराने त्याच्या कामगारांचा विमा उतरवला आहे की नाही, त्याचे हप्ते भरले आहेत की नाही, तो कामगारांचे ठरलेले वेतन वेळेवर देतो की नाही हे काटेकोरपणे पाहिले पाहिजे. सध्या कंत्राटदारांवर कोणाचाच अंकुश नाही. आणखी नवनवे कायदे करण्यापेक्षा आधी आहे त्या कामगार कल्याणकारी कायदे व योजनांतील तरतुदींची कडक अंमलबजावणी झाली तरी परिस्थितीत पुष्कळच फरक पडेल.

कंत्राटी कामगारांना काही कामगार संघटनांनी मदतीचा हात दिलेला आहे. पण कंत्राटी कामगारांच्या समस्या बघता कामगार संघटनांनाही नेहमीपेक्षा वेगळ्या पद्धतीने त्यांचे प्रश्न सोडवावे लागतील. कंत्राटी कामगाराला संघटनांकडे जाण्यासाठी व कायदेशीर मार्गे दाद मिळविण्यासाठी लागणारा वेळ व आर्थिक कुवतही असत नाही. आपल्या कंपन्यांमध्ये कंत्राटी कामगारांच्या असंतोषामुळे उद्रेक होऊ द्यायचा नसेल तर व्यवस्थापनानीही त्यांचे शोषण होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. संघटनाच नको ही भूमिका मूलभूत हक्काची पायमल्ली करणारी आहे. उलट संघटना असेल तर सामूहिकरीत्या प्रश्न वेळीच मार्गी लागतील हे त्यांनी जाणले पाहिजे.

**संदर्भ सूची :**


१) कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन अॅड अॅबॉलिशन) अॅक्ट, १९७०.
२) रिपोर्ट ऑन कंडिशन्स ऑफ वर्क अॅड प्रमोशन ऑफ लाइव्हली हुडस् इन द अनऑर्गनाईज्ड सेक्टर, अॅकॅडमिक फाऊंडेशन २००८.
३) धारप एस. एम. : इंक्ल्युडिंग द एक्सक्लुडेड : अ स्टडी ऑफ द इफेक्ट ऑफ कॉटॅक्ट लेबर अॅक्ट १९७०,रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी २०१२.
४) अनऑर्गनाईज्ड वर्कर्स सोशल सिक्युरिटी अॅक्ट २००८.
५) खेर माणिक(२०११) :'द कल्चर ऑफ इमोशनल ओनरशिप : अ रेनबो टुवर्डस् ऑरगनायझेशनल ट्रान्सफॉर्मेशन', ॲनी बुक्स.
६) दत्ता मधुमिता व राधाकृष्णन वेंकटचंद्रिका (२०११) : अंबिकाज डेथ, (मधुमिता दत्ता यांनी इ मेलवरून पाठविलेला लेख)
७) स्टील अॅथॉरटी ऑफ इंडिया लि. वि. नॅशनल युनियन वॉटर फ्रंट वर्कर्स अॅन्ड अदर्स (२००१)
८) पांढरपट्टे दिलीप : सेझ –एक तटस्थ व तौलनिक अभ्यास इत्यादी मनोविकास दिवाळी अंक, २०१, पृ,१६८ ते १७४.
९) महाजन उल्का (२०११) : सेझ स्पेशल लूटमार झोन? इत्यादी मनोविकास दिवाळी अंक .
१०) झाबवाला रेनाना(२०१३) : इंफॉर्मल वर्कर्स अॅड द इकॉनॉमी, इंडियन जर्नल ऑफ इंडस्ट्रियल रिलेशन्स, वर्ष ४८, अंक ३.
११) खेर माणिक(१९९१) : फ्रॉम शॅडोज टु लाईट : अ सोशिओ लीगल चेंज इन वर्क अॅटमॉस्फीअर टी.आर.एफ.


◆◆◆

ISSN 2320-0197

# महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेचा विकास

**आर.बी.भांडवलकर**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय,
यवतमाळ.

**प्रस्तावना :**

कोणत्याही राष्ट्राचा विकास साध्य करण्यासाठी, विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आधारभूत संरचनेची गरज असते. त्याचप्रमाणे सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी देखील आधारभूत संरचना एक व्यापक पाया निर्माण करते कोणतेही भौगोलिक ठिकाण किंवा प्रदेश मानवी वस्तीसाठी परिपूर्ण असत नाही. मानवी व्यवहाराच्या अपेक्षानुसार, काळानुसार, गरजानुसार त्यामध्ये बदल करावे लागतात. असे बदल घडवून आणण्याचे काम आधारभूत क्षेत्र करीत असते. युरोपमध्ये सोळाव्या शतकापासून सुरू झालेला आधुनिक पायाभूत सेवा क्षेत्राचा विकास, वाढ व विस्तार आजतागायत सुरू आहे. त्याचप्रमाणे आधारभूत सेवांच्या प्रकारामध्ये सातत्याने भर पडत आहे. अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका महत्त्वाची असते. मानवाच्या सामान्य गरजा पूर्ण करून त्याच्या अर्थपूर्ण जगण्याला साहाय्यभूत होणाऱ्या सेवा म्हणजे पायाभूत सुविधा होय. ज्या ठिकाणी विविध प्रकारच्या आधारभूत सेवांचे जाळे निर्माण होते तेथे तेथे लोकसंख्या वाढायला लागते हा सर्वसाधारण नियम आहे. कुशल श्रमिकांचा पुरवठा, वीज, पाणी, वित्तीय व विमा संस्था, व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य, वाहतूक व दळण वळणाच्या सोयी इत्यादींना एकत्रितपणे अर्थव्यवस्थेच्या आधारभूत संरचना म्हणतात.

नियोजन काळात देशात आधारभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात आला. त्यामुळे देशातील आधारभूत सुविधेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली नव्हे तर विकासाचा वेग हा आधारभूत संरचनेच्या वेगावर अवलंबून आहे. विकासाची ही प्रक्रिया आडव्या-उभ्या पद्धतीने वाढली आहे. विसाव्या शतकात पायाभूत क्षेत्र इतके विस्तारले आणि त्यामध्ये इतकी विविधता निर्माण झाली आहे की, या संपूर्ण क्षेत्राचा एकत्र विचार करणे आता अशक्य झाले आहे. खाजगीकरण, शिथिलीकरण आणि जागतिकीकरण यावर आधारित नवीन आर्थिक धोरण आणि आधारभूत सेवा क्षेत्राचे वाढलेले महत्त्व ह्यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध आहे. देशामध्ये आज लाखो वंचित लोकसमूहांना घरे,शिक्षण, आरोग्य सेवा, रस्ते, वीज, सिंचन व पिण्याच्या पाण्याची सुविधा यांचा तीव्र अभाव जाणवत आहे. देशातील ३० टक्के लोकसंख्येला आसरा देणाऱ्या शहरामध्ये तर पायाभूत सुविधांची प्रकर्षाने उणीव जाणवते. याउलट ग्रामीण भागात परिस्थिती अधिक बिकट आहे. आधारभूत सुविधांची

ही कुंठितावस्था युद्धपातळीवर निस्तरल्याशिवाय आर्थिक वाढीत सातत्य राखणे शक्य होणार नाही. कारण आधारभूत सुविधा क्षेत्रातील मागणी व पुरवठा यातील तफावत इतकी मोठी आहे की,या क्षेत्रातील गुंतवणुकीचा वेग व या क्षेत्राची वाढ हे दोन्ही फार कमी आहेत. गेली तीन दशके चीनच्या आर्थिक वाढीचा सरासरी वार्षिक दर हा ९ टक्के हून अधिक आहे. ही वाढ चीन मधील पायाभूत सुविधांच्या भक्कम पायावर उभी आहे. सन १९८० मध्ये भारताजवळ चीन पेक्षा अधिक वीज, रस्ते व दूरसंचार क्षमता होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे भूतपूर्व डेप्युटी गव्हर्नर श्री. राकेश मोहन यांनी देशाच्या आर्थिक वाढीची गती ९ टक्के एवढी कायम राहायची असेल तर देशाच्या जीडीपीतील ८ ते ८.५ टक्के गुंतवणूक आधारभूत क्षेत्रामध्ये सातत्याने व्हावयास पाहिजे असे म्हटले आहे.

अर्थव्यवस्थेमध्ये सातत्यपूर्ण वाढ त्याच बरोबर दारिद्र्य पातळी कमी करण्यासाठी आधारभूत सुविधांमध्ये गुंतवणूक होणे महत्त्वाचे आहे. आधारभूत सुविधांचा विकास हा विदेशी गुंतवणूकदाराकडून वाढीची क्षमता अजमावण्याकरिता महत्वाचा निर्देशक म्हणून विचारात घेतला जातो. निकृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधांमुळे केवळ आर्थिक वृद्धीमध्ये अडथळा निर्माण होतो असे नाहीतर विदेशी गुंतवणुकीवर देखील त्याचा परिणाम होतो. परंपरागत भौतिक पायाभूत सुविधांसाठी निधीचा पुरवठा मुख्यत्वे सार्वजनिक क्षेत्राकडून केला जातो. पायाभूत क्षेत्रातील बहुतेक सर्व उपक्षेत्रावर सरकारी–सार्वजनिक क्षेत्राची पकड असली तरी वाढत्या मागणीला आवश्यक गुंतवणूक करण्या इतके भांडवल सरकारजवळ उपलब्ध होत नव्हते आणि अधिक कर्ज घेण्याची ऐपतही सरकारजवळ उरलेली नव्हती.आर्थिक असमानताही आधारभूत क्षेत्रातील त्रुटीमुळे निर्माण होत असली तरी मागास प्रदेशात आधुनिक खर्चिक सेवा पुरविण्यातही मोठ्या अडचणी असतात. पर्यायाने त्यासाठी भांडवल गुंतवणूक जास्त लागते. विरळ आणि गरीब वस्ती असणाऱ्या प्रदेशात आधारभूत सेवा पुरविण्याचा दरडोई खर्चही जास्त असतो. सामाजिक, आर्थिक विषमता आणि पायाभूत क्षेत्रांचे संबंध परस्परावलंबी आणि एकमेकांना पूरक असल्यामुळे विकास व आधारभूत सेवांमध्ये असमानता टिकून राहते.विशेषत: शेती विकासाशी संलग्न असलेल्या आधारभूत क्षेत्राकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच स्थानिक पातळीवर नागरिकांच्या आर्थिक क्षमतांमध्येही असमानता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पायाभूत सेवा निर्माण करण्याचे, त्याचे नियोजन करण्याचे, त्यासाठी निधी जमविण्याचे, सेवांचे दर ठरविण्याचे कोणतेच अधिकार नाहीत. त्यांच्याकडे हे सर्व व्यवहार करण्यासाठी लागणारी तांत्रिक, प्रशासकीय व वित्तीय क्षमता ही निर्माण होऊ शकत नाही. भारतासारख्या विकासोन्मुख राष्ट्राला तर आर्थिक विकास दराचे उद्दिष्ट गाठण्याबरोबरच देशातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणावर सुद्धा विशेष भर द्यावा लागतो.

**२. महाराष्ट्रातील आधारभूत संरचना :**

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर राज्यात आधारभूत संरचनेच्या उभारणीवर विशेष भर देण्यात आला. त्यासंबंधी करण्यात आलेल्या प्रयत्नांना काही प्रमाणात यशही आले. परंतु जे यश प्राप्त झाले ते शहरी भागापुरतेच मर्यादित राहिले असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. १ मे १९६० या स्थापना वर्षात राज्याची लोकसंख्या ३.९ कोटी होती. सन २०११ मध्ये ११ कोटी झाली. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. महाराष्ट्रातील सामाजिक आधारभूत संरचना व आर्थिक

आधारभूत संरचनाची प्रगती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अ) सामाजिक आधारभूत संरचना :**

मानवी मूल्य विकास आणि दुर्बल घटक व प्रतिकूल परिस्थिती असणारे मुख्य केंद्रबिंदू आहे. सामाजिक आधारभूत सुविधांमध्ये आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे इत्यादींचा समावेश होतो. तर जनतेच्या सहभागातून या गुणात्मक सेवा सर्वोत्तम परिणाम घडवून आणतात.

**१) आरोग्य सुविधा –** राज्यामध्ये त्रिस्तरीय सार्वजनिक आरोग्य सुविधा असून राज्यातील जनतेला सहजतेने व परवडण्याजोगी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यक्रम व योजना राबवीत आहे. मानवी जीवनाच्या दृष्टीने आरोग्य विषयक सुविधा ही एक प्राथमिक गरज आहे. महाराष्ट्रात दवाखाने, डॉक्टर्स, औषधाचा पुरवठा व अन्य वैद्यकीय सुविधाचे प्रमाण इतर राज्याच्या तुलनेत चांगले आहे.महाराष्ट्रात सन २०१० मध्ये ग्रामीण रूग्णालयाची संख्या ३८६ होती तर प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची संख्या १८१६ व १०५८० आहे.राज्याच्या ग्रामीण भागातील आरोग्याच्या सुविधांमध्ये संख्यात्मक वाढ झाली असली तरी गुणात्मक वाढी अभावी गरीब अशा सामान्य ग्रामीण जनतेच्या आरोग्याची मात्र हेळसांड होत आहे. राज्यात अमरावती, ठाणे,रायगड, नाशिक, धुळे, नंदूरबार, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ या जिल्ह्यामध्ये बालमृत्यूचे प्रमाण व कुपोषण आढळून येते. ग्रामीण भागात रक्तपेढ्यांची सुविधा आजही आढळून येत नाही. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, कुटुंब कल्याण कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, नवसंजीवनी योजना, सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम,पल्स पोलिओ कार्यक्रम, शालेय आरोग्य कार्यक्रम, जीवनदायी आरोग्य योजना,राज्य रक्त संक्रमण परिषद इत्यादी योजना राबविण्यात येत आहे.

**२) शिक्षण –** मानवी विकासात शिक्षण हे महत्त्वाची भूमिका बजावते. राज्यात सार्वत्रिक मोफत प्राथमिक शिक्षण आहे. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. पुरोगामी समजला जाणारा महाराष्ट्र शिक्षणाच्या बाबतीत देशात अग्रेसर राहिला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण ८२.९१ टक्के एवढे असून स्त्री साक्षरता ७५.४८ टक्के आहे. राज्यात शाळा, विद्यार्थी, शिक्षक संख्येत झालेल्या वाढीबरोबरच सन २००९-१० मध्ये दर १० चौकिमी. अंतर्गत असलेल्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांची घनता अनुक्रमे २.४७ टक्के व १.५३ टक्के आहे. ३१ विद्यार्थ्यांमागे एक वर्गखोली प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर अनुक्रमे ३८ व ३३ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक उपलब्ध आहे. शिवाय ८७.७ टक्के शाळांना पिण्याचे पाणी, ७७.१ टक्के शाळांना स्वच्छता गृहे, ३७.२ टक्के शाळांना संगणक, ६१.३टक्के शाळांना खेळाचे मैदान तर ७१.४ टक्के शाळांना विद्युत पुरवठा झाला आहे. मुलींच्या ६१.३ टक्के शाळांना खेळाचे मैदान तर ७१.४ टक्के शाळांना विद्युत पुरवठा झाला आहे. मुलींना १२ वी पर्यंतचे शिक्षणाची मोफत सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तर उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था व त्यातील विद्यार्थी संख्या यांचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्याचे दिसून येते. शिक्षणाचा प्रसार तालुका पातळीपर्यंत पोहोचला असला तरी तो विषम प्रमाणात आहे. वर्गीकृत जाती व जमातीत शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी त्यातील वाढ समाधानकारक नाही. व्यावसायिक उच्चशिक्षण संस्थाचा विस्तार हा संख्यात्मक दृष्ट्या विनाअनुदान तत्त्वावर आहे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा

टिकविण्याबाबत प्रश्नचिन्ह आहे. राज्यात सर्व शाळा मिळून ७५००० खोल्यांची आवश्यकता आहे. माध्यमिक व उच्चशिक्षणात गळतीचे प्रमाण जास्त आहे.

**३) पाणी पुरवठा व स्वच्छता –** पाणी ही मूलभूत गरज असून प्रत्येक व्यक्तीला शुद्ध पिण्याचे पाणी मिळण्याचा अधिकार आहे. भारत निर्माण हा ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधा व मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सुरू केलेल्या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविला जातो. सन २०११–१२ पर्यंत ९७४५ लोकवस्त्यांपैकी ५१८१ वस्त्यांना या योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे. तीव्रपाणी टंचाई असलेल्या गावे/वाड्या यांना दरवर्षी टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत पाणी पुरवठा केला जातो. तसेच महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान अंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा राज्यातील सर्व नागरिकांना पुरविल्या जातात. तसेच नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना, शिवकालीन पाणी साठवण योजना, पावसाच्या पाण्याची साठवण, जलस्वराज्य योजना, ग्रामीण पाणीपुरवठा 'आपलं पाणी'प्रकल्प, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम इत्यादी राबविण्यात येत आहे. ग्रामीण स्वच्छता योजनेअंतर्गत ग्रामीण जनतेला स्वच्छतेच्या सुविधा पुरविण्याचे पूर्ण प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचबरोबर शौचालयाच्या वापराबाबत व स्वच्छतेबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय, महिला प्रसाधनगृह, शालेय स्वच्छतागृहे आणि घनकचरा विल्हेवाट यंत्रणा या सुविधा पुरविण्यात येत आहे.

**ब) आर्थिक आधारभूत संरचना :**

आर्थिक आधारभूत सुविधा या आर्थिक विकासाला हातभार लावत असल्यामुळे विकास प्रक्रियेत त्या महत्त्वाच्या मानल्या जातात. सध्याच्या गतिमान जीवनात भौतिक आर्थिक आधारभूत सुविधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.वीज, वाहतूक व्यवस्था व दळणवळण इत्यादी भौतिक पायाभूत सुविधा आर्थिक विकासासाठी साहाय्यभूत ठरतात.

**१) ऊर्जा–** वीज हे एक बहुउपयोगी ऊर्जा साधन असल्यामुळे विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. मानवी जीवनाचे जणू एक अंगच ऊर्जा बनली आहे. परिणामत: महाराष्ट्रात ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. परंतु ऊर्जेच्या निर्मितीचे प्रमाण मागणीच्या तुलनेत कमी आहे. सन १९६०–६१ मध्ये दरडोई विजेचा वापर फक्त ७० युनिट इतका होता. तो सन २०१०–११ मध्ये ७८० युनिट होता. घरगुती वापरासाठी, औद्योगिक वापरासाठी व कृषी वापरासाठी विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. राज्याच्या एकूण स्थापित क्षमतेपैकी अर्ध्यापेक्षा जास्त क्षमता ही औष्णिक ऊर्जा निर्मितीची आहे. जलजन्यऊर्जा निर्मितीचा वाटा १६.१ टक्के आहे तर नैसर्गिक वायू जन्य पदार्थापासून १०.३ टक्के वीजनिर्मिती केली जाते तर अणू शक्तीजन्य वीजनिर्मितीचे प्रमाण २.३७ टक्के आहे. म्हणजेच अणूनिर्मितीजन्य ऊर्जा विकासात प्रचंड प्रगती करण्याची नितांत गरज आहे. कारण कोळसा उत्खननाचा वाढता खर्च, निकृष्ट दर्जाचा कोळसा इत्यादी विविध कारणांनी कोळसा पुरवठा कमी होऊन त्याचा वीज निर्मितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. एकूणच वीज निर्मितीचा वृद्धीदर घटत असून दुसऱ्या बाजूस विजेचा विविध क्षेत्रातील उपभोग मात्र वाढत आहे. आर्थिक विकास व जीवनमानाचा वाढता दर्जा यामुळे घरगुती विजेचा वापर वाढला आहे. तो सन १९६०–६१ मध्ये ९.५६ टक्के होता तर सन २००९–१० मध्ये२२.९६ टक्के इतका झाला.

सन १९६०-६१ मध्ये विद्युतीकरण झालेल्या गावाचे प्रमाण १.६३ टक्के होते सन १९८९ मध्ये महाराष्ट्रातील १०० टक्के गावाच्या विद्युतीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यात आल्यामुळे सार्वजनिक दिवे ग्रामीण आणि शहरी भागातून लावल्याने, रस्त्यांची लांबी वाढल्याने सुद्धा उपभोग वाढला आहे. रेल्वे विकासाबरोबर रेल्वे वाहतुकीसाठी विजेचा वापर वाढला. तसेच शेतीच्या विकासात सिंचन सुविधेसाठी विजेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. हे प्रमाण सन १९६०-६१ मध्ये ०.५५ टक्के तर सन २००९-१० मध्ये १७.५९ टक्के पर्यंत वाढले आहे.एकंदरीत विजेच्या तुटीचे सन २०००-०१ मध्ये प्रमाण १७.४० टक्केपर्यंत होते. ते सन २००९-१० मध्ये २५.३८ टक्केपर्यंत वाढले आहे. चोरी व गळती या कारणामुळे मागणी व पुरवठ्यात आणखीच तफावत वाढत आहे. विजेचा अनियमित पुरवठा व वाढते भारनियमन यामुळे ग्रामीण जनतेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याचा प्रतिकूल परिणाम राज्याच्या विकासावर झाला आहे. वीज टंचाईवर उपाय म्हणून राज्यात संपूर्ण वर्षभर असणाऱ्या भरपूर सूर्यप्रकाशाचा वापर सौर ऊर्जा निर्मितीसाठी करणे काळाची गरज आहे.

**२) वाहतूक व्यवस्था -** वाहतुकीचे सामान्यपणे रेल्वे वाहतूक, रस्ते वाहतूक, हवाई वाहतूक व जलवाहतूक असे मुख्य चार प्रकार पडतात. डॉ. आल्फ्रेड मार्शल यांच्या मते,'देशाच्या आकाराचे शरीर आणि अस्थी शेती व उद्योग असून वाहतुकीची साधने (रस्ते) स्नायू होत.' रस्ता वाहतुकीला सामाजिक, आर्थिक व राजकीय संदर्भात महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्र हे देशातील रस्त्याचे चांगले जाळे असणारे राज्य आहे. महाराष्ट्रात रस्त्याच्या पायाभूत सुविधांचा विकास महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, वनविभाग, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, शहर व औद्योगिक विकास महामंडळ इत्यादींकडून करण्यात येतो. ३१ मार्च २०१० पर्यंत ९७.५ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी तर उर्वरित दोन टक्के गावे हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती. राज्यातील ०.५ टक्के (२३६ गावे) गावे रस्त्यांनी जोडण्याकरिता रोजगार हमी तसेच पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याचा विकास सुरू आहे. महाराष्ट्रात एकूण महामार्ग रस्त्याच्या लांबीपैकी १४ टक्के, राज्य जिल्हा रस्ते, ४४ टक्के खेड्याचे रस्ते व २१ टक्के राष्ट्रीय महामार्ग आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना १९९६ मध्ये करण्यात येवून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्त्वावर आधारित आहे. प्रत्येक गाव हे मुख्य जिल्ह्यांच्या रस्त्यांशी संपर्कात आल्यामुळे शेती, लघू-कुटीरोद्योग, शिक्षण, आरोग्य इत्यादींमध्ये वेगाने वाढ झाली आहे. तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ देशात प्रथम क्रमांकाचे आहे. महाराष्ट्रात एकूण ४८लहान बंदरे आहेत या बंदरामधून विविध प्रकारच्या साहित्याबरोबर प्रवासी वाहतूक सुद्धा केली जाते. महाराष्ट्रात सन २००२ मध्ये 'महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि.' ची स्थापना करण्यात आली. सोलापूर, शिर्डी, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, जळगांव आणि राजगुरूनगर(पुणे) येथे विमानतळे बांधली असून मुंबई, नागपूर, पुणे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची विमानतळे आहेत. राज्यातील लोकांचा आर्थिक विकासाबरोबर जीवनमान दर्जा अधिक सुधारल्याने हवाई प्रवास करणाऱ्यांची संख्या सुद्धा वाढली आहे. सन २०१० मध्ये१७३.६७ लाख प्रवाशांनी हवाई वाहतूक केली. मुंबईच्या तुलनेत पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर येथील विमान

प्रवाशांची संख्या कमी आहे. महाराष्ट्रात सन २००९ पर्यंत ५९२८.८९ किमी लांबीचा रेल्वेमार्ग विकसित झाला आहे. मागील दशकात रेल्वे विकासाच्या दृष्टीने कोकण रेल्वे प्रकल्प हा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. राज्यात पंढरपूर-मिरज, पंढरपूर-लातूर, अमरावती-नरखेड,अहमदनगर-परळी वैजनाथ, बारामती-लोणंद अशा नवीन रेल्वे मार्गाचे काम सुरू असून काही मार्ग पूर्ण झाल्याने मागास भागाचा विकास होण्यास मदत होत आहे.

**३) दळणवळण –** प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक क्षेत्राचा विकास हा दळणवळण व दूरसंचार सेवांवर अवलंबून असतो. दळणवळण यंत्रणेत तार, टपाल, दूरध्वनी इत्यादी सेवांचा समावेश होतो. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व या क्षेत्रातील खाजगी उपक्रमाच्या प्रवेशामुळे या सेवांचा लाभ शहरीभागाबरोबरच ग्रामीण भागातील लोकांना मिळत आहे. महाराष्ट्रात सन २०१०-११ मध्ये टपाल कार्यालयाची संख्या १२८५३ असून त्यांपैकी ग्रामीण भागात ११५२४ एवढी कार्यालये असून त्याचे प्रमाण ८९.६६ टक्के आहे. टपालपेट्या सुद्धा ८१.११ टक्के ग्रामीण भागात आहे. तारसेवेचा लाभ सुद्धा ७९.३७ टक्के ग्रामीण लोक घेत होते. परंतु सध्या तारसेवा बंद करण्यात आली आहे. दूरध्वनी व भ्रमणध्वनीच्या वाढत्या वापरामुळे टपाल सेवेचे महत्त्व कमी झाल्याचे दिसून येते. भारतात भ्रमणध्वनी, इंटरनेट व ब्रॉडबॅन्ड वापरणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रात अधिक आहे.

**३. समारोप :**

एकूणच महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीत वाढ झाली आहे. त्याआधारे राज्याने नेत्रदीपक प्रगती केली असली तरी या सुविधा गरजेच्या मानाने कमी पडतात कारण आधारभूत सुविधांचा संपूर्ण राज्यात संतुलित विकास झालेला नाही. पर्यायाने आर्थिक विकासात प्रादेशिक असमतोल दिसून येतो. औद्योगिक विकासात विदर्भ व मराठवाडा मागासलेला आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात हा विकास मुंबई, पुणे, ठाणे व नाशिक पुरताच मर्यादित आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्राचा विकास हा आर्थिक व सामाजिक आधारभूत संरचनेच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासावर नियोजन काळापासून भर देण्यात आला असला तरी अपेक्षित असे उद्दिष्ट गाठता आले नाही. तसेच ग्रामीण भागातील आधारभूत सुविधांची संख्यात्मक वाढ काही प्रमाणात झाली असली तरी त्या प्रमाणात गुणात्मक वाढ झाली नाही.ग्रामीण व आदिवासी भागातील कुपोषण बालमृत्यूचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी आरोग्य यंत्रणा अत्यंत मजबूत व भ्रष्टाचार मुक्त असणे आवश्यक आहे. थोडक्यात फक्त संसाधनाची उपलब्धता असून चालत नाही तर त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे हे कार्य पायाभूत सोयीमुळे होते.

**संदर्भ :**

१) दांडेकर हेमलता/महाजन सुलक्षणा (२०१०) : पायाभूत सुविधा, समाज संशोधन पत्रिका खंड-३.

२) दास्ताने डॉ.संतोष(२०११) : महाराष्ट्र.

३) जंगले डॉ. मंगला (२०१०) : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०११-१२) : वित्त व नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

◆◆◆

ISSN 2320-0197

# पर्यावरण संवर्धन – सद्य:स्थिती व आव्हाने

**डी.के.राठोड**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री संत गजानन महाराज  कला महाविद्यालय,
बोरगाव मंजू.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात पर्यावरण ही संज्ञा बहुचर्चित झाली असून ती अध्ययनाचा, सशोधानाचा आणि चिंतेचा प्रमुख विषय आहे. सर्वसाधारणपणे पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती असे असले तरी उत्पत्तीशास्त्राच्या दृष्टीने पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ठ भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती होय. Enviro म्हणजे to surround या मूळ फ्रेंच भाषेतील शब्दापासून Environment असा इंग्रजी शब्द प्रचलित झाला आहे. यालाच मराठी भाषेत पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरणशास्त्रात मानवी जीवन व त्यांचे पर्यावरण यांच्या संबंधाचा अभ्यास होतो.

इ.स.१९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या या विषयावरील जागतिक परिषदेनंतर विकसनशील देशात पर्यावरणाच्या समस्येकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात झाली. एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास साधतांना पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे याची जाण शासन व समाज यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे असे आढळून आहे. यासंबंधी जनजागृती करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर करीत असतानांच या विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे ही काळाची गरज आहे असे मानले जाते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इ.स.१९६० च्या सुमारास पर्यावरणशास्त्र हा स्वतंत्र विषय उदयास आला. औद्योगिक क्रांतीनंतर नवनवीन शोध लागले. दुसऱ्या महायुध्दाचे गंभीर परिणाम जपानमधील हिरोशिमा व नागासाकी शहरांनी भोगले. अणुबॉंबचे संहारक परिणाम जगाने अनुभवले आणि त्यातून पर्यावरण शास्त्राकडे लोक आकर्षिले गेले. त्यासाठी इतर सामाजिक, नैसर्गिकशास्त्र यांच्यात समन्वय साधण्यात आला.

**पर्यावरणशास्त्राच्या व्याख्या :**

जगामध्ये पर्यावरणाच्या अध्ययनास फारच महत्व प्राप्त झाले आहे. पर्यावरण हा शब्द अलीकडे सर्वांच्या जिव्हाळ्याचा शब्द झाला आहे. सध्या आर्थिक पर्यावरण, सामाजिक पर्यावरण अशा संज्ञा प्रचलित होत आहेत. जागतिक पर्यावरण नियोजन ही नवी संकल्पना आंतरराष्ट्रीय स्तरावर दृढ होत चालली आहे. पर्यावरणशास्त्र आणि भूगोलशास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पर्यावरणशास्त्राच्या विविध व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

जॉन्सन टर्क यांच्या मते,पर्यावरणशास्त्र म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास होय. (Environment Science provides an approach toward understanding the

environment of our planet of human life upon that environment. It is also a search for solutions to the environmental problems that controls us.)

**हर्सकोव्हिटस एम.जे.**या अमेरिकन तज्ञाने त्यांच्या Man and his works या ग्रंथात इ.स.१९४८ मध्ये पर्यावरणाची व्याख्या केली आहे.

पर्यावरण म्हणजे सर्व बाह्य परिस्थितीचे आणि प्रभावाचे एकत्रिकरण आहे. जे पृथ्वीच्या पृष्ठभागावर सजीवांच्या विकासचक्राला प्रभावित करत असते. (Environment is the sum total of all external conditions and the influences on the development cycle of biotic elements over the earth's surface).

पर्यावरणीय अध्ययन हा एक सध्याचा प्रगत होऊ पाहणारा अभ्यासक्रम जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कारण तो एक जीवनाविषयीचा दृष्टिकोन आहे. त्याची उद्दिष्ट्ये ही मानवाच्या सुरक्षिततेस पोषक ठरणारी आहेत. केवळ प्रगत शास्त्र प्रणाली लक्षात न घेता जीवनाची जडण घडण सुयोग्य ठेऊन परिस्थितीशी जुळते घेऊन दूरगामी आचार विचारांचे नियमन करण्याचे कार्य यातून साधायचे आहे.

पर्यावरण अभ्यासाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे.

१) अभ्यासातील सूक्ष्मदर्शकतेमुळे योग्य निष्कर्ष काढणे सहज शक्य होते.

२) मानव हा जीवसृष्टीतील प्रगत, बुध्दिमान प्राणी असल्याने त्याने नेहमीच स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी पर्यावरणास वेठीस धरले आहे. स्वत:चे जीवन सुखी करण्यासाठी निसर्गात अनेक ठिकाणी हस्तक्षेप केला आहे. मानवाद्वारे पर्यावरणाचे झालेले नुकसान जाणून घेण्यासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणाचा अभ्यास आवश्यक आहे.

३) पर्यावरण व्यवस्थापनाच्या अभावी निसर्गातील साधनसंपदेचा गैरवापर होतो. त्यातून पर्यावरणाची अवनती व पर्यावरण प्रदूषण समस्या उद्‌भवतात.

४) पर्यावरणातील विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या समस्येचे मूळ कारण, समस्येमुळे प्रभावित झालेले क्षेत्र व त्या समस्येवरील उपाय शोधणे पर्यावरणाच्या सखोल अभ्यासाने सहज साध्य होते.

५) पर्यावरणासंबंधीच्या समस्या लोकांसमोर आणण्यासाठी पर्यावरणशास्त्र यासारख्या ज्ञानशाखांची गरज आहे. त्यातूनच जनजागृतीचे काम होऊन पर्यावरण बचाव यांसारखे कार्यक्रम शासकीय, निमशासकीय, खाजगी पातळीवर राबविणे शक्य होते.

६) पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासांत विविध बाबींचा समावेश होतो. साधनसंपदांचा अमर्याद वापर केल्यामुळे त्या संपदा संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. इंधन समस्या तर खूपच भेडसावीत आहे. पर्यावरण भूगोलाच्या अभ्यासाने ऊर्जेची पर्यायी उगमस्थाने शोधली जात आहेत. सौरऊर्जा, पवनऊर्जा, भूगर्भऊर्जा याविषयी प्रयोग यशस्वितेच्या मार्गावर आहेत. पर्यायाने मानवी जीवन कसे सुखकर होईल याचे मार्ग शोधण्याचे कामही पर्यावरण भूगोलाच्या अभ्यासातून शक्य होते.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाते.

**पर्यावरणाचे प्रकार :**

जगामध्ये सर्वसाधारणपणे पर्यावरणाचे प्रमुख

दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१. नैसर्गिक पर्यावरण

२. सांस्कृतिक पर्यावरण

**१) नैसर्गिक पर्यावरण :**

निसर्गामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणाला नैसर्गिक पर्यावरण असे म्हणतात. उदा. मृदावरण, जलावरण, वातावरण आणि प्राणी, वनस्पती, सूक्ष्मजीव इत्यादी. यांच्या संदर्भातील भौगोलिक घटकांचा समावेश नैसर्गिक पर्यावरणामध्ये केला जातो. जगातल्या ज्या प्रदेशात अशा नैसर्गिक घटकांचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो अशा प्रदेशाला नैसर्गिक प्रदेश (Natural Regions) असे म्हणतात.

**२) सांस्कृतिक पर्यावरण :**

मानव व त्याच्या सभोवतालचे नैसर्गिक पर्यावरण यांच्या संबंधातूनच मानवनिर्मित पर्यावरण अस्तित्वात येत असते. वरील दोन्ही घटकांच्या वितरणात व संबंधात स्थलपरत्वे व कालांतराने बदल होत असल्याने त्याचा परिणाम मानवाच्या जीवनावर कमी जास्त प्रमाणात झालेला दिसतो. सांस्कृतिक पर्यावरणात सामाजिक व आर्थिक घटकांचा समावेश होतो. मानवी वसाहती, वाहतुकीचे व दळणवळणाचे मार्ग, औद्योगिकरण, तांत्रिक प्रगती या घटकांचा समावेश मानवनिर्मित पर्यावरणात केला जातो. सध्याच्या काळात नैसर्गिक पर्यावरणाबरोबरच मानवाचा विकास व मानवी जीवन यावर सांस्कृतिक पर्यावरणाचे घटक प्रभावी ठरत आहेत. संभववादी विचारप्रणालीचे लोक निसर्गापेक्षा सांस्कृतिक पर्यावरणाला विशेष महत्व देतात.

मानवी वसाहतीचे ग्रामीण व नागरी असे प्रकार पडतात. ही मानवी वसाहतीची विभागणी त्या वसाहतीतील व्यवसाय, लोकसंख्या व प्रशासकीय यंत्रणा यांच्या आधारावर केली जाते. ग्रामीण भागात प्राथमिक तर शहरी भागात द्वितीय व तृतीय क्षेत्रातील व्यवसाय जास्त केले जातात.

उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक वाहतूक व दळण-वळणाच्या सुविधांचा परिणाम सध्याच्या काळात मानवी जीवनावर फार मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. कच्चा माल, पक्का माल, यंत्रसामुग्री, मजूरवर्ग, शक्तीसाधने इत्यादी वाहतूकीसाठी स्वस्त, गतीमान आणि सुखकर वाहतूकीचे मार्ग उपलब्ध झाल्यामुळे औद्योगिकरणाला चालना मिळाली आहे. मुंबई या शहराची वाढ सर्व प्रकारचे वाहतूकीचे मार्ग उपलब्ध असल्यामुळे झालेली आहे. वाहतूकीचे मार्ग असल्याने औद्योगिक प्रदेश स्थापन झालेत. या कारखान्यात काम करण्यासाठी मजूरवर्गामुळे मुंबई शहराची वाढ होत आहे.

मानवाच्या जीवनावर सांस्कृतिक पर्यावरणातील त्या देशातील तांत्रिक प्रगती विशेष परिणाम करते. एखादा देश तांत्रिकदृष्ट्या पुढारलेला असेल तर उपलब्ध तंत्राद्वारे अनेक व्यवसाय प्रस्थापित करता येतात. व्यवसायात त्यामुळे प्रगती होत असते. अशाप्रकारे सांस्कृतिक पर्यावरणांमध्ये विविध घटकांचा समावेश झालेला आढळतो.

**पर्यावरणविषयक जागतिक जगजागृती परिषद; (Environmental Public Awareness World Organisation) :**

१) पर्यावरणविषयक पहिली जागतिक परिषद (First Environmental World Organisation) :

आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरणविषयक पहिली जागतिक परिषद ५ जून १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम या शहरात झाली. या परिषदेत भारतासह अनेक लहानमोठ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. या परिषदेत पर्यावरणीय प्रदूषण, औद्योगिक व रासायनिक प्रदूषण, हरितगृह परिणाम,

ओझोन वायूचा क्षय, आम्लपर्जन्य अशा विविध पर्यावरणविषयक समस्यांवर चर्चा करण्यात आली. या परिषदेच्या आयोजनानंतरच संपूर्ण जगभर पर्यावरण चळवळीला चालना मिळाली. संयुक्त राष्ट्र संघाने देखील पर्यावरण संरक्षणासाठी विविध कार्ये सुरु केली. उदा. यूनेपद्वारा (United Nations Environmental Programme) पर्यावरण अभ्यास व संशोधनाला चालना देण्यात आली. तसेच लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, हवामान, मृदा, व्यवसाय इत्यादी बाबतच्या मानवी हस्तक्षेपांबाबत सर्वेक्षणांना चालना मिळाली. हवामान बदलाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आल्या. सागर प्रदूषण नियंत्रणाविषयी आंतरराष्ट्रीय कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे जागतिक स्तरावर पर्यावरणविषयक जगजागृती मोठ्या प्रमाणावर झाली.

२) वसुंधरा शिखर परिषद (Vasundhara Summit Organisation) :

वसुंधरा शिखर परिषद ही ३ जून ते १४ जून १९६२ या कालावधीत ब्राझीलमधील रिओडी–जानेरो या शहरात संपन्न झाली. या परिषदेमध्ये संपूर्ण जगातील लहान मोठ्या १५६ राष्ट्रांनी सहभाग घेतला. या परिषदेमध्ये पर्यावरणविषयक विविध घटकांची चर्चा झाली. पर्यावरण व नैसर्गिक संपदेचा विकास यावर चर्चा होऊन नैसर्गिक संपदेच्या वापराबाबत एक नवी दृष्टी देण्यात आली. या परिषदेत मानव आणि पर्यावरण यांच्या अनुषंगाने पुढील घटकांची चर्चा झाली :

१. उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर आणि वापराच्या पध्दती.
२. मानवी विकासाची पर्यावरणीय दृष्टीने छाननी करणे.
३. पृथ्वीवरील सतत बदलणाऱ्या हवामानाची चिकित्सा करणे.
४. जीव समूहाच्या अस्तित्वाचा प्रश्न अभ्यासणे.
५. प्रदूषण नियंत्रणाचे प्रभावी मार्ग कोणते अवलंबवायचे, हे ठरविणे.
६. मानवी जीवन पध्दतीची समीक्षा करणे.
७. उत्पादनाच्या पध्दतीत संवर्धन तत्वावरील गतिमानता तपासणे
८. पृथ्वी संरक्षण निधीची उभारणी व त्यातून राष्ट्रा–राष्ट्रामधील पारंपारिक तंत्रज्ञानाची सुलभ देवाण–घेवाण करणे.
९. पर्यावरणाबरोबरच विश्वबंधुत्वाची भावना जनमानसात रुजविणे.
१०. जगातील विकसित राष्ट्रांनी पर्यावरणविषयक जास्तीत जास्त जबाबदारी उचलणे.
११. वैज्ञानिक चाचण्या, अणुबाँब निर्मिती, अणुस्फोट चाचण्या, प्रलयकारी शास्त्रांचा वापर, याविषयी नियंत्रक उपाययोजना कार्यान्वित करणे.

या परिषदेत वरील विषयाच्या अनुषंगाने प्रभावीपणे चर्चा करण्यात आली. या परिषदेच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण आयोगाची स्थापना झाली. या आयोगाच्या माध्यमातून संपूर्ण जगभर पर्यावरणविषयक विविध उपक्रम राबविण्याबाबत काम केले जाते. प्रत्येक राष्ट्रात पर्यावरणविषयक संघटना निर्माण झाल्या आहेत. या संघटनाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचे आणि संवर्धनाचे महत्व पटवून दिले जात आहे. अशाप्रकारे जागतिक पर्यावरणविषयक जगजागृतीच्या दृष्टीकोनातून वसुंधरा शिखर परिषद अनन्यसाधारण महत्वाची मानली जाते. विकासाचा एक भाग म्हणून घडून आलेल्या औद्योगिकीकरणामुळे दळणवळणाची साधने वाढली. नागरीकरण व औद्योगिकरणामुळे प्रदूषणाच्या

समस्यांनी दिवसेंदिवस भयानक स्वरुप धारण केले आहे. त्याचा विपरीत परिणाम जनजीवनावर झालेला दिसत आहे. मृदाप्रदूषण, वायूप्रदूषण ध्वनीप्रदूषण, जलप्रदूषण अशा चार प्रकारच्या प्रदूषणामुळे समाजाचे नैसर्गिक आरोग्यमान बिघडण्यास मदत होते. वायू प्रदूषणामुळे श्वासासंबंधीचे रोग वाढलेले आहेत तर ध्वनी प्रदूषणामुळे पोटाचे व डोळ्याचे विकार वाढलेले दिसतात.

प्रदूषण कमी करुन पर्यावरणाचा समतोल सांभाळण्यासाठी सावधगिरीचा इशारा म्हणून शासकीय स्तरावरुन प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. त्याचे उत्साहवर्धक परिणाम हाती येत आहेत. प्रदूषणाला आळा घालण्यासाठी १ एप्रिल १९९५ पासून पेट्रोल पंपांना शिसेविरहित पेट्रोल देण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी वाहनांमुळे होणाऱ्या प्रदूषणाला विशिष्ट मर्यादेपर्यंत आळा बसण्यास मदत होत आहे. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी सरकारने वाहनांच्या गतीवर व ध्वनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आदेश दिले आहेत. ध्वनी प्रदूषणामुळे येणाऱ्या बहिरेपणावर नियंत्रणासाठी शासनाने सुसज्ज दवाखाने निर्माण केलेले आहेत. बधीर रुग्णांना शिक्षणासाठी मूकबधिर विद्यालये सुरु केली आहेत. जल प्रदूषणाचे परिणाम रोखण्यासाठी शासनाने प्रकल्प राबविले आहेत. तेलवाहू जहाजांना सागरात अपघात होतात. त्यावेळी तेलाचे तवंग सागरावर पसरुन जलप्रदूषण होते. आपले तटरक्षक दल आहोरात्र त्यादृष्टीने जागृत असतात.

शहरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण भागात प्रदूषण कमी आढळते. पर्यावरणाचा समतोल ढासळू न देता औद्योगिकरणाचा वेग वाढविणे हाच शासनाचा हेतू आहे. शासनानेच पर्यावरण खाते, प्रदूषण नियंत्रण केंद्र, राज्य महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, महापालिका वाहतूक सहआयुक्त यांच्याकडून प्रदूषण नियंत्रण होत आहे. शासनाच्या प्रदूषण नियंत्रण कृती कर्यक्रमास जनतेने योग्य ती मदत केल्यास प्रदूषणाचे नियंत्रण होण्यास मदत होईल.

**संदर्भ :**


१. डॉ.घारपूरे विठ्ठल (२०११) : पर्यावरणशास्त्र., पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

२. जोशी म.ना. (२००९) : पर्यावरण संरक्षण., सुखदा प्रकाशन, पुणे.

३. चाफेकर पल्लवी (२०१०) : पर्यावरण : आकलन आणि आचरण., सुमेरु प्रकाशन, मुबंई.

४. Taylor Miller G. (1995) : Environmental Science, California Wordsworth, ISBN 0-534-21588-2.


◆◆◆

ISSN 2320-0197

# विदर्भातील नागरी सहकारी बँकांची सद्य:स्थिती : एक टीप

**माधुरी प्रदीप लेले**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग,
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय,
नागपूर.

**प्रस्तावना :**

प्रामुख्याने सावकारी पाषातून सामान्य माणसाची मुक्तता करणे व मुक्त झाल्यावर त्यांना प्रथम अर्थसहाय्य करणे, त्यातूनच समाजातील विविध घटकांची, जीवनमानाची पातळी उंचावणे हा नागरी सहकारी बँकांच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देष होता. केवळ नफा कमविणे हा उद्देश नव्हता. परंतु खुल्या व वैष्विक आर्थिक धोरणाच्या अंगीकारामुळे बँकींग क्षेत्रात विकासात्मक संकल्पनेपेक्षा त्या व्यावसायिक संकल्पना स्वीकारण्यात आल्या. परिणामत: रिझर्व्ह बँकेकडून जागतिक स्तरावरील बँकींग कार्य प्रणालीवर आधारित (बॅसल III) नवीन मापदंड प्रणाली लागू करण्यात आली. बँकांचा विकास किती झाला आणि त्यांचा विकास कार्यक्रमामध्ये किती सहभाग आहे यापेक्षा त्यांना नफा किती झाला हे महत्वाचे मानले जाऊ लागले आहे. बँका आर्थिक दृष्ट्या सक्षम तर हव्यातच परंतु त्याचबरोबर त्यांची लाभक्षमता विचारात घेऊन, नफ्यातूनच त्यांचा आर्थिक विकास होईल, हा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला. याचा अर्थ नागरी सहकारी बँकांसाठी स्थानिक विकासाचे साधन आणि माध्यम ही संकल्पना भारताच्या वार्षिक नियोजनात स्वीकारली होती त्या संकल्पनेला हा फार मोठा धक्का होता.

या दृष्टीकोनामुळे विशिष्ट परिमाणापेक्षा भांडवलाचे परिमाण कमी असल्यामुळे बँका आणि त्यांच्या अस्तित्वावरच परिणाम होणार. ग्रेड ३ व ग्रेड ४ मध्ये असलेल्या बँकांना पर्याप्त भांडवलाचे प्रमाण (CRAR) गैर निश्पादन संपत्ती (NPA) आणि इतर अस्तित्वाचा प्रश्न भेडसावणार हे निश्चित आहे. अशा बँकांना स्थानिक पातळीवर टिकवून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. इतर कुठल्याही बँका किंवा आर्थिक पातळीवर एक लोक सहभागातून निर्माण झालेल्या प्रातिनिधिक संख्या आणि स्थानिक लोकांच्या समस्या आणि विकासात्मक बाबींचा एक विश्वासू साथीदार म्हणूनच अधिक परिचय आहे.

मार्च १९६६ पासून देशातील सर्व नागरी सहकारी बँकांना बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ लागू करण्यात आला. या घटनेला ५६ वर्ष पूर्ण झाले. नागरी सहकारी बँकांनी सदर कायद्यातील वेळोवेळी बदलाची नोंद घेऊन जागतिकीकरणाच्या आर्थिक स्पर्धेतही आपली प्रगती चालूच ठेवली, हेच खऱ्या अर्थाने या बँकांचे यश म्हणावे लागेल. विदर्भातील नागरी सहकारी बँकांचा विचार करता काही मोजक्या बँका वगळता इतर बँकांनी आपले अस्तित्व अबाधित ठेवले आहे.

**विदर्भ अर्बन बँक्स को–ऑपरेटीव्ह असोसिएशन लि. नागपूर :–**

विदर्भ अर्बन को– ऑप. असोसिएशन लि. नागपूर या नागरी सहकारी बँकांच्या संघटनेनेसुद्धा विदर्भातील नागरी सहकारी बँकांच्या विदर्भातील समस्यांना वाचा फोडण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली. त्यापूर्वी राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य अर्बन को. ऑप. बँक्स फेडरेशन, मुंबई ही संघटना अस्तित्वात होती. परंतु विदर्भाचे बाबतीत अनेक घटकांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. विदर्भाचे अर्थकारण, सामाजिक स्थिती आणि आर्थिक प्रश्न भिन्न आहेत. त्या अनुषंगाने स्वतंत्र संघटनेची आवश्यकता होती. ३१ मार्च २०१२ पर्यंत विदर्भातील एकूण ६२ पैकी ५३ बँका विदर्भ असोसिएशन्च्या सदस्य आहेत. नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीसाठी आवश्यक असणारे कार्यक्रम संघटनेमार्फत राबविले जातात. त्यासाठी वेळोवेळी कार्यशाळा, चर्चासत्रे, शिबीरे आयोजित केली जातात. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नागरी सहकारी बँकांना पारितोषिके दिली जातात. रिझर्व्ह बँक आणि भारत सरकार यांच्यातर्फे कायदे व नियम या अनुषंगाने वेळोवेळी जी परिपत्रके काढण्यात येतात त्यात विषयाची माहिती, विदर्भातील सर्व नागरी सहकारी बँकांना देणे, त्याबद्दल त्यांना सजग करणे, नियमांचे काटेकोर पालन करण्याविषयी प्रवृत्त करणे, इत्यादी महत्वपूर्ण कार्ये ही संघटना करते.

नागरी सहकारी बँकांच्या ज्या मागण्या असतात त्या शासनापर्यंत, रिझर्व्ह बँकेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य देखील असोसिएशन मार्फत केले जाते. असोसिएशनद्वारे राज्यस्तरीय आणि प्रादेशिक अधिवेशने आयोजित करण्यात येतात. आतापर्यंत या अधिवेशनांच्या माध्यमातून आयकर रद्द करणे, एन.पी.ए. धोरणात बदल करणे, अंकेक्षण शुल्काची पुनर्रचना करणे, रेटींग पद्धतीत बदल करणे, सी.आर.आर. व बचत खाते यावरील व्याजासंबंधी विचार करणे, न्यासाच्या ठेवी स्वीकारण्यासंबंधी नियम करणे, संचालक आणि नातेवाईक यांच्या व्याख्येत बदल करणे, इ–स्टँपींग द्वारे मुद्रांक विक्रीची परवानगी देणे इत्यादी मागण्यांचा असोसिएशनने पाठपुरावा केलेला आहे. रिझर्व्ह बँकेच्या दुहेरी नियंत्रणाच्या समस्येबाबत देखील या अधिवेशनात चर्चा झाली. विदर्भ असोसिएशन आपल्या सदस्यांच्या हितासाठी सातत्याने राज्य फेडरेशन केंद्र व राज्य सरकार तसेच रिझर्व्ह बँकेशी संपर्कात राहते.

विदर्भ अर्बन बँक्स को–ऑपरेटीव्ह असोसिएशन नागरी सहकारी बँकांनी भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज करण्याची जबाबदारी देखील स्वीकारते. त्यासाठी 'जिल्हावर कार्यशाळा' आयोजित करुन त्या अंतर्गत विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात येते. उदा. कॅमल रेटींग सिस्टीम, पर्यवेक्षणात्मक कृती आराखडा, कर्जाचे अर्ज पडताळून घेतांना सावधानता, व्यवस्थापकीय खर्चावर नियंत्रण, थकीत कर्ज वसुली करतांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजना, आयकर व त्यासंबंधीच्या समस्या याबाबतीत असोसिएशनने सर्व नागरी सहकारी बँकांना तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन करुन सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यासंबंधी प्रशिक्षण देण्यात येते.

सर्व नागरी सहकारी बँकांनी आपला एन.पी.ए. १० टक्के पेक्षा जास्त असू नये. सी.आर.ए.आर. ९ टक्के पेक्षा कमी असू नये. सी.आर.आर. आणि एस.एल.आर. नियमितपणे टिकवावा यात कुठलीही चुक करु नये याबद्दल असोसिएशनचे अध्यक्ष माननीय कैलाशचंद्र अग्रवाल सातत्याने काळजीपूर्वक

लक्ष ठेवतात आणि त्याबद्दल आवश्यक ते मार्गदर्शनही करतात.

**तक्ता क्र. १**

**विदर्भातील नागरी सहकारी बँकांची स्थिती**

| विवरण | 31 मार्च 2007 | 31 मार्च 2008 | 31 मार्च 2009 | 31 मार्च 2010 | 31 मार्च 2011 | 31 मार्च 2012 |
|---|---|---|---|---|---|---|
| नागरी सह. बँक (संख्या) | 69 | 69 | 69 | 64 | 63 | 62 |
| भाखा (संख्या) | 448 | 504 | 504 | 463 | 473 | 475 |
| सभासद संख्या | 965661 | 995349 | 1017676 | 959759 | 1020290 | 1079456 |
| | रु. लाखात | रु. लाखात | रु. लाखात | रु. लाखात | रु. लाखात | रु. लाखात |
| भागभांडवल | 21,750 | 24211 | 27078 | 28860 | 35108 | 39939 |
| संचित निधी | 74,494 | 79542 | 81887 | 87843 | 100469 | 110714 |
| एकूण ठेवी | 658312 | 748212 | 808005 | 892252 | 966704 | 1071548 |
| कर्ज व ओव्हरड्रफ्ट | 6627 | 6213 | 5884 | 3673 | 24539 | 5324 |
| सभासदांकडील कर्ज | 447494 | 476992 | 514598 | 550436 | 644674 | 713182 |
| गुंतवणुक | 235241 | 280135 | 319291 | 359812 | 371654 | 412099 |
| क्रिया□ील भांडवल | 718969 | 870097 | 948977 | 1027627 | 1149822 | 1244091 |
| नफा | 2363 (54) | 3724 (57) | 4709 (58) | 3716 (53) | 7591 (58) | 12222(57) |
| तोटा | 8021 (15) | 11557(12) | 10316 (11) | 4386 (11) | 172 (5) | 125 (5) |

टीप :- कंसातील आकडे नागरी सहकारी बँकांची संख्या दर्शवित आहेत.

स्त्रोत :- विदर्भ अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लि. नागपूर यांच्या २००७ ते २०१२ च्या वार्षिक अहवालांवरुन संकलित.

वरील तक्त्यावरुन ३१ मार्च २००७ ते ३१ मार्च २०१२ या सहा वर्षातील विदर्भातील नागरी सहकारी बँकांची स्थिती व प्रगतीची कल्पना येते. संख्यात्मक दृष्टीने विचार केला तर घट झालेली दिसते. ३१ मार्च २००७ विदर्भात एकूण ६९ नागरी सहकारी बँकां अस्तित्वात होत्या. परंतु २०१० मध्ये नागरी सहकारी बँकांची संख्या ६४ पर्यंत घटली. त्यानंतर दरवर्षी एक नागरी सहकारी बँक बंद झाली.

या बँका बंद पडण्याचे प्रमुख कारण नागरी सहकारी बँकांच्यामध्ये असणारी गैरनिष्पादन संपत्तीची समस्या हेच आहे. परंतु त्याच बरोबर वरील तक्त्यावरुन असेही निदर्शनास येते की, २००७ पासून दरवर्षी तोट्यात येणाऱ्या नागरी सहकारी बँकांची संख्या कमी कमी होत आहे. २०१० या वर्षाचा अपवाद वगळता नागरी सहकारी बँका अधिक प्रमाणात नफ्यात चालण्याची प्रवृत्ती वाढत आहे आणि नफ्याचे प्रमाणही वाढतांना दिसत आहे.

नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीचा विचार करतांनाच याच कालावधीत त्यांना झालेल्या तोट्याचा विचार करणेही अपरिहार्य आहे. ३१ मार्च २००७ मध्ये एकूण १५ नागरी सहकारी बँका तोट्यात कारभार करीत होत्या. त्यांचा एकूण शुद्ध तोटा ८०२१ लाख रु. आहे. याच काळात ५४ नागरी सहकारी बँकां मिळून शुद्ध नफा २३६३ लाख आहे. म्हणजे तोट्याची मात्रा (१५ =-८०२१) तर नफ्याचे (५४= +२३६३) म्हणजे सर्व बँकाचा नफा वजा जाता एकूण तोटा ५६५८ लाख रू.आहे. अशीच परिस्थिती पुढील दोन वर्षात आहे. २००८ आणि २००९ मध्ये नफ्यातील नागरी सहकारी बँकांपेक्षा तोट्यातील नागरी सहकारी बँकांचा तोटा अतिशय जास्त आहे. २००८ मध्ये ११,५५७ आणि २००९ = १०,३१६ लाख रुपये एवढा तोटा झाला. आणि त्याचवेळी तोट्यातील बँकांची संख्या मात्र घटली. याचा अर्थ २००८ मध्ये तीन नागरी सहकारी बँकांनी तर २००९ मध्ये एका बँकेने यशस्वीपणे तोट्यातून नफ्याच्या स्थितीत प्रवेश केला. त्यानंतर मात्र तोट्याचे प्रमाण बरेच कमी झालेले दिसते. नागरी सहकारी बँकांसाठी ही अतिशय आनंदाची व महत्वपूर्ण प्रगती आहे. मार्च २०१० मध्ये विदर्भातील नागरी सहकारी बँकांची संख्याच घटली. याचा अर्थ तोट्यात चाललेल्या नागरी सहकारी बँका बंद पडल्या.

२००७ ते २०१२ या कालावधीत विदर्भात नागरी सहकारी बँकांचा संख्यात्मक विकास झालेला दिसत नाही. नागरी सहकारी बँकांची संख्या तर हळूहळू कमी झालीच परंतु त्याचबरोबर त्यांचा शाखाविस्तारही अतिशय मंदगतीने झालेला दिसतो. तसेच त्यांच्या सभासद संख्येतही फार वृद्धी झालेली नाही. एकूण सभासदांची संख्या ९ लाख ते १० लाख एवढी मर्यादित आहे. विदर्भाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत नागरी सहकारी बँकांच्या सभासदांची संख्या अगदीच कमी आहे.

संख्यात्मक घट होऊनही विदर्भातील नागरी सहकारी बँकांचे एकूण भागभांडवल, राखीव निधी, व ठेवी यामध्ये सरासरी १० टक्के ने वाढ झालेली दिसते. कर्ज आणि ओव्हरड्राफ्ट चे प्रमाण मात्र २०११ चा अपवाद वगळता वाढ न होता कमी झालेले आहे. वास्तविकत: बँक व्यवसायाची लाभक्षमता ही कर्जवितरण आणि कर्ज वसुली याच महत्वपूर्ण घटकांवर अवलंबून असते. त्या तुलनेत नागरी सहकारी बँकांच्या सभासदांना वितरित केलेल्या कर्जात वाढ झालेली आहे. या सभासदांमध्ये जे सभासद व्यवस्थापनाशी संबंधित असतात. त्यांचे कर्ज घेण्याचे प्रमाण अधिक असते आणि गैर निष्पादन संपत्ती निर्माण होण्याचे हे सर्वात प्रमुख कारण आहे.

त्यामुळेच सर्व नागरी सहकारी बँकांच्या संचालक व अधिकाऱ्यांनी गांभिर्याने विचार विमर्ष करणे व त्या त्या बँकेच्या पातळीवर ही परिस्थिती बदलण्याची आणि पुनश्च जनसामान्यांमध्ये नागरी सहकारी बँकांच्या प्रती विश्वासाची भावना, समर्पणाची व निस्वार्थीपणे

कार्य करण्याची वृत्ती निर्माण होणे फार आवश्यक आहे.

**तक्ता क्र. २**

**विदर्भातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीची वाटचाल**

(वाढीचे शेकडा प्रमाण)

आकडे प्रतिशतमध्ये

| विवरण | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| भागभांडवल | ११.३१ | ११.८४ | ६.५८ | २१.६५ | १३.७६ |
| संचित निधी | ६.७७ | २.९९ | ७.२७ | १४.३७ | १०.२० |
| एकूण ठेवी | १३.६६ | ७.९९ | १०.४३ | ८.४८ | १०.८५ |
| सभासदांकडील कर्ज | ६.५० | ७.८८ | ६.९६ | १७.२७ | १०.६३ |
| गुंतवणूक | १९.०८ | १३.९७ | १२.६९ | ३.३६ | १०.८८ |
| कार्यशील भांडवल | २१.०२ | ९.०६ | ८.२९ | १२.०२ | ८.२० |

स्त्रोत :- विदर्भ अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लि. नागपूर यांच्या २००७ ते २०१२ च्या वार्षिक अहवालांवरुन संकलित.

२००७-०८ ते २०११-१२ या पाच वर्षात विदर्भातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीत अनेक चढउतार निर्माण झालेले दिसतात. भाग भांडवल २००७-०८ व २००८-०९ या वर्षात जवळपास ११.५० टक्के वाढ झाली. परंतु २००९-१० या वर्षात मात्र ही वाढ फक्त ६.५८ टक्के या दराने झाली. आणि लगेच २०१०-११ या आर्थिक वर्षात मात्र ही वृद्धी सर्वाधिक २१.६५ टक्के ने झालेली दिसून येते. तर २०११-१२ मध्ये पुन्हा ही वृद्धी १३.७६ टक्के पर्यंत घटलेली आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, भांडवलवृद्धीच्या बाबतीत २००९-१० हे आर्थिक वर्ष नागरी सहकारी बँकांसाठी कमजोर ठरले. हीच गोष्ट कार्यशील भांडवलाच्या बाबतीत देखील लागू होते. २००७-०८ मध्ये नागरी सहकारी बँकांच्या कार्यशील भांडवलात सर्वाधिक वृद्धी झाली. त्यामुळे त्या वर्षातील ठेवी (२३.६६) आणि गुंतवणुकीचे (१९.०८) प्रमाण देखील सर्वाधिक दिसते. कार्यशील भांडवलाच्या वृद्धीचे प्रमाण २००९-१० व २०११-१२ मध्ये सर्वात कमी आहे. ठेवींमधील चढउतार देखील लक्षणीय आहेत. २००८-०९ आणि २०१०-११ या दोन वर्षात एकूण ठेवींचे प्रमाण ८ ते ८.५० टक्के वाढले. तेच २०११-१२ मध्ये ठेवी १०.८५ टक्के ने वाढलेल्या दिसतात.

सहकारी बँकेच्या सभासदांना वितरित करण्यात आलेल्या कर्जात मात्र पहिल्या तीन वर्षात फार चढउतार आढळत नाहीत. २०१०-११ या वर्षात कर्ज वितरणात अचानक वृद्धी झालेली आढळते. (१७.२७ टक्के) तर २०११-१२ मध्ये ती पुन्हा १०.६३ टक्के पर्यंत घटलेली आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, गेल्या पाच वर्षात विदर्भातील नागरी सहकारी संस्थामध्ये वृद्धीची प्रवृत्ती असली तरी त्यामध्ये सातत्य आढळून येत नाही. विशेषत: भाग भांडवल आणि क्रियाशील भांडवल यांच्यातील चढउतार तीव्र स्वरुपाचे आहे.

बँकेच्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी स्थिर वृद्धीची आवश्यकता असते.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोला बाबत जेव्हा चर्चा केली जाते तेव्हा प्रामुख्याने विदर्भातील अनुशेषाचा विचार केला जातो. या असमतोलाचा परिणाम नागरी सहकारी बँकांवरही जाणवतो. ज्या ठिकाणी उद्योग, कंपन्या, शैक्षणिक सुविधा, माहिती तंत्रज्ञान इत्यादी सोयी मोठ्या प्रमाणात आहेत, तेथे आर्थिक विकास झपाट्याने होतो असा आजवरचा अनुभव आहे. आर्थिक विकास बँकाच्या पतपुरवठ्याशी निगडीत असतो, हे सत्य नाकारण्यासारखे नाही. विदर्भातील नागरी सहकारी बँकांची पिछेहाट होण्याचे एक कारण आहे. त्यामुळेच विदर्भातील नागरी सहकारी बँकांची संख्या केवळ ६२ वर मर्यादित झाली आहे. ही वास्तविकता आहे. परंतु या परिस्थितीतही राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांच्या पतपुरवठ्याच्या तुलनेत नागरी सहकारी बँकांनी केलाला पतपुरवठा हा निश्चितच वाखाणण्यासारखा आहे.

भारत सरकार आणि रिझर्व्ह बँक यांचे धोरणात वारंवार बदल करणे, सहकारी बँकांमधील वाढती स्पर्धा, सहकार खात्याचा अनावश्यक हस्तक्षेप, राजकारण, तज्ञ संचालकाचा अभाव, प्रशिक्षित व माहिती तंत्रज्ञानाचा अभाव असणारे मनुष्यबळ अशा अनेक बाबी नागरी सहकारी बँकांच्या विकासाच्या आड येतात. काही वेळी संचालकाच्या आपसातील मतभेदाचा परिणाम देखील बँकांवर होतो.

**गैर निष्पादन संपत्तीबद्दल वास्तविकता :**

आजच्या नवीन अर्थव्यवस्थेत मोठेपणाच्या निकषांमध्ये व संकल्पनेमध्ये बदल होऊन स्थिती विवरणातील आकडेवारीपेक्षा त्यातील गुणवत्तेशी तो निगडीत झाला आहे. यासाठी काही विशिष्ट मापदंड निर्धारित केली आहेत. नागरी सहकारी बँकांचा केवळ नफा कमविणे हा कधीही उद्देश नव्हता. राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका किंवा खाजगी बँका ज्याप्रमाणे नफा कमविण्यासाठी व्यवसाय करीत आहेत त्याप्रमाणे नागरी सहकारी बँकांनी हा निकष कधीही स्वीकारला नव्हता. परंतु एन.पी.ए. चा निकष लागू झाल्यावर थकीत कर्जाचे प्रमाण आणि अशा कर्जावर करावी लागणारी तरतुद (Provision), यामुळे नागरी सहकारी बँकांचा तोटा भरपूर वाढला. अशावेळी नफा कमविण्यासाठी तरतुद कमी करणे व नवीन कर्जवाटप करणे हे अत्यावश्यक झाले.

सद्य:स्थितीत नागरी सहकारी बँकांच्या असा की व्यापारी बँका असो यांची प्रतिमा जनमानसामध्ये त्यांच्या लाभक्षमतेनुसार 'चांगली किंवा वाईट' अशी ठरु लागली आहे. सुरवातीच्या काळात दिलेल्या कर्जाचे व्यस्त प्रमाण व हितसंबंधात दिलेली मोठमोठी कर्जेच थकीत झाल्यामुळे, वसुली करणे अशक्यप्राय होऊ लागले. त्यामुळे बऱ्याच बँका बुडू लागल्यात, हे लक्षात आल्या नंतर संचालकांवर अशी कर्जे वाटपास प्रतिबंध घालण्यात आला.

कर्जदाराकडून 'येणे वसुली' मोठ्या प्रमाणात दिसण्याचे प्रमुख कारण 'असुरक्षित कर्जे' हे होय. याचाही बँकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. ठेवी आणि कर्ज यात योग्य संतुलन ठेवल्यास बँकांचा आर्थिक समतोल टिकून राहील. त्यासाठी नागरी सहकारी बँकांच्या पदाधिकाऱ्यांनी आपली शोधक नजर ठेवण्याची आवश्यकता आहे. मात्र हे सर्व करीत असतांना नैतिकतेला तडा जाणार नाही याचीही दक्षता घेतली पाहिजे.

सध्या नागरी सहकारी बँकांवर आलेले नवीन

संकट म्हणजे नॉन शेड्यूल्ड बँकांना त्यांचे एन.पी.ए. खात्यावरील व्याजावर आयकर विभागाने टॅक्स आकारणे सुरु केले आहे. त्या बाबतीत विदर्भ अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशनने पुढाकार घेऊन सर्व प्रथम राज्य फेडरेशन आणि सी.बी.डी.टी. विभाग नवी दिल्ली यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

वास्तविकत: जागतिक मंदी आणि जगभरातील बँकांच्या कामगिरीच्या तुलनेत भारतातील नागरी सहकारी बँकांनी अतिशय नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. परंतु केंद्र सरकारच्या २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात मात्र या बाबीचा ओझरता सुद्धा उल्लेख नाही, याचे आश्चर्य वाटते. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत नागरी सहकारी बँकांचे योगदान फार मोठे आहे. त्यामुळेच देशाच्या विविध अर्थव्यस्थेत सहकारी अर्थव्यवस्था ही एक नवीन अर्थव्यवस्था उदयाला आली, हे विसरुन चालणार नाही.

**संदर्भ :**


१. रिझर्व्ह बँक बुलेटीन Report on Trading & Progress of Banking in India 2007-08 & 2011-12.

२. विदर्भ अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लि. नागपूर यांचा वार्षिक अहवाल २००७-०८ ते २०११-१२.

# GANDHI TODAY

**H.A. Hudda**
Vasantrao Naik Govt. Institute of Arts and Social Sciences,
Nagpur.

Humanity has been benefited by eternal sources of inspiration that motivate humans in various forms, visible and invisible. Since time immemorial, human generations across the world have seen great personalities, whose daunting efforts changed the way, people think, believe and behave. In rejuvenating the human spirit, in reestablishing confidence, great people have always left indelible imprints. And Gandhi was certainly one of them. His life was a message, a message of central value to humanity. The Gandhian perspective Gandhi' had set tone for building his socio-economic model mainly on moral and ethical grounds. At the age of 40, he was in a position to comment comprehensively on the tenets of the society, he had evolved out of his precept and practice. More than the knowledge, an individual in the Gandhian Scheme is liberated soul, a free person but with a committed social responsibility. Gandhiji was not bound by social norms and law of the land so much as he tends to regulate and discipline his behavior by himself type of nature individual in a brave new world of technology would be acting with great restraint. Unfortunately the modern individual does not fully fit into this image.

**Emerging knowledge society :**

Substantial literature has appeared by now on knowledge society. It is useful to economic aspects that are implied in the concept of knowledge society. Whether we like it or not, economic factors are the major determinants in formulating the problems today and seeking solutions. Rapid economic growth is required firstly. Our main objectives are rapid growth in GDP and per capital income. Human development index has been mentioned as an alternative measure to assess human well-being. India is ranked far below crossing hundred although after China, India's population is next to China and its GDP would soon cross the 2 trillion US dollars. Countries that are members swear to have heightened inequity of all kinds. If we have by mistake understood that knowledge society is one where human beings are increasingly relying on knowledge in a cognitive sense. The crux of the issue lies in the accelerating speed, at which knowledge is created, accumulated and most probably depreciates in terms of economic relevance and value. The economist wanted to explain sudden rise in productivity out of symbiotic relationship that emerged between physical capital,

human capital and technology. T.W. Schultz, a well-known economist, had predicted that the most important factor of production in future would be human capital or labour. The initial production function that the economists had worked on had considered land, labour and capital. This mathematical function saw a change in weights first in favour of physical capital and then in favour of human capital. The difference in these two changes was that there was a quantum jump in the importance and weight of the human capital in productivity and production capacity in an economy. The knowledge economy requires its name, fast access, collection and processing information and put it to use for productive purpose. It improves the production capacity of individuals. Gandhiji suggested that regulating mind and heart is necessary even for undertaking economic activity.

**Poverty problems :**

Poverty reduction is one of the most crucial and demanding millennium development goals to be achieved by the world. Two countries with endemic poverty and population growth struggled to catch up with achievers in the last decade. Gandhi's far-sightedness on the state of poverty programmes in India and his vision of welfare Economics has added weight to the world literature on poverty reduction, especially after the bare-faced limitations of Arthur Lewis and Simon Kuznets in explaining glob al development and economic growth were revealed to experts of growth paradigms; supported by many from John Stuart Mill to Amartya Sen in suggesting that economics should primarily be concerned with real people, decision makers continue to revolve around the 'non-ethical' character of modern economics in the name of Adam Smith. Gandiji's concept of Swadeshi was never understood in its true spirit.

**Gandhian economy :**

Mahatma firmly believed economic equality could be achieved only through abolishing the eternal conflict between capital and labour. He observed economic equality means on the one hand, leveling down of the few rich, in whose hand is concentrated the bulk of the nation's millions on the other. The economic social and political organization that Mahatma wished to bring into being would emphasise service mentality. Only then the people will be transformed into such a being as will be a patent factor in the development of character and personality of the nation. In free India, Mahatma envisioned a self-sufficient economy where most of the consumer goods will be manufactured by people themselves on a decentralized basis; but this does not mean that all economic activities will be combined to cottage industries. There are certain products which can be best prepared using centralized methods. In Mahatma's scheme, to the most possible extent a significant amount of daily needs must be met through articles of current economy like agriculture produce, forest resources and animal husbandry. These articles can be increased or decreased according to human will and

efforts. Therefore, there may not be any attempt to exert control over them. This will set an ideal society where life becomes simpler because all necessaries can be produced by a man. Gandhiji's dream economy could be a decentralized system established through non-violence since in his words centralization was sound to curb individual's right to a great extent. This in due course leads to revolution or revolt from the suppressed or oppressed class.

To sum up, we find that Gandhian economy is non-exploitative in which work is considered as the foundation of society and one cannot earn one's livelihoods unless one puts in some labour. It will be a decentralized economy through mandatory centralized industries will function under the State's control. Consumption will be shaped on the basis of moral values and not on money considerations; so the economy where dignity is guaranteed to every human being.

**Rural reconstruction :**

Gandhiji saw that poverty, unemployment and ignorance in villages a result of its exploitation by city dwellers. The resources are being drawn away by a few in the cities. He wanted the process reversed. Therefore, he wanted that the cities should not produce what could be produced in the villages. He wanted the cities to serve as users of the village produces. He was convinced that the village must become self-sufficient and self-reliant.

Reconstruction of villages is possible only through the constructive programmes, such as prohibition, khadi, village industries, village sanitation, adult education, removal of untouchability and communal harmony. Mahatma made it clear that he was not declaring a war against cities or against the misuse and abuse of machinery. In his scheme, each had its deserving place. At the same time, he firmly believed, if the village perished, India would perish too. Therefore Gandhiji wanted the villages to be helped in producing whatever they could so that they became self-reliant.

**Sustainable development :**

"Live more simply so that others can simply live." "Nature has the capacity to meet the human needs, but not human greed." These golden words of Gandhiji's exemplify the concept of sustainable development long before it emerged from the report of the Club of Rome on limits to growth and the Bruntland Commission Report on our Common future. It gained momentum with the united Nation's picking up the theme. Gandhiji was a natural ecologist and his phrases were prophetic. Long before the world has sensed greenhouse emission, Gandhiji warned about the dangers of unplanned and reckless industrialization in 1909. This was systematic and scientific influences about the perils and pitfalls of industrialization and the resultant environmental degradation. Today, if sustainable development is a buzzword then Gandhiji had brought it to the dictionary long ago. It has been universally recognized that development is the key to meet people's need and improve the quality of life. Most of the theories of development are based upon the

assumption that industrialization continuous growth and technological announcement are prerequisites for development. On one hand indus-trialization has created a utopia for human beings by wiping out poverty, ignorance, disease and illiteracy. On the other hand, it has contributed to smoke, pollution and suffocation of the atmosphere.

Men have been intervening in nature for a long time. However, the growth of industrialization during the present century has accelerated the process to intolerable levels. If our activities interfere too radically with the working of nature, then nature might no longer be capable of discharging its duties and providing the benefits, which now take for granted and upon which our survival depends. Hence, the growth-oriented theories must be replaced by theories of sustainable development that will not damage but will guarantee harmonious, coexistence of man, development and the eco-system.

**Sustainable development :**

Sustainable development refers to creating a style of economic development which is sustainable within the context of the planet's ecosystem and human society. The concept is a synthesis of economic and ecological ideas. It is a collection of concepts, ecological, economic, social and political that have been put together to address what is perceived by many to be a world environmental crisis. At the ecological level, it is designed as a science dealing with systematic relation between plants and animals and their habitat or environment. From its beginning as science, it has had powerful and fruitful cross-disciplinary connotations. It is inter-disciplinary and has a distinct scientific character which has been of interest not only to biologists, but also to zoologists, geographers, physical scientists and social scientists.

The concept of sustainable development is not only an ideology but a movement and a vision. At the level of ideology, it has drawn our attention to the global responsibilities and indicated that human beings are interrelated to the eco-sphere.

Gandhi's vision is represented by the approach of frugal sustainable society. It is the economic vision of a decentralized commune of pact industrial age. The emphasis is on personal self-sufficiency and voluntary frugality. It links human beings intimately with nature and puts faith in decentralized commune life where needs and wants are reduced to bare minimum and concept of work will significantly change. It is a vision of self-reliance, self-help, de-centralization labour intensive, localized and small scale in terms of technology, qualitative goals of a satisfying and meaningful life are seen as more important that quantitative values. Wealth is to be measured not just by monetary value as capital interest, but also by the health and well-being of people. Sustainability from a social view point is recognized as requiring equity freedom of individual, community cohesion, availability of jobs, maintenance of services and preservation of cultural diversity and

heritage values. A decentralized agrarian and non-state order is the ideal of this model. Due to its political origin the application of sustainable development tends to process oriented and bypasses economics. It often starts with a political view and ends with codification of production process without resort to economics either in decision making or applications. Gandhiji felt we needed development free from external dichotomies arising out of environment degradation, economic disparities and social tension. For him, environment protection and economic development both should reinforce each other. The idea of inter-connection and inter-dependence of all creatures, holistic view of development of which the world community is talking today has already been focused on incorporated in Gandhian philosophy.

**Seeker of truth :**

Gandhi was a devoted seeker of truth and therefore was a true scientist as science essentially constituted quest for truth. According to Gandhi, truth is the sovereign principle and includes numerous other principles like life consisted of his experiments with truth and narrated these experiments in his autobiography. Among the experiments of Gandhiji with truth, the most celebrated experiments were those with non-violence. Non-violence in its dynamic condition means conscious suffering. It does not mean meek submission to the will of the evil doer, but it implies putting of one's whole soul against the will of the tyrant. Working under this law of our being, it is possible for a single individual to save honour realization and soul and lay the foundation for that empire's fall on its regeneration.

**Non-violent Economics :**

The main objective of Gandhiji was to liberate India and get independence; was to establish equality among citizens. Equality in terms of status as well as in terms of economic equality was true economics according to Gandhiji for social justice, it promotes the good of all equally including the weakest. He firmly believed that economic equality is the master key to non-violent independence. Economic equality would abolish eternal conflict between the capital and lab our. For India to evolve along non-violent lines, Gandhiji advocated for decentralization. Accordingly a lot of efforts are being made to centralize industries, administration, distribution system, power production and every other thing that leads to a sustained socio-economic development.

**Gandhiji's Philosophy of Education :**

Gandhiji was not merely a political personality who let India to its independence, but was a thinker of great consistency whose ideas have pervasive and profound implication to economic, political and educational thought. In his philosophy of practicality, the pragmatism of the west and the idealism of India find a harmonious blend. Education for Gandhiji is contextual. It efficacy is determined by its adequacy to cope with and resolve problems as they arise in life situations. It depends on its success to produce action that transform existing realities in intelligent

ways. Gandhiji announced a system of new education. According to him the British system of education practised in India bore no relation to the actual conditions of life. The more one was educated , the more one tended to move away from the society and people around him, for one's education was based on an erroneous concept of developing abstract intellect outside its existential context. India is a country of villages. Consequently, the so-called educated man had difficulty in communicating with the villagers. Gandhiji pointed out that the text-books today deal not with aspect the students have always to deal with at homes and outside, but things to which they are perfect strangers and the primary education being practically of no use in after life become almost useless.

Education to be proper must help & shape lives and answer the wants of people. It is no education says Gandhiji, if it fails to make farmer's son a bitter farmer. The schools must be epitomes and images of the society. Their sole aim should be to prepare individuals to live intelligently and comparatively as a member of a community and shape habits of mind in relation to the actual movements of events. 'By education' says Gandhi, "I mean an all round drawing out of the best in the child and man, literacy is neither the beginning nor the end of education. It is one of the several tools that may be employed in the process of educating the child.

**The danger of corporate education :**

While it is certainly a priority for many government to build skills and capacities of their own young citizens, the model of utilitarian education can be highly disempowering for your recipients. Many of the so-called capacity building programmes right now complemented in developing countries under the banner of "Conflict prevention" and "Sustainable development" are nothing but political and social tools utilized by state institutions and foreign donors to manage and constrain young people by preventing their violent mobilization without offering any opportunity for self-growth and personal development. The overall goal of this current pedagogical models is certainly not to nurture and equip young people to attain their goals and aspirations but is rather to render them more docile by "forcing them" into the market and labour force.

Gandhi considered education and the schooling system as a milestone in the process of building the nation. He devoted several of his writings and works to design and explain his idea of a new type of education. For Gandhiji, education is, however, "an overall all round drawing out of the best in child, man, in body, mind and spirit and it cannot be limited only to the mere development of productive, income generating skills. For this reason, Gandhi found primary education to be the most important priority in the process of achieving home rule for India. Education in his thinking is about empowerment, freedom, service to others and liberation from any forms of violence, slavery and explanation and in order to be so it has primarily to empower people to think

critically and to act ethically. It also has to serve the purpose of strengthening and forging the character of individuals of developing courage and virtue.

The Gandhian idea of new education in an era of unprecedented demographic explosion and growing youths can provide, in my opinion, the way forward for many developing countries to reduce dependency from the international community of donors and private western corporations. The Gandhian scheme of education, in fact, aims at the complete empowerment of young people not as consumers or as employees but as human beings, integrated in and proud of their own national identity and strongly rooted in non-violent values, love, compassion and humanism.

**References :**


i) Yvonne Kemper (2005) : "Youth in War-to peace transition approaches of international organization." Bergh of Report, No. 10, p. 25.

ii) UN-DESA "Youth report," 2005.

iii) Susan Rice, Corinne Graff and Janet Lewis: "Poverty and Civil Wars: What policy makers need to know" in brooking Global Economy and Development, Working paper, December, 2006 -11.

iv) Yvonne Kemper (2005) : "Youth in War-to Peace transition: Approaches of international organization," Bug hot Report No. 10, P. 24.

v) Hartnett Richard (2006) : "The Three Cultures and the demise of multi-diversity in National Forum of Educational Administration and Supervision Journal Vo. 24, No. 4, 2006, P7.

vi) World Bank, World Development Report, 1995, P. 36.

vii) Edgar pieterse and Mirgam van Donk (2002) : "Capacity Building for poverty reduction," Dark Roast, occasional paper series No. 8, Isandla Institute, P. 19.

viii) Douglas Allen "Mahatma Gandhi's Philosophy of violence, non-violence and education" in Douglas Allen (edited by) "The Philosophy of Mahatma Gandhi for the Twenty-first Century,"P. 40.

ix) Keith Watson (1994) : "Technical and vocational education in "Developing countries Western Paradigms and Comparative Methodology,"in Comparative education Vol. 30; No. 2, P. 88.

x) Douglas Allen "Mahatma Gandhi's Philosophy of Violence, Non-violence and Education "In Douglas Allen (Edited by) "The Philosophy of Mahatma Gandhi for the Twenty-first Century. " P.55.


◆◆◆

ISSN 2320-0197

# जागतिक व्यापार संघटना आणि विकसनशील देशांच्या अन्नसुरक्षिततेचा वादप्रश्न

**प्रशांत हरमकर**
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

**प्रस्तावना :**

न्यूनविकसित देश, विकसनशील देश आणि अन्नधान्य आयात करणारे देश यांचा अन्नधान्यावरील खर्च संरचनात्मकरित्या वाढत आहे. या देशांना अन्नसुरक्षिततेबाबत धक्के बसत आहे. या धक्क्याचे मूळ आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणामधील सुधारणा आणि इतर स्रोत यात आहे. अन्नसुरक्षिततेबाबत बसणाऱ्या धक्क्यांना आळा घालण्याचा प्रयत्न जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) नियमांतर्गत होऊ शकतो.

व्यापारेत्तर वादप्रश्नाचा (Non-trade issues) संबंध अन्नसुरक्षिततेशी आहे. विशेषत: अन्नसुरक्षिततेचा संबंध विकसनशील देशांशी आहे. अन्नसुरक्षितता वैयक्तिक किंवा कुटुंब तसेच राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरची असू शकते. दीर्घकाळपर्यंत कौटुंबिक पातळीवर अन्नसुरक्षिता घडवून आणणे ही अतिशय महत्त्वाची बाब होय. यालाच संरचनात्मक अन्नसुरक्षितता घडून येणे असेही म्हणतात. विकसनशील देशांमधील दशलक्ष लोकांच्या अन्नसुरक्षिततेमध्ये गळत्या आहेत. याचे मूलभूत कारण दारिद्र्य आहे. दारिद्र्यामुळे क्रयशक्तीमध्ये अपुरेपणा असतो. जागतिक बाजारपेठेमध्ये पर्याप्त प्रमाणात अन्नाचा पुरवठा असताना दारिद्र्यातील लोकांकडे पुरेसे उत्पन्न नसल्यामुळे ते खरेदी करू शकत नाही. त्यामुळे अन्नाकरिता प्रभावी मागणी निर्माण होऊ शकत नाही. जर दारिद्र्यातील लोकांची क्रयशक्ती वाढली किंवा जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी विषयक करारानुसार दारिद्य्रातील लोकांना अर्थसाहाय्याच्या वर्गीकरणात बसविता आले तरच शासनाच्या अर्थसाहाय्यामुळे दारिद्र्यातील लोक अन्नाची मागणी वाढवू शकतील.

**कृषी विषयक करार आणि अन्नसुरक्षितता :**

जागतिक व्यापार वाटाघाटी अन्नसुरक्षिततेला दोन प्रकारे प्रभावित करू शकतात. प्रथम, व्यापार कराराचा परिणाम संरचनात्मक पुरवठ्यावर होतो. अन्नधान्याच्या किमती वाढू लागतात. किंमत वाढण्याची प्रवृत्ती दीर्घकाळपर्यंत राहिली तर अन्न असुरक्षितता घडून येते. कारण दारिद्र्यातील लोकांकडे क्रयशक्तीचा अभाव असतो. अपुरे उत्पन्न अन्नाची गरज पूर्ण करू शकत नाही. याकरिता त्या देशांचे शासन अंदाजपत्रकीय तरतुदी करून अन्नसुरक्षितता वाढविण्याचा प्रयत्न करतात. देशांमध्ये आर्थिक विकास घडवून आणताना ग्रामीण विकास आणि दारिद्र्यामध्ये घट हे त्याचे उद्दिष्ट असते. उरूग्वे फेरीचा कृषी विषयक करार देशीय अर्थसहाय्यावर भर देणारा आहे. यावरून विकसित आणि विकसनशील देशाची अर्थसहाय्य देण्याची पातळी कळते. विकसनशील देश कृषीविषयक धोरणे आणि कार्यक्रमाद्वारे कृषी क्षेत्राच्या वृद्धीला उत्तेजन

देतात. कृषी क्षेत्राचे उत्पन्न वाढले तर अन्नसुरक्षिततेमध्ये वाढ होते. वैयक्तिक पातळीवर अन्नसुरक्षितता प्राप्त होते. आर्थिक विकासासह ग्रामीण विकास आणि दारिद्र्यामध्ये घट घडून येते.

जागतिक व्यापार संघटनेच्या कराराची चौकट आर्थिक विकास आणि दारिद्र्यामध्ये घट यांना उत्तेजन देणारी असली तरी जागतिक व्यापार संघटनेचे नियम आणि अटी सबळ मतभेद निर्माण करणारे आहे. यामध्ये विकसनशील देशांच्या अर्थसाहाय्याचा वादप्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. अन्नसुरक्षितता ही संरचनात्मक स्वरूपाची बाब आहे. अन्नसुरक्षिततेचा संबंध व्यापार वाटाघाटीशी आहे. याबाबत ग्रीन बॉक्स(green box) अर्थसाहाय्याच्या मापनावर प्रकाश टाकावा लागतो. ग्रीन बॉक्स अर्थसाहाय्यामध्येच अन्नसुरक्षितेबाबत तरतुदी दिलेल्या आहे. कृषी विषयक कराराच्या परिशिष्ट २ ( Annex-2) च्या परिच्छेद ३ नुसार अन्नसुरक्षितता सार्वजनिक अन्नधान्य साठ्याचे (Public Stockholding) उद्दिष्ट आहे. अन्नसुरक्षितता कार्यक्रम राबविण्याकरिता अन्नधान्याचा संचय केला जातो. अन्नसुरक्षितता कार्यक्रम राष्ट्रीय कायदा म्हणून ओळखला जातो. अन्नसुरक्षितता कायद्यामध्ये उत्पादनाचा खाजगी साठा सुद्धा शासन समाविष्ट करून घेऊ शकतो. अन्नधान्याच्या साठ्यानुसार अन्नसुरक्षितता कार्यक्रमाची उद्दिष्टे ठरवली जातात. याबाबत वित्तीय पारदर्शकता असणे गरजेचे असते. शासन अन्नधान्याची खरेदी करून अन्नसुरक्षितता कार्यक्रमाअंतर्गत त्याची विक्री करू शकतो.

**जागतिक व्यापार संघटना आणि विकसनशील देश :**

भारत आणि इतर विकसनशील देश यांनी कृषी विषयक वाटाघाटीमध्ये आपला लढा चालू ठेवला आहे. गेल्या आठ वर्षापासून कृषी विषयक वाटाघाटीबाबत लढा देणे ही चिंताजनक परिस्थिती आहे. बाली (डिसेंबर २०१३) येथे झालेल्या परिषदेत विकसनशील देशांनी, G-33 गटाच्या देशांनी दारिद्र्यातील लोकांची भूक भागविण्याकरिता पुढाकार घेतला होता. भारताचे अन्नसुरक्षितता विधेयक दारिद्र्यातील लोकांना अन्नधान्याकरिता अर्थसहाय्याची तरतूद पुरविणारे आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमामध्ये अकारण ताठरता आहे. विकसनशील देशांमधील सार्वजनिक अन्नधान्य साठवणूक कार्यक्रमाला धक्के बसत आहे. म्हणून अन्नसुरक्षितेच्या बाबतीत G-33 ने प्रस्ताव ठेवला आहे. हा प्रस्ताव धोरणात्मक पातळीवर मोठा दिलासा देणारा आहे. म्हणून G-33 च्या अन्नसुरक्षितता प्रस्तावाला बालीमधील नवव्या मंत्री स्तरीय परिषदेमध्ये मान्यता मिळणे आवश्यक होते.

दोहा फेरीची उद्दिष्टे साध्य करणे मृगजळ ठरले आहे. तरीदेखील G-33 चा प्रस्ताव गुंतागुंतीच्या अर्थसाहाय्याबाबत व कृषीविषयक कराराच्या अडथळ्याशी संबंधित आहे. व्यापार नियमांमध्ये अडथळे निर्माण करण्याचे कसब आहे. दोहा फेरीच्या अनुषंगाने वाटाघाटी होत असताना व्यापार नियम सार्वजनिक अन्नधान्य साठवणुकीच्या बाबतीत आहे. याचा संबंध विकसनशील देशांच्या अन्न आणि जीविका सुरक्षिततेशी आहे.

कृषी विषयक कराराच्या चौकटी अंतर्गत विकसनशील देशांना त्याचे अन्नसुरक्षितता धोरण राबवायचे आहे. कृषी विषयक कराराच्या नुसार ग्रीन बॉक्स अर्थसहाय्यातंर्गत विकसित देश उच्च बाजार किंमत देतात, धान्य साठवणुकीचे कार्यक्रम राबवितात. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर किमती न्यूनतम पातळीला जातात. ग्रीन बॉक्स अर्थसाहाय्य या

प्रकारची व्यापार विरूपणे घडवून आणतात. मात्र विकसनशील देश किमान पेक्षा कमी (De-minimus support) अर्थसहाय्यातंर्गत तांदूळ आणि गहू उत्पादनाला एकूण उत्पादनाच्या १० प्रतिशत पर्यत अर्थसाहाय्य देतात. किमान पेक्षा कमी अर्थसाहाय्य व्यापार विरूपीत करीत नाही. मात्र किमान पेक्षा कमी अर्थसाहाय्याचे मापन १९८६-८८ च्या बाह्य संदर्भ किंमत (external reference price) किंवा चालू बाजार किंमतीच्या आधारे केले जाते. १९८६-८८ या आधार वर्षातील चालू बाजार किमतीची भूमिका महत्त्वाची आहे. आधार वर्षाच्या अनुषंगाने सध्याच्या बाजार किमतीचे मापन केले तर तांदुळाच्या किमतीमध्ये ३०० प्रतिशत तर गव्हाच्या किमतीमध्ये २९० प्रतिशत वाढ झाल्याचे दिसून येते. जागतिक व्यापार संघटनेमध्ये सद्यःस्थितीत १९८६-८८ या आधार वर्षाच्या साहाय्याने अर्थसाहाय्याचे मापन करणे योग्य आहे का ? एकूणच गरीब शेतकऱ्यासाठी अर्थसाहाय्याच्या अटीबाबत निष्काळजीपणा घेत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

व्यापार विरूपित अर्थसाहाय्यासाठी विवेकी मापन असणे आवश्यक आहे. धान्याची सार्वजनिक खरेदी ( Public procurement ) आणि धान्याच्या वितरणाचे धोरण विकसनशील देशातील दारिद्र्यातील लोकांकरिता असावे. सार्वजनिक धान्य खरेदी आणि धान्य वितरणाचे मापन ग्रीन बॉक्स अंतर्गत झाले तर किमान व्यापार विरूपणे घडून येतील. प्रामाणिकपणे सार्वजनिक धान्य साठवणूक धोरणामध्ये कपात करणे अविवेकी आहे. याच पार्श्वभूमीवर जागतिक व्यापार संघटनेमध्ये भारत, चीन, इंडोनिशिया, पाकिस्तान आणि फिलीपाईन्स या देशांनी विरोध केला आहे. बाली मंत्रिपरिषदेमध्ये (२०१३) भारताचे अन्नसुरक्षितता विधेयक विवादाचा सामना करीत होते. अर्थसाहाय्यामध्ये बदल होण्याची शक्यता असताना व्यापार सुविधा करारमध्ये (Trade facilitation) अन्नसुरक्षितता हा वादप्रश्न महत्त्वाचा राहिला.

अन्नसुरक्षिततेचा वादप्रश्न सार्वजनिक धान्य साठवणुकीशी जुळलेला आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी विषयक करारांतर्गत त्याची चर्चा होणे आवश्यक आहे. मुख्यत्वे विकसनशील देशांना अन्नसुरक्षिततेची अंमलबजावणी करायची आहे. विकसनशील देश आणि जागतिक व्यापार संघटना यामधील अन्नसुरक्षिततेच्या वादप्रश्नाबाबत तज्ञ गटाने अहवाल सादर केला आहे. या तज्ञ गटामध्ये रूबेन रिक्युपिइरो, एस. नारायण, अली मशुमो, ली ऐनहेग, कॅरलॉस कॅरिया, दिपक नेंय्यर, नाशन इरयुम्बा, येलियाझ अकायझु आणि चक्रवर्ती राघवन याचा समावेश आहे. या तज्ञ गटाच्या समितीने काही वादप्रश्न उपस्थित केलेले आहे.

**वाद प्रश्नांची पार्श्वभूमी :**

विकसनशील देशांसाठी अन्नसुरक्षितेचा आयाम महत्त्वपूर्ण आहे. बाली मंत्रिपरिषदेमध्ये G-33 देशाच्या गटाने अन्नसुरक्षिततेचा वादप्रश्न आणला होता. हा वादप्रश्न दोहा फेरीच्या वाटाघाटी अंतर्गत आला होता. जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी विषयक करारानुसार उरूग्वे फेरीमध्ये वाटाघाटी झाल्या. बाली मंत्रिपरिषदेमध्ये या वाटाघाटीचाही दबाव होता. अन्नसुरक्षिततेसाठी सार्वजनिक धान्य साठवणुकीचे उद्दिष्ट ग्रीन बॉक्स अंतर्गत समाविष्ट आहे. ग्रीन बॉक्स अर्थसाहाय्याची मांडणी देशीय अर्थसहाय्य (Domestic support) म्हणून केलेली आहे. या अर्थसाहाय्याचा संबंध किमान किंवा व्यापारेत्तर विरूपणाशी असल्यामुळे या अंतर्गत अर्थसाहाय्य देण्याला मर्यादा नाही. ग्रीन बॉक्स अंतर्गत अर्थसाहाय्यामध्ये वाढ व विस्तार होऊ शकते. ग्रीन

बॉक्स अर्थसाहाय्य सार्वजनिक धान्य साठवणुकीच्या बाबतीत महत्त्वपूर्ण अट पूर्ण करू शकतो.

दुसरी महत्त्वपूर्ण अट अशी आहे की, शासनाने चालू बाजार किमतीवर धान्य खरेदी करावे आणि सार्वजनिक धान्य साठवणूक कार्यक्रमातंर्गत धान्य विक्री करावी. मात्र विक्री किंमत चालू बाजार किमतीपेक्षा कमी नसाव्यात. याबाबत बरीच भिन्नता जागतिक व्यापार संघटनेच्या अर्थसाहाय्य मापनामध्ये आहे. प्रशासकीय किंमत (procurement price) आणि चालू बाजार किंमत यामधील अंतराचे (gap) मापन अंबर बॉक्स (Amber Box or Aggregate measurment of support - AMS) मध्ये होते. याला विरूपित अर्थसाहाय्य म्हटले आहे. ग्रीन बॉक्स अर्थसाहाय्यामध्ये व्यापार विरूपित अर्थसाहाय्य म्हणून अन्नसुरक्षिततेसाठी धान्य साठवणूक ही अट नाकारलेली आहे. G-33 च्या प्रस्तावामध्ये विकसनशील देशांना धान्य साठवणूक करणे आवश्यक मानले आहे. न्यून उत्पन्न अर्थसाहाय्य किंवा गरीब शेतकऱ्यांना दिलेले अर्थसाहाय्य अंबर बॉक्स अंतर्गत समाविष्ट नसावे. प्रस्तावामध्ये विकसनशील देशांना धान्य साठवणूक करणे गरजेचे वा आवश्यक आहे.न्युन उत्पन्न अर्थसहाय्य किंवा गरीब शेतकऱ्यांना दिलेले अर्थसहाय्य अंबर बॉक्स अंतर्गत नसावे. जर G-33 च्या प्रस्तावाचा स्वीकार केला तर विकसनशील देशांना सामर्थ्य प्राप्त होईल. योजनाचे सुसूत्रीकरण आणि अंमलबजावणी करता येईल.

जागतिक व्यापार संघटनेचा कृषीविषयक करार मर्यादा निर्माण करतो. या मर्यादांमुळे राष्ट्रीय अन्नसुरक्षिततेला उत्तेजन मिळत नाही. लहान शेतकऱ्यांच्या जीविकेला पुढाकार मिळत नाही. मिलेनियम डेव्हलपमेंट गोल (millenium development goal) अंतर्गत भुकेले आणि दारिद्र्यात राहणाऱ्याच्या संख्येत कपात करता येत नाही. त्यामुळे बाली मंत्रीस्तरीय परिषदेमध्ये विकसनशील देशांत यश प्राप्त होणे आवश्यक होते.

**विकसनशील देश आणि सार्वजनिक धान्य संग्रहण :**

सार्वजनिक धान्य संग्रहण महत्त्वाचा वादप्रश्न आहे. हा वादप्रश्न केवळ व्यापार अटीच्याच दृष्टिकोनातून महत्त्वाचा नाही तर विकसनशील देशातील लोकांची अन्नसुरक्षितता आणि हजारो लहान शेतकऱ्यांच्या जीविकेचा वादप्रश्न आहे. धान्यसाठा विकासाचे साधन मानले आहे. अनेक विकसित देशांनी विकासाच्या प्रक्रियेत धान्य साठवणूक केलेलीच आहे. धान्य साठवणुकीच्या बाबतीत विकसनशील देशांना काही मूलभूत प्रश्न निर्माण झालेले आहे.

१. धान्य साठवणुकीच्या बाबतीत विकसनशील देशांमध्ये अनिश्चितता आहे. जागतिक बाजारामध्ये आणि धान्याच्या जागतिक किमतीमध्ये उच्चावचने आहेत. विकसनशील देशाच्या व्यूहनितीचा चिंताजनक भाग म्हणजे अन्नसुरक्षितता आहे. आजचे जागतिक अन्नधान्य बाजार भिन्न आहे. उरूग्वे फेरी कालावधी (१९९० ते २०००) मध्ये जागतिक बाजारामध्ये अन्नधान्य स्वस्त झाले आणि धान्य साठा विपुल राहिला. मात्र ही परिस्थिती दीर्घकाळ टिकून न राहता दोहा फेरीमध्ये अन्नधान्याच्या किमती वाढल्या तर अन्नधान्य साठा अपुरा झाला आहे.

२. अनेक विकसनशील देश पसरत जाणाऱ्या ग्रामीण दारिद्र्याचा सामना करीत आहे. साधारणपणे विकसनशील देशांमध्ये लहान आकारमान असलेल्या शेतीवर १.५ अब्ज शेतकरी अवलंबून आहे. एकूण लोकसंख्येचा मोठा भाग कृषी क्षेत्राशी जुळलेला

आहे. औद्योगिक आणि सेवाक्षेत्र पुरेसा रोजगार निर्माण करू शकत नाही. म्हणून गरीब शेतकऱ्याचे उत्पन्न शाश्वतीचे आणि स्थिर असणे आवश्यक असते.

३. आंतरराष्ट्रीय पातळीवर अन्नाचा अधिकार महत्त्वाचा मानला आहे. यातंर्गत पुरेसे अन्न प्राप्त होणे आणि अन्नाचे संरक्षण होणे आवश्यकता असते. त्यामुळे अन्नाचा पूर्ण अधिकार प्राप्त होतो. याकरिता खात्रीशीर जीविका आणि अन्नसुरक्षितता प्राप्त होणे गरजेचे आहे. मात्र जागतिक व्यापार संघटनेचे काही सदस्य देश या अधिकाराचा अनादर करतात. इत्यादी विविध समस्यांचा सामना विकसनशील देशाचे कृषिक्षेत्र आणि अन्नसुरक्षितत्ता करीत आहे.

**अन्नसुरक्षितता आणि G-33 चा प्रस्ताव :**

ग्रीन बॉक्स अंतर्गत अन्नसुरक्षिततेसाठी धान्य साठवणुकीची तरतूद प्रस्तुत आहे. ग्रीन बॉक्स अर्थसहाय्य अनेक पदांचे (items) अंतर्गत दिल्या जाते. या अर्थसहायाचा उपयोग जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य असणाऱ्या विकसित देशांनी प्रामुख्याने केलेला आहे. विकसित देश अमर्याद अर्थसहाय्य ग्रीन बॉक्स अंतर्गत देतात. विकसनशील देश सार्वजनिक धान्यसाठवणूकीकरिता अर्थसहाय्य देतात त्या अर्थसाहाय्यामध्ये भेद केलेला आहे. विकसनशील देश धान्यसाठवणूकीकरिता जे अर्थसहाय्य देतात त्याचा समावेश अंबर बॉक्स (AMS) अंतर्गत केला आहे. G-33 च्या मते विकसनशील देश अर्थसाहाय्य देतात त्याचा समावेश अंबर बॉक्स अंतर्गत होत नाही तर धान्य साठवणुकीकरिता दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याचे मापन ग्रीन बॉक्स अर्थसहाय्यातंर्गत होते. म्हणून विकसनशील देश अन्नसुरक्षिततेकरिता धान्य साठवणूकीला अर्थसाहाय्य देतात त्याचा समावेश कृषी कराराच्या परिशिष्ट २ च्या परिच्छेद ३ नुसार ग्रीन बॉक्स अर्थसाहाय्यामध्ये व्हावा.

अंबर बॉक्स नुसार विकसनशील देश सार्वजनिक धान्य साठवणूकीचा कार्यक्रम राबवू शकत नाहीत. कृषी वस्तूच्या किंमतीच्या बाबतीत पाहिले तर खाद्यान्न, भाज्या आणि मांस यांच्या किंमती दुपटीने वाढलेल्या आहे. तर काही कृषी वस्तूंच्या किंमती तिप्पट, चौपट किंवा अधिक पटीने वाढलेल्या आहे. उरूग्वे फेरी वाटाघाटीशी तुलना केली तर विकसनशील देशाच्या सार्वजनिक धान्य साठवणुकीचे मापन अंबर बॉक्स अंतर्गत होते अर्थसाहाय्य मापनाकरिता किमतीचे आधार वर्ष १९८६-८८ गृहीत धरलेले आहे. १९८६-८८ च्या बाजार किमती आणि विकसनशील देशांची शासने देत असलेली आजची प्रशासकीय किंमत यामध्ये फार मोठी किंमत भिन्नता आहे. या दोन किमतीमधील अंतर (gap) म्हणजे अर्थसाहाय्य मानल्या गेले आहे. याप्रकारे १९८६ - ८८ या आधार वर्षाच्या आधारे अर्थसहाय्याचे मापन करणे असमन्यायी आहे. या आधारावर विकसनशील देशाच्या अर्थसहाय्याचे मापन होत असेल तर विकसनशील देश अंबर बॉक्स आणि किमानपेक्षा कमी (De-minimus) अर्थसहाय्याची मर्यादा केव्हाच ओलांडू शकतात. विशेष असे की, अनेक विकसनशील देशांनी उरूग्वे फेरी कालावधीमध्ये अंबर बॉक्स अर्थसहाय्य स्पष्ट केले होते. या अंतर्गत दारिद्र्यात राहणाऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची तरतूद उरूग्वे फेरी कलावधीमध्ये होती. विकसनशील देश किमान पेक्षा कमी अर्थसहाय्यातर्गत १० प्रतिशत अर्थसहाय्य देत होते. या अर्थसहाय्याची मर्यादा एकूण उत्पादनाच्या १० प्रतिशत पर्यत अर्थसहाय्य देण्याची आहे. चीनने ८ प्रतिशत पर्यत अर्थसहाय्य (किमानपेक्षा कमी) अर्थसहाय्यातंर्गत दिलेले आहे.

G-33 ने प्रस्ताव सादर करताना नमूद केले

की, हा केवळ सूत्रबद्ध असा प्रस्ताव नसून डिसेंबर २००८ च्या जागतिक व्यापार संघटनेच्या बैठकीमध्ये कृषी वाटाघाटी अंतर्गत आलेला अन्नसुरक्षिततेचा वादप्रश्न आहे. तेव्हापासून वाटाघाटीमध्ये तो स्थिर झाला आहे. विकसनशील देशांकरिता ग्रामीण रोजगार, ग्रामीण जीविका आणि अन्नसुरक्षितता याकरिता सुरक्षाजाल (safeguard) असणे आवश्यक आहे. याबाबतचा प्रस्ताव दोहा मंत्रीपरिषद (२००१) आणि हाँगकाँग मंत्रिपरिषद (२००५) मध्ये सुद्धा होता. अन्नसुरक्षितता ही प्रामुख्याने विकसनशील देशांची समस्या आहे. म्हणून कोणत्याही अटीशिवाय सार्वजनिक धान्य साठवणूक कार्यक्रम ग्रीन बॉक्स अंतर्गत आणण्यात यावा. विकसनशील देश सार्वजनिक धान्य साठवणुकीची अंमलबजावणी करताना मर्यादा पाळणार नाही तर किमानपेक्षा कमी अर्थसहाय्याची मर्यादा भंग पावेल.

**अर्थसहाय्य तरतूदीचे असंतुलन :**

उरूग्वे फेरिच्या कृषी विषयक करारामध्ये असंख्य आणि असहय्य पळवाटा आहे. हा कृषी विषयक करार विकसनशील देशांकरिता तिहेरी संकट निर्माण करणारा आहे. पहिले खाद्यान्न अर्थसहाय्य, न्यून उत्पन्न अर्थसहाय्य आणि प्रशासकीय किमती याची तुलना १९८६-८८ चा आधार वर्षाच्या बाजार किमतीच्या आधारे करणे अयोग्य आहे. दुसरे अर्थसहाय्याचे मापन एकूण उत्पादनाच्या आधारावर केले जाते. प्रत्यक्षात अर्थसहाय्याचे मापन प्रशासकीय किमती अंतर्गत धान्याचा साठा या प्रकारे होणे आवश्यक आहे. याप्रकारे मापन होत नसल्यामुळे ते अर्थसहाय्याचे मूल्य फुगवून सांगितल्या जाते. तिसरे, दिलेल्या अर्थसहाय्याचे मापन व्यापार विरूपित अर्थसहाय्य म्हणून केले जाते. मात्र प्रत्यक्षात मोठी वास्तविक आणि रोख स्वरूपातील अर्थसहाय्य विकसित देश देतात. त्यांच्या शेतकऱ्यांना समान कार्यक्रमातंर्गत दिलेल्या अर्थसहाय्याचे मापन व्यापार विरूपित अर्थसहाय्य म्हणून होत नाही.

उरूग्वे फेरी नुसार विकसनशील देशांना अंबर बॉक्स अर्थसहाय्य शून्य पातळीवर आणायला सांगितलेली आहे. यामुळे असमानता निर्माण झालेली आहे. जागतिक व्यापार संघटनेचे ७१ सभासद विकसनशील देशांपैकी ६१ विकसनशील देश प्रभावित झालेले आहे. याबाबत विकसनशील देशांनी स्पष्ट सांगितले की, त्याच्या राजकोषीय मर्यादा अंतर्गत ते अल्पशा प्रमाणातच अर्थसहाय्य देतात. विकसनशील देश अंबर बॉक्स अंतर्गत अर्थसहाय्य देऊ शकत नाही तर केवळ किमान पेक्षा कमी अर्थसहाय्य (De-minimus) देऊ शकतात. जागतिक व्यापार संघटनेमध्ये अंबर बॉक्स अंतर्गत फार विरोधाभास पहायला मिळतो. विकसित देशांना अंबर बॉक्स अंतर्गत २० प्रतिशतपर्यंत कपात करायची होती मात्र ती त्यांनी केली नाही. अमेरिका अंबर बॉक्स अंतर्गत १९ अब्ज डॉलर तर युरोपियन संघ ७२ अब्ज युरो अर्थसहाय्य देतो.

उरूग्वे फेरीनुसार विकसित देशांनी अंबर बॉक्स अर्थसहाय्यामध्ये कपात करायला पाहिजे होती. त्यांनी ती केली नाही. मात्र पुढे अंबर बॉक्स मधली अर्थसहाय्य कमी करून ग्रीन बॉक्स मधली अर्थसाहाय्य वाढवली. अमेरिका १९९५ मध्ये एकूण देशीय अर्थसहाय्य ६१ अब्ज डॉलर देत होता त्यापैकी ४६ अब्ज डॉलर अर्थसहाय्य ग्रीन बॉक्स अंतर्गत दिल्या जात होते. २०१० मध्ये एकूण देशीय अर्थसाहाय्य १३० अब्ज डॉलर दिल्या जात होते त्यापैकी १२० अब्ज डॉलर अर्थसहाय्य केवळ ग्रीन बॉक्स अंतर्गत दिल्या जात होते.

१९९५-२०१० या पंधरा वर्षाच्या

कालावधीमध्ये अमेरिकेचे एकूण देशीय अर्थसहाय्य दुप्पटीने वाढले तर ग्रीन बॉक्स अंतर्गत अर्थसहाय्य तिप्पटीने वाढल्याचे दिसून येते. युरोपियन संघ १९९५ मध्ये ९० अब्ज युरो एकूण देशीय अर्थसहाय्य देत होता त्यापैकी १९ अब्ज युरो ग्रीन बॉक्स अंतर्गत दिल्या जात होते. युरोपियन संघाने एकूण देशीय अर्थसहाय्य २००२ मध्ये ७५ अब्ज युरो, २००६ मध्ये ९० अब्ज युरो तर २००९ मध्ये ७९ अब्ज युरो दिले. त्यापैकी ग्रीन बॉक्स अंतर्गत ६४ अब्ज युरो अर्थसहाय्य २००९ मध्ये दिले. १९९५ च्या तुलनेत २००९ मध्ये युरोपियन संघाच्या ग्रीन बॉक्स अर्थसहाय्यामध्ये तिप्पटीपेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसून येते या प्रकारे विकसित देशानी ग्रीन बॉक्स अंतर्गत अर्थसहाय्यामध्ये वाढ केली. आर्थिक सहकार्य आणि विकास संघटन (Organisation for Economic Co-operation and Development -OECD) देशांच्या अहवालानुसार या गटाअंतर्गत असणारे औद्योगिक विकसित देश १९९६ मध्ये कृषी अर्थसहाय्य ३५० अब्ज डॉलर देत होते. तर २०११ मध्ये ४०६ अब्ज डॉलर कृषी अर्थसहाय्य दिले होते. कृषी विषयक कराराच्या पळवाटाचा उपयोग करून प्रचंड अर्थसहाय्य विकसित देश त्याच्या कृषी क्षेत्राला देतात.

विकसित देश ग्रीन बॉक्स अर्थसहाय्यातंर्गत प्रचंड अर्थसहाय्य देतात मात्र G-33 च्या प्रस्तावानुसार अन्नसुरक्षितता आणि धान्य साठवणूक कार्यक्रमाला अर्थसहाय्य दिले तर व्यापार विरूपणे निर्माण करणारे म्हणून आक्षेप घेतात. ही विकसित देशांची दुप्पटी भूमिका प्रस्तावाची परिणामकारकता कमी करणारी आहे. G-33 चा प्रस्ताव म्हणजे कायमचा अन्न सुरक्षिततेची समस्या सोडविण्याचा उपाय आहे.

**विरूपणाचे मापन :**

अर्थसहाय्य मापनाची समन्याय पद्धत असणे आवश्यक आहे. जर शासन प्रशासकीय किंमतीवर उत्पादकाकडून धान्याची खरेदी करीत असेल तर अर्थसहाय्य म्हणजे प्रशासकीय किंमत आणि चालू बाजार किंमत यामधील फरक गुणीला शासनाने खरेदी केलेल्या मात्रा (वजन/नग) असायला पाहिजे. मात्र हे सूत्र कृषी विषयक कराराला मान्य नाही. कृषी विषयक कराराच्या परिशिष्ट ३, परिच्छेद ८ नुसार बाजार किंमत अर्थसाहाय्य म्हणजे चालू बाजार किंमत आणि लागू प्रशासकीय किंमतीमधील फरक (gap) गुणेला एकूण उत्पादनाच्या मात्रा होय. कृषीविषयक करारातील बाजार किंमत अर्थसहाय्याच्या सूत्रामुळे वास्तविक अर्थसहाय्याचे मापन होत नाही.

शासन एकूण उत्पादनाचा काही भागच प्रशासकीय किमतीच्या आधारे खरेदी करते. मात्र प्रत्यक्षात त्याचे निर्वचन करताना त्या देशातील १०० प्रतिशत उत्पादनाला अर्थसहाय्य दिल्याचे म्हटले जाते व त्याचे मापन अंबर बॉक्स अंतर्गत केल्या जाते. म्हणून प्रशासकीय किंमत अर्थसहाय्याचे निर्वचन कृषी कराराच्या चौकटीमध्ये योग्य प्रकारे होण्याची आवश्यकता आहे.

**नववी मंत्रीस्तरीय परिषद – बाली बैठक :**

बाली मंत्री परिषद ब्राझिलच्या रॉबंरटो कारव्हलओ डि एझिव्हेडो या नवीन महासंचालकाच्या (Director General) नेतृत्वामध्ये संपन्न झाली. एझिव्हेडो यांनी तीन महिन्यापूर्वीच महासंचालकाचा कार्यभार स्वीकारला. पास्कल लॅमे यांनी २००५ते २०१३ पर्यत जागतिक व्यापार संघटनेचा महासंचालक म्हणून कार्यभार पाहिला होता.

बाली मंत्रीस्तरीय परिषदेमध्ये व्यापार मंत्र्यांनी युक्त्या चालवायला सुरूवात केली होती.

अन्नसुरक्षिततेसाठी सार्वजनिक धान्य साठवणूकीचा मसुदा गोंधळात तयार करण्यात आला.G-33 च्या अन्नसुरक्षितताच्या प्रस्तावाला प्रचंड विरोध अमेरिका आणि युरोपीयन समुदायाने केला.

कृषी विषयक करारामध्ये बदल घडवून आणण्याकरिता दबावांची मध्यवर्ती भूमिका भारताने पार पाडली. भारतीय मुत्सद्यांनी वाटाघाटी करतांना १९८६-८८ या आधार वर्षाच्या किमती अद्यावत (update) करण्याची गरज लावून धरली. सार्वजनिक साठवणूक कार्यक्रमासाठी तात्पुरते यांत्र निर्माण (interim mechanism) करण्यात आले. भारताने अन्नसुरक्षिततेकरिता पर्याय दिलेले होते. तात्पुरत्या यंत्रणेमध्ये बदल करण्यास सांगितले. मात्र अमेरिकेच्या मते भारताचा हा प्रस्ताव घडी बिघडवणारा (ruckus) आहे त्यामुळे तो स्वीकार करू नये. अमेरिका, भारत आणि महासंचालक यांच्या मध्ये वाटाघाटी होत असताना भारताच्या मते हंगामी उपाययोजना ऐवजी कायमची उपाययोजना होणे आवश्यक आहे. मात्र अर्थसाहाय्य आणि प्रतिसंतुलनकारी उपाययोजनेनुसार (Agreement on subsidies and counter railing measures) हंगामी किंवा तात्पुरत्या उपाययोजना लागू केल्यात.

कृषी कराराच्या कलम १३ नुसार अर्थसहाय्य आणि प्रतिसंतुलनकारी उपाययोजनाची तरतूद आहे. या हंगामी उपाययोजनेमध्ये बऱ्याच उणिवा आहेत. यामुळे पारंपरिक खाद्यान्न पिकांसाठी सार्वजनिक साठवणुकीचे आव्हान भविष्यात निर्माण होईल. या हंगामी उपाययोजनेच्या विरूद्ध विवाद निवारण यंत्रणेमध्ये दाद मागितली तर हंगामी यंत्रणेच्या विरूद्ध निर्णय दिल्या जाणार नाही. भारतासारख्या देशासमोर हंगामी उपाययोजना अन्नसुरक्षिततेबाबत समस्या वाढविणाऱ्या आहे.

**समारोप :**

अन्नसुरक्षितता वाद प्रश्नांबाबत भारत आणि विकसनशील देश अतिउत्सुक होते. मात्र या वादप्रश्नाची सोडवणूक तात्पुरत्या अटी अंतर्गत करण्यात आली. बाली मंत्रीपरिषदतेची निष्पत्ती म्हणजे अन्नसुरक्षितता वादप्रश्नाबाबत ऐवढा लढा विकसनशील देशांनी देऊन सुद्धा केवळ प्राथमिक स्वरूपात मान्यता देण्यात आली. अन्नसुरक्षितते बाबतची पुढील चर्चा पुढील चार वर्षांनी (डिसेंबर २०१७) होणाऱ्या अकराव्या मंत्रीस्तरीय परिषदेत होईल. जागतिक व्यापार संघटना विकसनशील देशाची अन्नसुरक्षितता सोडविण्यास असमर्थच ठरली असेच सरतेशेवटी म्हणावे लागेल.

**संदर्भ सूची :**

1) Ingco D. Merlinda & Nash D.Joan (2005) (Edited) : Agriculture and The WTO, Atlantic Publication, New Delhi.
2) Bhalla G.S. ( 1994) : Economic Liberalisation and Indian Agriculture Institute of Studies in Industrial development, New Delhi.
3) Chand Ramesh & Philip Linu Mathew (2001) : Subsidies and support in Agriculture - Is WTO providing level playing field. EPW, Aug. 11-17.
4) Sharma Devendra (2004) : WTO and Agriculture:green boy subsidy must go, Vol. XXX-IX No. 20, May 15-21.
6) Editorials (2013) : Trade distorting food security, Vol. XLVIII, No. 22, June -1.
7) Expert group (2013) : The WTO Bali Ministrial and Food Security. Vol. -XLVIII No. 49, Des - 7.
8) Bureau (2013) : WTO seals $ 1 trillion landmark trade deal in Bali, The Economic Times, Des. 8-14.
9) Kanth Ravi D. (2014) : What happened at the Bali WTO meet and why. Vol.- XLIX No. 2 January-11.

(ग्रंथ परिचय)

# विदर्भातील कुष्ठरोगी सेवा संस्थांचे अध्ययन आधारवड कुष्ठरुग्णांचा

**लेखक – विभा सावरकर,** अमरावती.

(प्रकाशक - सेंटर फॉर इकॉनॉमिक अॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती. किंमत: ३५०/-, पृष्ठसंख्या -२८०)

**वनिता चोरे**

अर्थशास्त्र विभागप्रमुख, कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, अमरावती.

अर्थशास्त्र व मानवी समाजाचे चित्रण संशोधनाच्या माध्यमातून अनेक अभ्यासक करतात. परंतु समाजातील एक उपेक्षित घटक म्हणजे कुष्ठरुग्ण. समाजाने दुर्लक्षित केलेल्या घटकांचे आर्थिक अध्ययन संशोधनाच्या रूपाने करून ग्रंथ वाचकांसाठी प्रसिद्ध केला आहे ही अभिनंदनाची बाब आहे. विशेष म्हणजे मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे मराठीमध्ये उत्कृष्ट ग्रंथलेखन करणाऱ्या स्त्री लेखिकेला 'बयोबाई श्रीपतराव कदम स्मृती पारितोषिक (११ हजार रू.) दरवर्षी देण्यात येते. यावर्षीचे पारितोषिक डॉ.विभा सावरकर मॅडमच्या या पुस्तकास प्राप्त झाले ही आम्हा सर्वांसाठी अभिनंदनाची बाब आहे. या पुस्तकाला ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ.दि.व्यं.जहागिरदार यांची प्रस्तावना लाभली असून लेखिकेचा कुष्ठरुग्णांबाबत असणारा सहानुभूतीचा दृष्टिकोन शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्नांचे कौतुक करून कुष्ठरुग्णांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचे कार्य केले हे प्रस्तावनेतून स्पष्ट केले आहे.

समाजातील उपेक्षित घटकांचे यथार्थ चित्रण, कुष्ठरुग्णांची जीवनशैली, कुष्ठरुग्णांच्या संदर्भात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था, शासकीय धोरण, स्वयंसेवी संस्थांची चळवळ, समस्यांचे स्वरूप, कुष्ठरुग्णांच्या समस्यांचे स्वरूप, कुष्ठरुग्णांच्या समस्यांचे निर्मूलन व पुनर्वसन करण्याकरिता ज्या संस्था कार्य करीत आहे विशेषत: विदर्भातील कुष्ठरुग्णांकरिता कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्थांचा आर्थिक व सामाजिकदृष्टीने अभ्यास केला आहे.

प्रस्तुत पुस्तकात एकूण आठ प्रकरणे आहेत. त्यामध्ये सामान्य वाचकाला समोर ठेवून कुष्ठरुग्णांविषयीची माहिती प्रास्ताविकामधून अत्यंत उत्कृष्ट, सोप्या भाषेत विशद केली आहे. कुष्ठरुग्णांच्या समस्येवर थोड्याच लेखकांनी लिखाण केले आहे. परंतु या पुस्तकाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे या क्षेत्रात कार्य करणाऱ्या विदर्भातील १) महारोगी सेवा समिती, मनोहरधाम दत्तपूर, वर्धा. (१ एप्रिल १९३६) २) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन, अमरावती. (१ जुलै, १९५०) या दोन समाजसेवी संस्थांचे उत्पन्न आणि खर्चाचे स्वतंत्र अध्ययन प्रकरण ४ मध्ये केले आहे. कुष्ठरुग्णांचा सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी कुष्ठरोगी सेवा संस्था, संस्थेचे उत्पन्न व शासकीय अनुदान या घटकांमध्ये परस्पर संबंध कशा स्वरूपाचा आहे हे पाहण्यासाठी 'सहसंबंध गुणक पद्धती' चा उपयोग करण्यात आला व निष्कर्ष काढण्यात आले. यावरून लेखिकेने शास्त्रीयदृष्ट्या चिकाटीने, काळजीपूर्वक अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक नवीन संशोधकास मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे.

कुष्ठरुग्णांविषयीची समाजधारणा, त्यातून निर्माण गैरसमज, कुष्ठरोग ही केवळ वैद्यकीय व आरोग्यविषयक समस्या नसून सामाजिक आर्थिक,

मानसिक समस्या होय. कुष्ठरुग्णांचे पुर्नवसन' प्रकरण ६ मध्ये अभ्यासले आहे. 'पुर्नवसन म्हणजे कुष्ठरोगी ज्या समाजाच्या प्रवाहातून बहिष्कृत झाले त्याच समाजात त्यांना पूर्ववत सन्मानपूर्वक स्थान मिळणे.' हे मिळवून देण्यासाठी महात्मा गांधीच्या विचाराने प्रेरित होऊन मिशनरीमध्ये कार्य करणारे शिवाजीराव ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन यांनी अमरावती मध्ये ग्राम तपोवन येथे निर्माण केलेले कुष्ठधाम, त्याठिकाणी चालू असलेले पुनर्वसनाचे कार्य यांचे चिकित्सक अध्ययन पुनर्वसन संकल्पना, पुनर्वसनाबाबतचे सामान्य तत्त्व, अभ्यास गटांच्या शिफारशी हा सामाजिकदृष्ट्या काटेकोर अत्यंत सूक्ष्म निरीक्षणाच्या संदर्भातील अनेक दाखले हा त्यांचा पुरावा होय.संशोधन करणे व पुस्तक रूपाने ते प्रसिद्ध करून सामान्यांपर्यंत पोहोचविणे ही कुष्ठरुग्णांविषयीची तळमळ यामधून स्पष्ट होते. प्रत्येक व्यक्ती हा समाजाचे देणे लागतो याचे भान हे पुस्तक वाचल्यानंतर व्हावे इतके यथार्थ चित्रण सावरकर मॅडमनी केले आहे.

केवळ सेवाभावी संस्थाच नव्हे तर शासकीय आणि सामाजिक कृती धोरणाचा अभ्यासही तितक्याच प्रगल्भतेने केल्याचे प्रकरण ७ मध्ये निदर्शनास येते. महात्मा गांधीनी स्वातंत्र्यानंतर कुष्ठ निर्मूलनाचा आग्रह धरणे, कुष्ठरोगाकडे मानसिक व सामाजिक रोग यादृष्टीने बघावे असे मानले आहे. परंतु शासनाने सुरुवातीला या समस्येला गांभीर्याने घेतले नाही. इंदिराजी गांधी यांनी कुष्ठरोग संपूर्णपणे नाहीसा कसा होईल यादृष्टीने विचार करण्यासाठी समिती नेमली. तेव्हापासूनचा सर्वच स्तरावरून होणाऱ्या शासकीय प्रयत्नांचा आढावा घेऊन शिफारशी सुचविल्या आहेत. शासकीय धोरणांमध्ये असलेल्या उणिवा दूर करण्यासाठी काही सूचना केल्या आहेत. सूचनांचा शासनाकडे अहवाल पाठविल्यास, पाठपुरावा केल्यास अमरावती येथील कुष्ठधामाला दरडोई खर्चाच्या एकूण ८० प्रतिशत निधी मंजूर करण्यास मदत होईल व संशोधनाचे महत्त्व द्विगुणित होईल असे सुचवावेसे वाटते. संशोधनरूपी ग्रंथ प्रकाशन करीत असताना प्रकरण ८ मध्ये प्रमुख निष्कर्ष व त्यावर आधारित शिफारशी करण्यात आल्या आहे. एकूणच आतापर्यंत प्रत्येक प्रकरणांमधून स्पष्ट होणारी भूमिका कुष्ठरुग्णांची ही केवळ वैद्यकीय समस्या नसून सामाजिक व आर्थिक समस्या आहे. कुष्ठरुग्णांचा सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने दोन्हीही संस्थाविषयी उत्पन्न व खर्च विषयक निष्कर्ष चिंतनीय आहेत. विशेषत: शासकीय अनुदानापासून संस्थेला मिळणाऱ्या उत्पन्नाच्या निर्देशांकात झालेली घट, देणग्यांपासून मिळणारे उत्पन्न कमी झाले आहे. तसेच कुष्ठरोग लपविण्याची प्रवृत्ती, कुटुंबाकडून पुरुषांच्या प्रमाणापेक्षा स्त्रियांना तिरस्काराची वागणूक मिळण्याचे प्रमाण दुपटीपेक्षा अधिक आहे. इथेही स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोनाचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. समाजाचा कुष्ठरोगाकडे बघण्याच्या दृष्टिकोनाचे मार्मिक चित्रण लेखिकेने रेखाटले आहे. अनेक व्यक्तींसोबत प्रत्यक्ष संवाद साधून कुष्ठरुग्णांप्रति सामाजिक बांधीलकी जोपासण्याचा प्रयत्न केला तसेच कुष्ठरुग्णांप्रति चुकीच्या धारणा हीच पुनर्वसनातील मुख्य अडचण होय, हे स्पष्ट करून समाजाचा कुष्ठरुग्णांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. याचे विश्लेषण व उपयुक्त संदर्भाची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून अतिशय दुर्बल, उपेक्षित घटकांकडे समाजातील प्रत्येक घटकांचे लक्ष केंद्रित व्हावे इतकी हृदयस्पर्शी समस्या पुस्तक रूपाने प्रसिद्ध केल्यात. सामान्य वाचकांनी, संशोधक विद्यार्थ्यांनी हे पुस्तक वाचावे. निश्चितच उपयुक्त ठरेल. भविष्यात समाजातील अनेक उपेक्षित घटकांवर चिंतन, मनन करुन असेच पुस्तक लिहावेत यासाठी मी डॉ. विभा सावरकरांना आग्रह करते. पुनश्च लेखिकेचे अभिनंदन करते.

◆◆◆

ISSN 2320-0197

(ग्रंथ परिचय)

# विदर्भ पर्यटन – सुवर्ण आशा

लेखक : **मृणालिनी फडणवीस** नागपूर.

(श्री रेणुका प्रकाशन, ७८, रविंद्र नगर, नागपुर-४४० ०२२, किंमत : रु. १००, पृष्ठसंख्या-८०)

**पुष्पा इंदूरकर**
निवृत्त प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
प्रताप नगर, अत्रे ले-आउट, नागपूर.

या पुस्तकात विदर्भ पर्यटनाच्या विभिन्न बाबी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकूण या पुस्तकाचे १५ भाग असून ऐंशी पानाचे पुस्तक आहे.

एका आनंददायी क्षणाचा उपभोग घेण्यासाठी पर्यटनाला जाणे किंवा यात्रा करणे ही सर्वसाधारण समजूत असते. पर्यटन स्थळांवर प्रवाशी येणार, काही दिवस किंवा काही तास मुक्तपणे घालवणार, ही मानवाची गरज आहे. ज्या व्यक्ती पर्यटन स्थळीच राहतात तो परिसर त्यांच्या रोजच्या पाहण्याचा असतो. असे साधारणपणे विदर्भात ५.८ टक्के लोक आहेत. त्यांना त्यांच्या परिसरात, घरात राहण्याचा जो अनुभव येतो तो सुखद असतो. सुखासीन, शांत जीवन हे त्यांचे नित्याचे आहे, पण सिमेंटच्या जंगलातून नैसर्गिक रम्य ठिकाणी खऱ्या जंगलाचा लाभ घेण्याची प्रक्रिया अति नागरिकरणाचा परिणाम आहे. निसर्गाने वेढलेल्या अनेक बाबी आपल्या मनाला, शरीराला शांत करतात. त्यामुळे देखील अनेक पर्यटनाचे प्रकार जन्माला आले व वाढले. शिक्षण, पर्यावरण, आनंद, शांतता या सर्वांची सांगड घालणाऱ्या विदेश पर्यटकांमध्ये ही बाब रुढ झालेली आहे, पण भारतात अशा लोकांची संख्या फक्त ०.९ टक्के आहे.

**विदर्भ पर्यटनाची आवश्यकता का ? :**

विदर्भाला जर जागतिक पातळीवर आणायचे असेल तर निसर्गानी नटलेला विदर्भ हा भरपूर पर्यटक आकर्षित करु शकतो. देश व विदेशी पर्यटकांच्या दृष्टीने या सेवा उद्योगाला मोठया प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे. हा अशिक्षित व शिक्षितांना रोजगार उपलब्ध करु देणारा उद्योग आहे. पूर्वीचा भारत; सोने की चिड़ीया, औद्योगिक जपान आणि सध्या गल्लोगल्ली उद्योग उभारणारा चीन, ही उदाहरणे जर पर्यटन स्थळांकरिता एका आशावादी दृष्टीकोनातून पाहिले तर लहान स्तरातील कितीतरी पर्यटक पूरक उद्योग उभारु शकतील.

पर्यटनाच्या अनुषंगाने विकास घडवायचा असेल तर भरपूर करता येण्यासारखे आहे. त्यासाठी एक मॉडेल तयार केलेला असून त्यामध्ये एखादी प्रक्रिया सुरु केली तर त्याचे कार्यकारण संबंध जोडून सर्वांगिण विकास कसा करता येईल ही प्रक्रिया मांडली आहे. या मॉडेल वरुन असे लक्षात येते की, आपली अनेक पर्यटन स्थळे आंतरराष्ट्रीय दर्जाची तयार होऊ शकतात. यासाठी आंतरराष्ट्रीय स्तराप्रमाणे संरचना तयार करण्यासाठी गुंतवणूक करावी लागेल. उत्तम, पद्धतशीर आणि स्वच्छ सोयी असल्या तरच

प्रत्येक जिल्हयात साधारणपणे ऐंशी हजार लोकांना वेगवेगळया क्षेत्रात रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

विदर्भाची बहुतेक पर्यटन स्थळे शासनाच्या नियमानुसार 'क' वर्गातच टाकल्या गेली आहेत. आणि ती फक्त देवस्थाने, तिर्थस्थळे अशी असून त्यांच्याहीसाठी वेळेवर निधी उपलब्ध होत नाही. मागील वर्षाची अनेक कामे अपुरी राहिलेली असून बहुतांश पर्यटन स्थळांची स्थिती अत्यंत खालवलेली आहे.

विदर्भ पर्यटनाचा विकास कसा करता येईल यासाठी चंद्रपूर जिल्हयातील विविध किल्ले, महाकाली देवस्थान, स्मृतीशिला, ताडोबा राष्ट्रीय उद्यान, तेथिल विविध वनसमृद्धी, विविध पक्षांचे आगमन स्थळ इत्यादींचा प्रथमत: विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच भंडारा गोंदिया जिल्हयात अंबागड किल्ला, नागझिरा अभयारण्य या दोन जरी स्थळांना राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्थळ बनवायचे असेल तर त्यासाठी साधारणपणे प्रत्योकी ३०० कोटी रुपयाची गुंतवण करण्याची गरज आहे. कोका वन्य पर्यटन, कचारगढ गुफा इत्यादी पण महत्वाचे आहे. तसेच नागपूर जिल्हयात रामटेक गड मंदिर, किल्ले, नरनाळा, मनसर नगरधन, खिंडसी, पेंच यांना पण तसाच प्रचंड आहे. तसे वर्धा जिल्हा आणि तेथील सेवाग्राम आश्रम याला फार पूर्वीच आंतरराष्ट्रीय शांती क्षेत्र म्हणून घोषित करुन विभिन्न प्रकारचे अभ्यास कार्यक्रम आणि संशोधन हाती घेण्याची गरज आहे.

अमरावती जिल्हा तर पर्यटनाचे माहेरघर ठरु शकते. या पुस्तकात प्रामुख्याने गाविलगड आणि तेथील परीसर आत्ताच ४० टक्के ऱ्हास पावलेला आहे असे म्हटले आहे. त्यामुळे त्याला विशिष्ट स्थान देवून त्वरीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. असे केल्यास इतिहास, पर्यटन आणि वास्तूशास्त्राच्या क्षेत्राला वाव मिळू शकेल.

बुलढाणा जिल्ह्यासाठी तर एक वेगळीच मोहिम उभारण्याची गरज आहे. त्यामध्ये लोणार विवराचा विशेष अभ्यास करून त्यावर एक भूगर्भशास्त्रीय आधारावर संशोधन करण्याची गरज आहे. सातपुडा रांगा या सध्याच्या युवावर्गासाठी विशेष आकर्षणाचे स्थळ होऊ शकेल अशी व्यवस्था त्या ठिकाणी होऊ शकते. कारण पर्वतारोहण, बंजी जंपींग आणि ट्रॅकींग, एरो मॉडेलींग इत्यादीसाठी एक मोठे आकर्षण असू शकेल.

विदर्भात पावसाळी पर्यटन यावर पूर्णपणे लक्ष देवून नैसर्गिक सौंदर्याचा लाभ घेता येईल यासाठी प्रचार आणि प्रसार करण्याची गरज आहे. या पुस्तकात अशा सर्व बाबी सविस्तर मांडून शासनाचे लक्ष या दिशेने केंद्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विदर्भातील पुरातन धार्मिक स्थळे आणि पर्यटन यांचाही चांगला सहसबंध प्रस्थापित करता येतो.

**पर्यटन व्यवसायाचे प्रचंड फायदे :**

एका लहान प्रकल्पापासून मोठया प्रकल्पापर्यंत रोजगार संधी कशा असू शकतात आणि पर्यटन विभाग कसा फुलू शकतो. याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे नमूद करता येतील.

- चहा-कॉफी चा स्टॉल ३-५ लोकांना रोजगार उपलब्ध करुन देऊ शकते.
- वनस्पतीचा उपयोग करुन स्पा तयार करणे.
- इतिहास व भूगोलची माहिती असलेल्या व्यक्ती गाईड, संपर्क केंद्र चालविणे इत्यादी व्यवसाय उभारु शकतात.
- साधारण खर्च करणांऱ्या ते अधिक खर्च करायाला लोकांसाठी हॉटेल्सची निर्मिती होऊ शकते. त्यात ५० व्यक्तीपासून २००

व्यक्तींपर्यंत काम मिळण्याची शक्यता आहे.

- त्याचप्रमाणे योग केंद्र मेंटेनन्स देखरेखीसाठी सतत करण्यात येणारी सोय. फोटोग्राफी, पर्यावरण शिक्षण, खेळ, आयटीची व्यवस्था, पर्यावरणीय पर्यटन इत्यादीसाठी प्रचंड लाभ घेता येण्यासारखा आहे.

''अतुल्य विदर्भात पर्यटन' अशा प्रकाराच्या सक्षम व्यवस्थापनाची गरज आहे. पर्यटनाबरोबर काही व्यवसाय व शैक्षणिक बाबी कायम स्वरुपाच्या अस्तित्वाला जन्म देतात. जसे शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे स्वरुप विद्यार्थ्यांना आत्मविश्वास व कौशल्य देतो. पर्यटनाचे अभ्यासक्रम अनेक विषयाचे एकत्रिकरण असते. त्यात वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भाषा, भाषांतर, इतिहास, आर्किटेक्चर, भूगोल, पाणी जंगल, जमीन, व्यवस्थापन, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, बिझनेस मॅनेजमेंट इत्यादिंचा समावेश असतो. सर्व बाजू अभ्यासल्यामुळे युवा पिढीचा सर्वांगिण विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

या पुस्तकात एक चांगला अभ्यास करुन या क्षेत्राशी संलग्न असलेल्या रोजगार संधी कोणकोणत्या असू शकतात यावर प्रकाश टाकलेला आहे. जसे '' विदर्भ इन्स्टिटयूट ऑफ टुरिझम अॅन्ड टॅव्हल मॅनेजमेंट'' याची स्थापना होणे गरजेचे आहे. विद्यापीठांमध्ये या प्रशिक्षणाची एक गरज म्हणून उभारणी करणे आणि ऑन जॉब ट्रेनिंगची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे.

विदर्भाचीच पर्यटन अभ्यास संस्था असल्यास प्रत्येक तालुक्यातील किंवा जिल्हयाच्या एका पर्यटन स्थळांना केंद्रबिंदू मानून त्यासंबंधी शासनाने प्रकल्प तयार करुन घ्यावेत. अभ्यासक्रमात त्याचा समावेश असल्यास स्थानिक लोकांच्या सहभागाचा एक मोठा टप्पा विचारात घेता येईल.

विदर्भ कला संस्कृती याला देखील वाव देण्यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ तयार करुन त्याला पर्यटना सोबत जोडता आलं पाहिजे.

अशा विविध बाबी या पुस्तकात असल्याने या अभ्यासाचा लाभ अनेक विषयांना होवू शकेल. इको टुरीझम – पर्यावरणीय पर्यटन ही संकल्पना दोन दशकांपासून जोर धरत आहे. त्यामुळे विदर्भासारख्या जंगल आच्छादित भागामध्ये याला अतोनात वाव आहे. असे या पुस्तकात बऱ्याच बारकाईने मांडले असून स्थानिक लोकांची सहभागिता आणि त्यासंबंधी असणाऱ्या विविध बाबींचा उहापोह या ठिकाणी केलेला आहे. १३ वे प्रकरण म्हणून विदर्भ पर्यटनाच्या नव्या दिशा असे म्हणून सांस्कृतिक पर्यटन, ऑरेंज टुरिझम, मत्स्य पर्यटन याला एक धावत्या आढाव्यानुसार मांडलेले आहे.

शेवटी समारोपीय विवेचनात विदर्भ देखील एक चित्रनगरी होऊ शकते आणि विविध सेवा त्याला जोडून तयार होऊ शकतात. याची सखोल माहिती पृष्ट क्र. ६९ ते ७७ पर्यंत केलेली आहे. खरं पाहिले तर या व्यवस्था करणे सध्या विदर्भाची गरज आहे. या पुस्तकात Vidarbha Economic Development Council चे पदाधिकारी श्री. विलास काळे यांनी पण केलेल्या कामाचा आढावा शेवटी घेतलेला आहे.

पर्यटनात रूची असणाऱ्यांनी व या विषयाचा विशेष अभ्यास करणाऱ्यांनी हे पुस्तक संग्रही बाळगावे असे सूचवावेसे वाटते.

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाचे स्वरूप व समस्यांचे विश्लेषण

**लेखक –जे.व्ही.गायकवाड,** अमरावती.

(प्रकाशक – सेंटर फॉर इकॉनॉमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती. किंमत: ३००/–, पृष्ठसंख्या–२३०)

**विनोद गावंडे**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
शासक विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

प्रस्तुत ग्रंथाचे अवलोकन आणि परीक्षण करण्याची जबाबदारी माझ्यावर आली याबाबत मनामध्ये प्रथमत: संदेह निर्माण झाला. कारण या पुस्तकाची विशेषत: म्हणजे पुस्तकाला मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक प्राप्त झालेले आहे. याकरिता मी सर्वप्रथम ग्रंथाचे लेखक जे.व्ही.गायकवाड आणि त्यांचे मार्गदर्शक दि.व्यं.जहागिरदार यांचे अभिनंदन करतो. भारतातील नागरीकरणाचे स्वरूप आणि त्यासंबंधीच्या समस्यांचे समष्टी पातळीवर विश्लेषण अनेक अभ्यासकांनी केले आहे. परंतु उपरोक्त विषयाचा व्यष्टी पातळीवर अभ्यास करून नागरीकरणाच्या समस्यांवर उपाययोजना सुचविलेल्या आहेत हे या पुस्तकाचे वेगळेपण आहे. अमरावती हे एक पौराणिक पार्श्वभूमी लाभलेले शहर आहे. अमरावती शहराचा संदर्भ अथवा उल्लेख अनेक प्राचीन ग्रंथ आणि घटनांमध्ये येतो. त्यामुळे प्राचीन भारत ते आधुनिक भारत असा नागरीकरणाच्या दृष्टीने संक्रमणाचा ठरलेला हा कालखंड आणि त्यामध्ये झालेले बदल व नव्याने निर्माण झालेल्या समस्या यांचा ऊहापोह करण्याचा यशस्वी प्रयत्न प्रस्तुत लेखकानी केल्याचे दिसून येते.

सदर पुस्तकात एकूण सात प्रकरणे आहेत. नागरीकरणाशी संबंधित सर्व महत्त्वाचे वादप्रश्न या पुस्तकात काळजीपूर्वक व शास्त्रीय पद्धतीने मांडले आहे. विशेषत: जिल्ह्यातील नागरी प्रशासन संस्थांच्या उत्पन्न खर्चाची स्थिती, गलिच्छ वस्तींचे अध्ययन आणि अमरावती शहरातील अनौपचारिक क्षेत्राची नमुना पद्धतीने केलेली शास्त्रीय मांडणी अत्यंत महत्त्वाची आहेत. या दृष्टीने या पुस्तकातील विविध कोष्टके लेखकाने प्रभावीपणे स्पष्ट केल्याचे आपणास जाणवते. अशा प्रकारच्या अध्ययनामुळे लेखकाचा आवाका लक्षात येतो.

अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाची स्थिती दर्शवीत असताना लेखकानी जगातील विकसित आणि विकसनशील अशा विविध देशांमधील नागरीकरणाची इ.स. १९७५ ते २०११ पर्यंतची संभावित स्थिती दर्शविलेली आहे. त्यामुळे भारत आणि इतर देशांमधील नागरीकरण आणि त्याची गती याबाबीचे विश्लेषण तुलनात्मक स्थिती दर्शक आहे. तसेच भारतातील इ.स. १९०९ ते २००१ या शतकातील नागरीकरणाची एकूण प्रवृत्ती दर्शक आकडेवारीमुळे भारतातील नागरीकरणाच्या प्रवृत्तीचे आकलन होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे भारतातील विविध राज्यांमधील नागरीकरण आणि नागरीकरणाचे

प्रतिशत प्रमाण राज्याराज्यांमधील तौलनिक स्थिती स्पष्ट करण्यास सहाय्यक ठरते. नागरीकरणामुळे शहरांच्या संख्येमध्ये इ.स. १९८१ ते २००१ या कालखंडामध्ये राज्यांमधील नागरीकरणाची स्थिती आणि प्रवृत्ती याबाबत लेखकानी चांगल्या प्रकारे विश्लेषण केलेले आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता राज्यातील प्रमुख सहा महसूल विभागांमधील नागरीकरण आणि त्यामधील बदलाच्या स्थितीची तुलना आणि तिची सामान्य प्रवृत्ती व स्वरूप अशा सर्वच बार्बीचे समष्टी विश्लेषण ग्रंथात आढळून येते.

अमरावती जिल्ह्याच्या व्यष्टी अभ्यासाकरिता लेखकांनी समोर ठेवलेली उद्दिष्ट्ये आणि गृहीतके संशोधन विषयाच्या अनुषंगाने समर्पक वाटतात. नागरीकरणाच्या प्रक्रिये अंतर्गत नागरिकांचे शहराकडे होणारे स्थलांतरण व त्याचे स्वरूप अभ्यासात असताना शहरांमधील केवळ गलिच्छ वस्त्या आणि झोपडपट्ट्यांमधील समाज व्यवस्थेचीच अभ्यासाकरिता निवड करण्यात आलेली आहे. नागरीकरण हा विषय स्वच्छ वस्त्या व कॉलनी प्रभागांमध्ये होणारे नागरिकांचे स्थानांतरण आणि दिवसेंदिवस नगरांमधील कॉलनी परिसरामध्ये झालेली वाढ सुद्धा नागरीकरणाच्या स्वरूपात तपासता येऊ शकते.

लेखकाने ग्रंथामध्ये संशोधनाकरिता निवडलेला कालखंड (इ.स. १९६१ ते इ.स.२००१) खऱ्या अर्थाने भारतातील नागरीकरणातील बदलाचा मुख्य कालखंड मानण्यात येतो. भारतामध्ये याच कालखंडात नागरीकरणाचे स्वरूप झपाट्याने बदलत गेल्याचे दिसून येते.संशोधनाची व्याप्ती (अमरावती जिल्हा) आणि त्याबाबत इतर जिल्ह्यांशी केलेली तुलना महाराष्ट्रामधील नागरीकरणाची विभागवार प्रगती व त्यामधील प्रवृत्ती व बदल दर्शविणारी आहे.

विस्तारित गेलेल्या नागरीकरणातून निर्माण होणाऱ्या गलिच्छ वस्त्या आणि झोपडपट्ट्यांची प्रत्यक्ष पाहणी केल्यामुळे या वस्त्यांमधील समस्यांचा आणि त्यांचा सामान्य जीवनावर होणाऱ्या दूरगामी परिणामांचे विश्लेषण या ग्रंथामध्ये योग्य पद्धतीने केलेले आहे. परिणामत: गलिच्छ वस्त्या व झोपडपट्टी परिसरातील विविध समस्यांना आधार मानून अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांकरिता हा ग्रंथ सहाय्यक ठरणारा आहे. लेखकानी नागरीकरणातून निर्माण होणाऱ्या गलिच्छ वस्त्या आणि झोपडपट्ट्यांमधील समाजजीवन, अर्थकारण, विविध व्यवसायांचे धर्मनिहाय वर्गीकरण, भांडवलाच्या समस्या, सार्वजनिक सोई सुविधा, नवनिर्मिती, साक्षरता, पाणीपुरवठा, उत्पन्नाचे स्त्रोत, आरोग्य व्यवस्था, किरकोळ व्यवसाय व जीवनव्यापनाचे इतर दुर्लक्षित व्यवसाय इत्यादींचा बारकाईने समाचार घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे या विषयांच्या संदर्भात कार्य करण्याच्या अभ्यासकांकरिता हा ग्रंथ सहाय्यक ठरणारा आहे.

नागरीकरणाचा विषय शासकीय धोरणांच्या आढाव्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन एक मोठा कालखंड पूर्ण झाला असताना सुद्धा गलिच्छ वस्त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाचे प्रयत्न व त्यामाध्यमातून या वस्त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोई सुविधा अत्यंत दुबळ्या व त्रोटक वाटतात. यावर लेखकानी प्रकाश टाकलेला आहे. परंतु प्रत्यक्ष लाभार्थी व योजनांपासूनच्या वंचितांची स्थिती व त्यांची प्रतिक्रिया सोबत घेतल्यास शासकीय योजनांचे विश्लेषण आणि फलनिष्पत्ती करिता ही बाब अधिक योग्य ठरली असती. नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे निराकरण

करण्यासाठी योजण्यात आलेले शासकीय प्रयत्न लक्ष्यवेधक आहेत. परंतु या प्रयत्नांती नागरीकरणाच्या समस्यांची तीव्रता मात्र फार कमी झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत लेखकांनी शासकीय धोरणाचा घेतलेला आढावा प्रशंसनीय ठरतो.

लेखकाच्या मते विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशांमध्ये नागरीकरणाचा वेग अधिक आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने नागरीकरणाला आणि नागरीकरणामुळे आर्थिक विकासाला मदत झाली. औद्योगिक आणि नागरीकरण यांच्यामध्ये परस्पर संबंध असून औद्योगिकरणामुळे नागरीकरणात वाढीची प्रवृत्ती दिसून येते. मात्र भारतातील औद्योगिकरण आणि नागरीकरण यामध्ये विसंगती आढळून येते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये नागरीकरण ज्या वेगाने होत आहे त्या वेगाने औद्योगिकरण अपेक्षित आहे. परंतु असे दिसून येत नाही. याउलट विकसित देशांमध्ये औद्योगिकरणाची गती अधिक असताना नागरीकरणाच्या समस्या मात्र कमी आहेत. यावरून असा अर्थबोध होतो की, भारतातील नागरीकरणाच्या व्यवस्थापनातच कुठेतरी दोष अथवा उणिवा आहेत. ज्यामुळे भारतात सुदृढ नागरीकरण झालेले दिसून येत नाही.

प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकांनी अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणातून निर्माण झालेल्या गलिच्छ वस्त्या आणि झोपडपट्ट्यांची सविस्तर माहिती दिली असून त्यामाहितीचे योग्य विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरीकरणाची दशा आणि दिशा स्पष्ट होण्यास मदत होते. तसेच नागरीकरणाच्या तुलनात्मक अभ्यासामुळे जिल्ह्याची इतर जिल्ह्यांच्या तुलनेत स्थिती काय आहे? याबाबतच आकलन होण्यास मदत होते.

ग्रंथाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये लेखकांनी नागरीकरणातून निर्माण झालेल्या अनेक समस्या आणि त्या संदर्भात उपाययोजना सुचविल्या आहेत. उपाययोजनांमध्ये बहुसंख्य उपाययोजना आदर्श समाजाची आठवण करून देणाऱ्या वाटतात. काही वास्तववादी उपाययोजना महत्त्वपूर्ण वाटतात. नागरीकरणाच्या समस्यांची उकल करण्यासाठी लेखकानी विशेष कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची आवश्यकता आणि त्याबाबतची खंत व्यक्त केली आहे. या ग्रंथाचा एकंदर आढावा घेता असे लक्षात येते की, हा ग्रंथ नागरीकरणाच्या संबंधी अभ्यास करणारे अभ्यासक व संशोधक त्याचप्रमाणे योजनाकारांच्या कार्यास सहाय्यक ठरणारा आहे आणि नागरीकरणाच्या अभ्यासाला नवी दिशा देणारा आहे. संपूर्ण विवेचनात एक शास्त्रीय शिस्त लेखकाने पाळली असून त्याद्वारे संबंधित विषय योग्य प्रकारे हाताळण्यात तो यशस्वी झाला आहे. लेखकाला भावी संशोधन व लिखाणाकरिता हार्दिक शुभेच्छा.

◆◆◆

**श्री.वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर**
**येथे संपन्न झालेल्या .....**

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे वार्षिक अधिवेशन

## (२०१२-१३)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे वार्षिक अधिवेशन दि. ९ व १० फेब्रुवारी २०१३ (शनिवार व रविवार) रोजी नागपूर महसूल विभागातील वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर (जुने मॉरीस कॉलेज) येथे संपन्न झाले. स्वातंत्र्य सभागृहात संपन्न झालेल्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष संस्थेचे संचालक डॉ.जयराम खोब्रागडे होते. उद्घाटक म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व आयसीएसएसआर चे अध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखदेव थोरात उपस्थित होते. ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. आर.आर.गव्हाळे, ज्येष्ठ सदस्य तथा सुप्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले, परिषदेच्या कार्याध्यक्ष डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, सचिव डॉ. आर.बी.भांडवलकर आणि स्थानिक सचिव डॉ. प्रमोद लाखे उपस्थित होते. दीप प्रज्वलनानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उद्घाटन सोहळ्यातील विचारमंचावरील मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देवून स्वागत करण्यात आले. ३७ व्या वार्षिक अधिवेशन आयोजनाची भूमिका डॉ. प्रमोद लाखे यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक परिषदेचे सचिव डॉ. आर.बी.भांडवलकर यांनी केले. यावेळी परिषदेला आर्थिक साहाय्याची मदत करण्याची विनंती त्यांनी मान्यवर डॉ. थोरात यांना केली. डॉ. सुखदेव थोरात यांनी आपल्या अभ्यासपूर्ण उद्घाटनपर भाषणात महाराष्ट्राचा सर्व समावेशक विकास आणि विभागीय असमतोल इत्यादी मुद्याचा ऊहापोह केला. डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी यावेळी मार्गदर्शनपर भाषण केले. परिषदेची पार्श्वभूमी डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी विशद केली. अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. आर.आर.गव्हाळे यांनी 'विदर्भातील सहकार चळवळ' या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण केले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष डॉ. जयराम खोब्रागडे यांनी अध्यक्षीय भाषण केल्यानंतर पसायदान म्हणून उद्घाटन सोहळा संपन्न झाल्याचे घोषित केले.या सोहळ्याचे उत्कृष्ट संचलन डॉ. सौ. रजनी हुद्दा यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. एच.ए.हुद्दा यांनी केले. यावेळी डॉ. संजय धनवटे, डॉ. एम.एल.कासारे, परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस.पी. कुळकर्णी, डॉ. पुष्पा तायडे, डॉ. पुष्पा इंदूरकर, डॉ. अंजली कुळकर्णी, डॉ. दि.व्यं.जहागिरदार, डॉ. आर.जी.टाले, प्रा.एन. ए. पिस्तुलकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. एस.बी.कटमुसरे व डॉ. गौतम कांबळे सुद्धा उपस्थित होते.

भोजनावकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या सत्रामध्ये 'माहितीचे अर्थशास्त्र' या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे तर समन्वयक प्राचार्य संजय धनवटे, सूत्रसंचालक डॉ. प्राची देशपांडे होते. यावेळी पाच संशोधकांनी आपले अभ्यासपूर्ण निबंध सादर केले. तसेच ऐनवेळच्या चर्चेमध्ये आपला सहभाग प्रतनिधींनी दर्शविला. चहापानानंतर दुसऱ्या सत्रामध्ये 'किरकोळ व्यापारातील विदेशी गुंतवणूक'

ह्या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. अंजली कुळकर्णी, समन्वयक डॉ. जे.व्ही.गायकवाड, सूत्रसंचालक डॉ. प्रज्ञा बागडे होत्या. या विषयावरील वीस निबंधापैकी बहुतांश निबंध सादर झालेत. तसेच डॉ. आर.बी.ठाकरे यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. या दोन्ही विषयावरील सादर केलेल्या उत्कृष्ट शोध निबंधास डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ. दि.व्यं.जहागिरदार पारितोषिक देण्यात येते. त्याचा बहुमान डॉ. एच.ए.हुद्दा व डॉ. माधुरी लेले यांनी प्राप्त केला. यावेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर.आर.गव्हाळे उपस्थित होते. आभार प्रदर्शना नंतर पहिल्या दिवसाचे दोन्ही सत्र संपल्याचे जाहिर करण्यात आले.

वार्षिक अधिवेशनाच्या निमित्याने पहिल्या दिवशी सायंकाळी घेण्यात येणाऱ्या नाणेकर व पिंपरकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते व सामाजिक कार्यकर्ते मा. देविदासजी घोडेस्वार हे होते. यावेळी आर.आर.गव्हाळे, डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, एच.ए.हुद्दा व आर.बी.भांडवलकर उपस्थित होते. या व्याख्यान आयोजनाची भूमिका डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार यांनी विशद केली. यावेळी प्रमुख वक्ते श्री.घोडेस्वार यांनी सामाजिक न्याय व्यवस्था आणि आर्थिक विकास याबाबत अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. व्याख्यानमालेचे संचालन डॉ.आर.बी. भांडवलकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.एच.ए.हुद्दा यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.आर.आर.गव्हाळे यांच्या अध्यक्षीय भाषणाने व्याख्यानमालेचा समारोप झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्यांदाच परिषदेने सुरू केलेल्या 'अर्थशास्त्रातील जुन्या ग्रंथावर विचारमंथन' ह्या उपक्रमाचे पहिले पुष्प गुंफण्यात आले. या व्याखयान समारोहाचे अध्यक्ष डॉ.आर.आर.गव्हाळे प्रमुख वक्ते अर्थतज्ञ डॉ. दि.व्यं.जहागिरदार होते. डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ. एच.ए.हुद्दा, डॉ.प्रमोद लाखे आणि डॉ.आर.बी.भांडवलकर आणि अनेक सभासद उपस्थित होते. यावेळी 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' या ग्रंथावर डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करून सरळ व सोप्या भाषेत ग्रंथाचा परिचय करून दिला. या उपक्रमांचे उपस्थित प्रतिनिधींनी कौतुक केले. या व्याख्यान कार्यक्रमांचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार यांनी केले. संचालन डॉ.आर.बी.भांडवलकर आणि आभार प्रदर्शन डॉ. एच.ए.हुद्दा यांनी केले.

तिसऱ्या तांत्रिक चर्चासत्रामध्ये 'विदर्भातील पर्यटन (जिल्हा निहाय)' या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. पुष्पा इंदूरकर ह्या होत्या. समन्वयक प्रा.टिकरे तसेच डॉ.सौ. लेले यांनी सुत्रसंचालनाचे कार्य केले. यावेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ.आर. आर. गव्हाळे उपस्थित होते. यामध्ये दहा संशोधकांनी अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केले. या विषयावरील शोधनिबंधास प्रा. कमलाकर हनवंते यांचे वडिलांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येते. ते प्राप्त करण्याचा सन्मान प्रा.डॉ.संगिता टक्कामोरे व प्रा.डॉ.वनिता चोरे यांना संयुक्तपणे मिळाला.आभार प्रदर्शन नंतर तिसरे सत्र संपल्याचे जाहीर करण्यात आले.

चहापानानंतर वार्षिक अधिवेशनाचे निमित्ताने घेण्यात येणाऱ्या आमसभेला सुरूवात करण्यात आली. आमसभेचे अध्यक्ष डॉ.आर. आर. गव्हाळे होते. यावेळी कार्याध्यक्ष डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.एच.ए.हुद्दा, डॉ.आर.बी.भांडवलकर, उपाध्यक्ष डॉ.एस.बी.कटमुसरे, कोषाध्यक्ष डॉ.गौतम कांबळे उपस्थित होते. मागील वर्षातील दिवंगत

सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून आमसभेचे कामकाज अध्यक्षांचे परवानगीने सुरू झाले. मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे,मागील आर्थिक वर्षाचा परिषदेचा व अर्थमीमांसाचा हिशोब सादर करणे, पुढील अधिवेशनाकरिता चर्चासत्राचे विषय निश्चित करणे, पुढील अधिवेशनाचे स्थळ निश्चित करणे, अधिवेशनाच्या अध्यक्षांची निवड करणे, कार्यकारिणी निवडणे व प्राध्यापकाचे अभिनंदन आणि सत्कार करणे तसेच वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आले. आमसभेत आपले विचार व्यक्त करतांना डॉ. जहागिरदार यांनी त्यांना भाषण दिल्याबद्दल मिळालेल्या मानधनाची रक्कम रू. १००० मध्ये स्वत: एक हजाराची भर घालून परिषदेला रू. २००० ची देणगी दिली व अन्य सभासदांनीही परिषदेची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून देणग्या जाहीर कराव्यात असे आवाहन केले. अनेक प्राध्यापकांनी या प्रसंगी देणग्या जाहीर केल्यात (त्याबाबतची माहिती पुढील आमसभेत दिली जाईल) यावेळी पीएच्.डी. प्राप्त डॉ.राजेश्वर रहांगडाले, डॉ. राजेंद्र गव्हाळे, डॉ. विष्णु कुटे, प्रा.प्रतिभा (चौधरी) काळमेघ, डॉ. गणेश मायवाडे, डॉ. प्रकाश वितरे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. अशा पद्धतीने अध्यक्षाचे परवानगीने आमसभेचे कामकाज सर्वांचे आभार मानून संपल्याचे जाहीर करण्यात आले. परिषदेच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून डॉ. संजय धनवटे यांची आणि डॉ. एस.बी.कटमुसरे यांना नागपूर विभागाचे सचिव म्हणून आणि डॉ. आर.बी.भांडवलकर यांची अमरावती विभागाचे सचिवपदी अविरोध निवड करण्यात आली आणि परिषदेचे पुढील अधिवेशन अमरावती महसूल क्षेत्रात घेण्याचे ठरले.

अधिवेशनाचा समारोप संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे यांचे अध्यक्षतेखाली चवथ्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे अध्यक्ष व सेवानिवृत्त मुख्य सचिव मा.जे.पी.डांगे यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच कार्याध्यक्ष डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार, डॉ. प्रमोद लाखे, डॉ.एच.ए.हुद्दा, डॉ.आर.बी.भांडवलकर आणि परिषदेचे अध्यक्ष डॉ.आर.आर.गव्हाळे यांचे उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक मा.जे.पी.डांगे माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्राच्याविकासात ४ थ्या वित्त आयोगाची भूमिका विशद केली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे, स्थानिक सचिव डॉ. प्रमोद लाखे, तसेच डॉ.एच.ए.हुद्दा व सौ. रजनी हुद्दा यांचा परिषदेच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट अधिवेशनाचे आयोजनाबाबत परिषदेने आभार व्यक्त केले. उत्कृष्ट शोधनिबंध सादर करणारे डॉ. एच.ए.हुद्दा, डॉ.माधुरी लेले, प्रा.डॉ.संगिता टक्कामोरे व प्रा.डॉ.वनिता चोरे यांचा प्रोत्साहनपर पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. यावेळी नागपूर व अमरावती क्षेत्रातील प्रतिनिधींनी दोन दिवसीय आयोजित अधिवेशनाबाबत आपले प्रातिनिधीक मनोगत व्यक्त केले. विदर्भातील अर्थशास्त्राचे अभ्यासक, पत्रकार, विद्यार्थी आणि व्यवस्थापन मंडळ, ज्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जयराम खोब्रागडे यांचे अध्यक्षीय भाषणानंतर डॉ.एच.ए.हुद्दा यांनी आभार व्यक्त केले. समारोप कार्यक्रमांचे संचालन डॉ. मंजुषा ठाकरे यांनी केले. ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.आर.आर.गव्हाळे यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहीर करून सर्वांचे, आभार व्यक्त केले.

**डॉ.आर.बी.भांडवलकर**

सचिव

◆◆◆

विदर्भ अर्थशास्त्र परिषद आणि श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि. यवतमाळ यांचे संयुक्त विद्यमाने दि.१८ जानेवारी २०१४ शनिवार रोजी 'बदलते आर्थिक प्रवाह-भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राचे अध्यक्ष प्राचार्य जी.एम.अग्रवाल होते. चर्चासत्राचे उद्घाटक प्राचार्य डॉ. संजय धनवटे अध्यक्ष विदर्भ अर्थशास्त्र परिषद, प्रमुख अतिथी डॉ.आर.बी.भांडवलकर व प्रा.राजेंद्र तातेड होते. यावेळी अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी सदर विषयावरील चर्चा सत्रामध्ये सहभाग घेवून चर्चा घडवून आणली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एन.ए.पिस्तुलकर अर्थशास्त्र विभागप्रमुख यांनी केले. जागतिकीकरणानंतर अर्थव्यवस्थेत घडून आलेले बदल त्याचा शेती, उद्योग व सेवाक्षेत्रावर झालेला परिणाम, रूपयाचे अवमूल्यन, आर्थिक विकासात निर्माण झालेला असमतोल इत्यादी बाबींवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन शिवाजी इंगोले यांनी केले. महाविद्यालयातील अर्थशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे उपस्थितीतांनी कौतुक केले. यावेळी प्रा.आर.एफ.राठोड, प्रा.शशीकांत वानखडे, प्रा.चव्हाण, प्रा.वाकडे, प्रा.बोळे, प्रा.पांडे उपस्थित होते. सदर चर्चासत्राचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल प्रा.एन.ए.पिस्तुलकर यांचे परिषदेच्या वतीने कौतुक करून आभार व्यक्त करण्यात आले.

◆◆◆

## ।। श्रद्धांजली ।।

अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत **प्रोफेसर लॉरेन्स रॉबर्ट क्लाइन** यांचे २० ऑक्टोबर २०१३ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी दु:खद निधन झाले. आर्थिक सिद्धांत, अर्थमितीय विश्लेषण आणि समष्टी अर्थमितीय मॉडेलींग या अर्थशास्त्राच्या तीन क्षेत्रावर त्यांनी आपल्या अध्ययन व संशोधनातून अमीट ठसा उमटविला आहे. पॉल सम्युअलसन यांचे ते पीएच्.डी. चे पहिले विद्यार्थी होते. विशेष म्हणजे काही भारतीय देखील त्यांचे एम्.ए. च्या वर्गात व संशोधन म्हणून विद्यार्थी राहिले आहेत. मेघानंद देसाई, कांता आणि व्ही.पंडित मारवा हे त्यांचे पीएच्.डी. चे विद्यार्थी होते तर सी. रंगराजन आणि वाय्.के.अलग हे त्यांचे एम.ए.चे विद्यार्थी. प्रोफेसर क्लाइन अनेक वेळा भारतातही येऊन गेलेत.

◆◆◆

१२ सप्टेंबर २०१३ रोजी **प्रोफेसर जी.एस्.भल्ला** यांच्या निधनामुळे भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या मालिकेतील एक अत्यंत अभ्यासू व सडतोडपणे आपले विचार मांडणारा अर्थतज्ञ गळून पडला आहे. त्यांनी जरी अनेक विषय हाताळले असले तरी कृषी अर्थशास्त्राचे व्यासंगी व जाणकार म्हणून त्यांची भारतात व विदेशातही ख्याती होती.

***या दोघांनाही विदर्भ अर्थशास्त्र परिषदेतर्फे विनम्र श्रद्धांजली !***

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष

| अ.क्र. | अधिवेशनाचे स्थळ | वर्ष | अधिवेशनाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७०-७१ | डॉ. बी.आर. ढेकणे |
| २ | एन.एम.डी. महाविद्यालय, गोंदिया | १९७१-७२ | डॉ.सु.द. बाळ |
| ३ | भारतीय महाविद्यालय, अमरावती | १९७२-७३ | डॉ. के.आर. नाणेकर |
| ४ | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | १९७३-७४ | प्रा.ग.प्र. पिंपरकर |
| ५ | यशवंत महाविद्यालय, वर्धा | १९७४-७५ | प्राचार्य रा.ना. खर्चे |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७५-७६ | डॉ. श्री.आ. देशपांडे |
| ७ | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | १९७६-७७ | प्रा.आर.एम. जोशी |
| ८ | सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर | १९७७-७८ | डॉ.ए.पी. हरदास |
| ९ | एस.पी.एम महाविद्यालय, चिखली,जि. बुलढाणा. | १९७८-७९ | प्रा. ए.एन. लोथे |
| १० | बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ | १९७९-८० | प्रा.एस.आर. ओझरकर |
| ११ | धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर | १९८१-८२ | डॉ.एस.एल.लोकरे |
| १२ | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती. | १९८२-८३ | प्रा.एस.ए.पाटील |
| १३ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. | १९८८-८९ | डॉ. व्ही.एस.शेणवाई |
| १४ | महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि.अमरावती. | १९८९-९० | डॉ.एस.व्ही.खांदेवाले |
| १५ | यशवंत महाविद्यालय, सेलू, जि.वर्धा. | १९९०-९१ | प्रा.एस.व्ही.जांवधिया |
| १६ | फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ | १९९१-९२ | प्रा.के.आर.खेरडे |
| १७ | कर्मवीर महाविद्यालय, मूल | १९९२-९३ | डॉ.डी.एस.वखरे |
| १८ | शासकीय ज्ञान विज्ञान संस्था (विदर्भ महाविद्यालय) अमरावती. | १९९३-९४ | डॉ.सौ.सुनंदा सोनारीकर |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्ालय, चिमूर. | १९९४-९५ | प्रा.व्ही.एस.कुळकर्णी |
| २० | जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती. | १९९५-९६ | डॉ.सौ.अंजली कुळकर्णी |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९६-९७ | प्रा.डी.आर.अग्रवाल |
| २२ | जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा. | १९९७-९८ | डॉ.आर.वाय.माहोरे |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९८-९९ | डॉ.दि.व्यं.जहागिरदार |
| २४ | राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव (खंडेश्वर), जि.अमरावती. | १९९९-२००० | डॉ.व्ही.एम.वैद्य |
| २५ | सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर. | २०००-०१ | प्रा.एस.एन.अंभोरे |
| २६ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती. | २००१-०२ | प्रा.के.ई.पाटील |
| २७ | लोक महाविद्यालय, वर्धा. | २००२-०३ | प्राचार्य एन.एफ.सुदा |
| २८ | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. | २००३-०४ | प्राचार्य डॉ.आर.जी.भोयर |
| २९ | एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा. | २००४-०५ | प्रा.एस.एस.देशमुख |
| ३० | श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ. | २००५-०६ | डॉ.सौ.पुष्पा इंदूरकर |
| ३१ | बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, जि.नागपूर. | २००६-०७ | डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार |
| ३२ | श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. | २००७-०८ | प्राचार्य डॉ.पुष्पा तायडे |
| ३३ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. | २००८-०९ | प्रा.कमलाकर हनवंते |
| ३४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि.यवतमाळ | २००९-१० | डॉ.एस.पी.कुळकर्णी |
| ३५ | न्यु आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा. | २०१०-११ | प्रा.एन.ए.पिस्तुलकर |
| ३६ | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), जि. वाशिम. | २०११-१२ | प्राचार्य डॉ.आर.जी.टाले |
| ३७ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | २०१२-१३ | डॉ.आर.आर.गव्हाळे |
| ३८ | इंदिरा गांधी कला विज्ञान महाविद्यालय, राळेगाव, जि.यवतमाळ | २०१३-१४ | प्राचार्य डॉ.संजय धनवटे |

**डॉ.आर.बी.भांडवलकर**
सचिव
विदर्भ अर्थशास्त्र परिषद